सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | बुधवार, दि. २९ एप्रिल २०२६ | वर्ष - ४ थे | अंक १६ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# १ मे पासून मुंबई- पुणे प्रवास होणार सुस्साट...!

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई :** सध्याचा मुंबई-पुणे एक्स्प्रेस वे आणि जुना मुंबई-पुणे महामार्ग हे दोन्ही मार्ग खालापूर ते लोणावळा या १० किलोमीटरच्या घाट क्षेत्रात एकमेकांना मिळतात. यामुळे या भागात प्रचंड वाहतूक कोंडी होते. या समस्येचे निराकरण करण्यासाठी जो नवीन जोडमार्ग तयार केला, त्याला 'मिसिंग लिंक' असे नाव पडले. मुंबई-पुणे 'मिसिंग लिंक' प्रकल्प केवळ रस्ता नसून तो जागतिक दर्जाच्या अभियांत्रिकीचा नमुना ठरला आहे. या मार्गावरील जगातील सर्वात रुंद ८ पदरी बोगद्याची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्समध्ये होण्याचा दावा एमएसआरडीसीने केला आहे.या प्रकल्पातील ८.९२ किमी



लांबीचा बोगदा हा २३.७५ मीटर रुंद आहे. हा जगातील सर्वात रुंद ८-पदरी (८-श्ररपश) बोगदा असल्याचा दावा केला जात असून, याची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्समध्ये होण्याची शक्यता आहे.भारतातील सर्वात उंच केबल-स्टेड पूल: टायगर व्हॅलीवर बांधलेल्या पुलाचे खांब १८२ मीटर उंच आहेत. याची तुलना करायची झाल्यास, वांद्रे-वरळी सी-लिंकच्या खांबांची उंची १२६ मीटर आहे, म्हणजेच हा पूल त्यापेक्षाही ५६ मीटरने उंच आहे.या प्रकल्पाचे एक मोठे वैशिष्ट्य म्हणजे बोगद्याचा काही भाग लोणावळा तलावाच्या तळापासून साधारण १८० मीटर खोल जमिनीखालून जातो.तो अत्याधूनिक प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करुन बांधण्यात आला आहे.या प्रकल्पाचा खर्च तांत्रिक आव्हाने आणि विलंबामुळे मूळ खर्च वाढून तो आता ७,५०० कोटींच्या घरात गेल्याचे सांगण्यात येते. तसेच या प्रकल्पाच्या



कामाला साधारणपणे २०१९ मध्ये सुरुवात झाली होती. सध्या एप्रिल २०२६ अखेरपर्यंत या प्रकल्पाचे ९९% काम पूर्ण झाले असून अंतर्गत सजावट आणि रंगरंगोटी सुरू आहे. हा प्रकल्प पूर्ण होण्यासाठी साधारण ६ वर्षांचा कालावधी लागला आहे.सुरुवातीच्या सहा महिन्यांसाठी या मार्गावरून केवळ कार आणि बस सारख्या प्रवासी हलक्या वाहनांना प्रवेश दिला जाईल. अवजड ट्रॅकला सध्याच्या जुन्या घाटातूनच जावे लागेल. या नवीन मार्गासाठी प्रवाशांकडून कोणताही अतिरिक्त टोल आकारला जाणार नाही. खालापूर किंवा उर्से टोल नाक्यावर सध्या असलेला टोलच कायम राहील. तसेच खंडाळा घाटातील 'अडोशी' आणि 'अमृतांजन पॉईंट' यांसारखी अपघातप्रवण वळणे टाळता येणार असल्याने अपघातांचे प्रमाण जवळपास शून्यावर येईल.

## सोन्या-चांदीच्या किंमतीत घसरण

**नवी दिल्ली:** सध्या लग्नसराई सुरु आहे, पण सोन्याचे वाढते दर पाहता एन लग्नसराईत सोने खरेदी करावी की नाही असा प्रश्न पडला आहे. मात्र अशातच एक गुड न्यूज समोर आली आहे. सोन्याच्या दरात काही दिवसांपासून घसरण पहायला मिळत आहे त्यामुळे खरेदीदारांसाठी हा काहीसा दिलासा मानला जात आहे. आज २८ एप्रिलला सोनं-चांदीच्या किंमती या कमी झाल्या आहेत. एमसीएक्सवर सोन्याचा भाव ६० रुपयांच्या घसरणीसह १५१६५५ रुपये प्रति १० ग्रॅमवर आहे, तर चांदीचा भाव १२०० रुपयांनी खाली येऊन २४०६१९ रुपये प्रति किलो ग्रॅम वर आला आहे.

## जेवणासाठी कोठडीतून पळाला

**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगरमध्ये पोलीस कोठडीतून पळालेल्या अट्टल चोरट्याने थेट घरी जाऊन जेवण करून झोप काढल्याचा अजब प्रकार समोर आला आहे. व्हीआयपी बंदोबस्तामुळे पोलीस व्यस्त असताना अभिषेक उर्फ भय्या भुमकर हा पुंडलिकनगर पोलीस ठाण्यातून पसार झाला. पोलिसांनी त्याच्या घरी धाव घेतली असता तो पोटभर जेवून शांतपणे झोपलेला आढळला. साहेब, खूप भूक लागली होती, असे कारण देत त्याने पोलिसांनाच चक्रावून टाकले.

## बुलढाण्यात आंदोलन

**बुलढाणा :** शिवाजी कोण होता? या पुस्तकाच्या वाचनावरुन गोंधळ निर्माण झालेला आहे. बुलढाण्यात आमदार संजय गायकवाडांच्या घरासमोर आंदोलन सुरु आहे. आंदोलकांना पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. संजय गायकवाड यांच्या घरासमोर पुस्तकाचं वाचन करण्यात येत होते .

## कोठडीतच आरोपीची आत्महत्या

**पुणे :** बारामती तालुक्यातील वडगाव निंबाळकर पोलीस ठाण्यात आज सकाळी धक्कादायक घटना घडली. अल्पवयीन मुलीवरील अत्याचार प्रकरणात अटक करण्यात आलेल्या आरोपीने पोलीस कोठडीतच गळफास घेऊन आत्महत्या केली. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

## मनोविकृताला पकडले

**कोल्हापूर :** अमरावती आणि नाशिकमधील अश्र्लील व्हिडीओ व्हायरल प्रकरणांच्या चर्चा सुरु असतानाच, आता कोल्हापूर जिल्ह्यातून अत्यंत धक्कादायक प्रकार समोर आला आहे. हातकणंगले तालुक्यातील पुलाची शिरोली येथील शाहिद समीर सनदे (वय २२) या तरुणाने अनेक निष्पाप तरुणींना प्रेमाच्या जाळ्यात ओढून, त्यांचे अश्र्लील व्हिडीओ बनवून त्यांना ब्लॅकमेल केल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. या घटनेमुळे संपूर्ण कोल्हापूर जिल्ह्यात संतापाची लाट उसळली असून, यामागे एखादी संघटित टोळी कार्यरत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

# शिवरायांच्या नावावर निरर्थक वाद उकरून काढणे संतापजनक

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई :** छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान या देशात कोणीही करू शकत नाही, त्यांचा मान अढळ आहे. मात्र, सध्या महाराजांच्या नावावर जे निरर्थक वाद सुरू आहेत, ते चर्चेत राहण्यासाठी केलेले प्रकार असून ते अत्यंत असंवेदनशील आहेत, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नाराजी व्यक्त केली. कॉम्रेड गोविंद पानसरे लिखित 'शिवाजी कोण होता?' या पुस्तकावरून सुरू असलेल्या वादाच्या पार्श्र्वभूमीवर मुख्यमंत्र्यांनी मंगळवारी सोलापूर येथे माध्यमांशी संवाद साधताना ही भूमिका मांडली.



बुलढाण्याचे आमदार संजय गायकवाड यांनी या पुस्तकातील उल्लेखावरून प्रकाशक प्रशांत आंबी यांना दिलेल्या धमकीमुळे वादाला तोंड फुटले आहे. यावर मुख्यमंत्री म्हणाले की, हे पुस्तक १९७९ साली लिहिण्यात आले. त्यावर आज इतक्या वर्षांनी वाद उकरून काढणे आणि दोन्ही बाजूंनी एकमेकांना भिडणे हे सामाजिक स्वास्थ्य बिघडवणारे कृत्य आहे. आक्षेप घेणाऱ्यांनी (संजय गायकवाड) हे पुस्तक वाचले आहे की नाही, हे मला माहिती नाही आणि आंदोलन करणाऱ्यांनाही आपण नेमके कशासाठी रस्त्यावर उतरलो आहोत, हे ठाऊक आहे की नाही, यात शंका आहे. केवळ प्रसिद्धीसाठी ऐतिहासिक संदर्भांचा विपर्यास करून वाद निर्माण करणे अयोग्य असल्याचेही त्यांनी नमूद केले.

मुंबईत धर्म विचारून करण्यात आलेल्या चाकू हल्ल्याच्या घटनेवरही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सविस्तर भाष्य केले. हे प्रकरण 'सेल्फ रॅडिकलायझेशन' (स्व-कट्टरतावाद) स्वरूपाचे असल्याचे त्यांनी सांगितले. सध्या इंटरनेट आणि विशिष्ट साहित्याच्या माध्यमातून कट्टरतावादाचे विष पेरले जात आहे. त्यातूनच हा आरोपी तयार झाला असून, केवळ इतर धर्मीयांना लक्ष्य करण्याच्या जिहादी विचाराने तो प्रेरित झाला होता, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले. या तपासासाठी आता एटीएस आणि एनआयएची मदत घेतली जाणार आहे. आरोपीचे कुटुंब अमेरिकेत वास्तव्यास असून, तो स्वतःदेखील अनेक वर्षे परदेशात राहिला आहे. मुंबईत परतल्यानंतर तो कोणाच्या संपर्कात आला आणि या कट्टरतावादाच्या साखळीत अजून किती तरुण अडकले आहेत, याचा सखोल तपास केला जाईल, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली.

# दूषित पाण्यामुळे मंत्रालयातील शंभरहून अधिक कर्मचारी आजारी

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई :** राज्याचे प्रशासन ज्या वास्तूतून चालते, त्या मंत्रालयातील पाण्याच्या मुख्य टाकीत चक्क मेलेले मांजर आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. गेल्या आठवडाभरापासून हे दूषित पाणी प्यायल्याने १०० हून अधिक कर्मचाऱ्यांना विषबाधा झाली आहे. या कर्मचाऱ्यांना उलटी, जुलाब आणि तीव्र पोटदुखीचा त्रास होत असून, काहींवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.मंत्रालयातील अनेक विभागांमधील कर्मचारी एकाच वेळी आजारी पडू लागल्याने पाण्याचे नमुने आणि टाक्यांची तपासणी करण्यात आली. त्यावेळी मुख्य टाकीत मांजर मरून पडल्याचे आणि त्याचे अवशेष पाण्यात कुजल्याचे निदर्शनास आले. हेच पाणी पिण्यासाठी पुरवले जात असल्याने कर्मचारी आजारी पडल्याचे सूत्रांनी सांगितले. या घटनेनंतर प्रशासनाने टाक्यांची स्वच्छता केली आहे.मंत्रालयात येणाऱ्या अभ्यागतांना सुरक्षेच्या कारणास्तव स्वतःची पाण्याची बाटली आत नेण्यास बंदी आहे. त्यामुळे मंत्रालयात येणाऱ्या शेकडो सामान्य नागरिकांनाही तेथील टाकीचे पाणी प्यावे लागते. गेल्या आठवडाभरात राज्यभरातून कामानिमित्त मंत्रालयात आलेल्या नागरिकांनाही या दूषित पाण्यामुळे बाधा झाली असण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.



# वाढत्या उन्हाच्या झळांमुळे पशु पक्षीही आजारी



**तभा वृत्तसेवा**

**मुंबई :** मुंबईचा पारा पस्तीशीच्या घरात असून झळा मात्र चाळीशीच्या बसत आहेत. याचा पशुपक्ष्यांनाही त्रास होत आहे. डिहायड्रेशनमुळे मार्चपासून बैल घोडा रुग्णालयात दोनशे पशुपक्ष्यांना उपचारांसाठी दाखल करावे लागले आहे.पक्षी आकाशात संचार करत असताना रस्त्यावर, झाडांच्या फाद्यांवर, विजेच्या तारांवर अडकून पडत आहेत. त्यात त्यांचा जीव जाण्याच्या घटनाही घडत आहेत. एप्रिल महिन्याच्या आकडेवारीनुसार परळ येथील पशुवैद्यकीय रुग्णालयात ४६ घारी, ३५ कबुतरे, १५ कावळे, २ पोपट, २ बदक,२ मैना यांना उपचारांसाठी दाखल केले. यात घारी, कबुतरांचे प्रमाण सर्वाधिक आहे. याशिवाय १५ भटक्या कुत्र्यांवरही उपचार करण्यात आले आहेत.उष्णतेमुळे पक्ष्यांच्या शरीरातील पाणी कमी झाल्याने पक्षी, प्राणी डिहायड्रेट होत असल्याने ते जमिनीवर कोसळत आहेत. चिमणी, कावळा असे निपचीत पडले तर इतर प्राणी त्यांच्यावर हल्ला करीत आहेत. त्यामुळे जखमी झालेले पक्षी रुग्णालयात दाखल होत आहेत.

# लातूर जिल्ह्यात उष्माघाताचा चौथा बळी

## निलंगा तालुक्यातील पानचिंचोलीत ७० वर्षीय शेतकऱ्याचा मृत्यू



**तभा वृत्तसेवा**

**लातूर :** जिल्ह्यात सध्या सूर्याचा प्रक्षोभ पाहायला मिळत असून उन्हाच्या वाढत्या पाऱ्याने नागरिकांचे जगणे असह्य केले आहे. मंगळवार, दि. २८ एप्रिल रोजी दुपारी १ च्या सुमारास निलंगा तालुक्यातील पानचिंचोली येथे शेतात काम करत असताना ७० वर्षीय वृद्ध शेतकऱ्याचा उष्माघाताने दुर्दैवी मृत्यू झाला आहे. त्र्यंबक नारायण बेळंबे असे या मृत शेतकऱ्याचे नाव असून, जिल्ह्यातील उष्माघाताचा हा चौथा बळी ठरला आहे.

पान चिंचोली येथील रहिवासी असलेले त्र्यंबक बेळंबे हे मंगळवारी दुपारी १ वाजेच्या सुमारास आपल्या शेतात बैल चारत होते. यावेळी उन्हाची तीव्रता प्रचंड होती. काम करत असतानाच त्यांना अचानक चक्कर आली आणि ते जमिनीवर कोसळले. त्यांचा जागीच मृत्यू झाला. उन्हाच्या तीव्र झळा आणि वाढत्या तापमानामुळे त्यांचा उष्माघाताने मृत्यू झाल्याचे नातेवाईकानी सांगितले असून सदरील मयत शेतकऱ्यांच्या प्रेताची उत्तरीय तपासणी करून अंत्यविधीसाठी नातेवाईकाकडे प्रेत देण्यात आले असून पानचिंचोली येथील सार्वजनिक स्मशानभुमीत उष्माघाताने मृत्यू झालेल्या शेतकऱ्याचा अंत्यविधी करण्यात आला आहे.

लातूर जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून तापमानाचा पारा सातत्याने ४२ ते ४३ अंश सेल्सिअसच्या पुढे जात आहे. निलंगा तालुक्यातील कर्नाटक सीमावर्ती भागात असलेल्या औराद शहाजनी परिसरातही तापमानाने उच्चांक गाठला आहे. काही दिवसांपूर्वीच औराद शहाजनी येथे एका शेतकऱ्याचा आणि औसा तालुक्यातील गोंद्री येथे एका नऊ वर्षीय बालकाचा उष्माघाताने मृत्यू झाल्याची घटना ताजी असतानाच, आता पानचिंचोलीतील या घटनेने जिल्हा हादरला आहे.सध्या लग्नसराईचे दिवस असल्याने सर्वत्र गर्दी आहे. मात्र, दुपारच्या वेळी तापमानाचा पारा ४३ ते ४४ अंशांच्या पार जात असल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे. रस्त्यावर शुकशुकाट पसरला असून कडक उन्हामुळे शेतकरी आणि कष्टकरी वर्गाचे मोठे हाल होत आहेत.

लातूर शहरासह जिल्हाभरात प्रशासनाकडून दुपारच्या कडक उन्हाच्या वेळेत नागरिकांनी अत्यंत महत्वाचे काम असल्याशिवाय दुपारी घराबाहेर न पडण्याचे आवाहन करण्यात येत आहे. वाढत्या उष्म्यामुळे दुपारच्या दरम्यान रहदारीवरही परिणाम झाल्याचे निदर्शनास येत आहे. वाढत्या उष्णतेमुळे जिल्ह्यात भीतीचे आणि चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. वैद्यकीय अधिकारी या वाढत्या कार्यामुळे नागरिकांना काळजी घेण्यासंदर्भात सूचना देत असून त्याचे पालन करण्याचे आदेश प्रशासनाकडून वेळोवेळी दिले जात आहेत.

# बारावीचा निकाल ४ मे नंतर; विद्यार्थ्यांची प्रतीक्षा वाढली




**तभा वृत्तसेवा**

**पुणे :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून बारावी परीक्षेचा निकाल जाहीर करण्याची जय्यत तयारी करण्यात आली असून, येत्या ४ मेनंतर कधीही निकाल जाहीर केला जाणार असल्याची माहिती राज्य मंडळातील विश्र्वसनीय सूत्रांनी दिली आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक मंडळातर्फे१० फेबुवारी ते १८ मार्चदरम्यान बारावीची परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेसाठी १० हजार ६६४ शाळा-कनिष्ठ महाविद्यालयांतील १५ लाख ३२ हजार ४८७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून, गेल्या वर्षीच्या तुलनेत बारावीची विद्यार्थिसंख्या सुमारे २७ हजारांनी वाढली आहे.सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, राज्य मंडळाकडून बारावीचा निकाल तयार करण्याचे काम जवळपास अंतिम टप्प्यात आहे. येत्या ३० एप्रिलला निकाल लावण्याची तयारी राज्य मंडळाने केली होती. परंतु, काही तांत्रिक कारणास्तव हा निकाल पुढे जाण्याची शक्यता आहे. त्यानंतर १ मे रोजी महाराष्ट्र दिन आणि पुढे शनिवार, रविवार आल्यामुळे ४ मे नंतर निकाल जाहीर करण्याचे निश्र्चित केले आहे. त्यामुळे एकतर ३० एप्रिल किंवा ४ मेनंतर राज्य मंडळाच्या बारावीचा निकाल कधीही जाहीर केला जाणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

# पाकिस्तानचा अफगाणिस्तान विद्यापीठावर हल्ला, ७ जणांचा मृत्यू

**वृत्तसंस्था**

**काबुल :** अफगाणिस्तान आणि पाकिस्तान यांच्यातील संघर्ष पुन्हा तीव्र झाला आहे. तालिबान सरकारने दावा केला की पाकिस्तानने सोमवारी अफगाणिस्तानवर मोर्टार आणि रॉकेट हल्ले केले. हल्ल्यांमध्ये किमान ७ लोकांचा मृत्यू झाला, तर ७५ हून अधिक लोक जखमी झाल्याचे सांगण्यात येत आहे. जखमींमध्ये विद्यापीठाचे विद्यार्थी, मुले आणि सामान्य नागरिक यांचा समावेश आहे. स्थानिक अधिकाऱ्यांनी सांगितले की, राजधानी असदाबादमध्ये घरांसोबतच सैयद जमालुद्दीन अफगाणी विद्यापीठालाही लक्ष्य करण्यात आले.तालिबान सरकारचे



उपप्रवक्ते हमदुल्लाह फितरत यांनी आरोप केला आहे की, हे हल्ले पाकिस्तानकडून करण्यात आले आहेत.त्यांचे म्हणणे आहे की, सोमवारी दुपारी २ वाजता सुरू झालेल्या या हल्ल्यांमध्ये मोर्टार आणि रॉकेट डागण्यात आले. दुसरीकडे, पाकिस्तानने हे आरोप पूर्णपणे फेटाळून लावले आहेत. पाकिस्तानच्या माहिती मंत्रालयाचे म्हणणे आहे की, विद्यापीठ आणि निवासी भागांना लक्ष्य केल्याच्या बातम्या पूर्णपणे चुकीच्या आहेत. यापूर्वी रविवारी अफगाणिस्तानच्या कंदाहार प्रांतात पाकिस्तानसोबतच्या सीमेवर पुन्हा हिंसक चकमकीची घटना घडली होती. सूत्रांच्या हवाल्याने दावा केला की, स्पिन बोल्डक परिसरात रात्रीच्या वेळी दोन्ही बाजूंनी गोळीबार झाला.यात पाकिस्तानचे सहा सैनिक मारले गेले. एका सैनिकाला ओलीस ठेवून नेण्यात आल्याचेही सांगण्यात आले. मध्यरात्री चालवलेल्या या ऑपरेशनमध्ये तालिबानी सैनिक पाकिस्तानी सैनिकांची शस्त्रेही घेऊन गेले होते. मात्र, या दाव्यांची अद्याप स्वतंत्रपणे पुष्टी झालेली नाही. असे सांगितले जात आहे की, ही चकमक तेव्हा सुरू झाली जेव्हा रात्री उशिरा पाकिस्तानकडून सीमापार गोळीबार झाला, ज्यात एका स्थानिक मुलाचा मृत्यू झाला. यानंतर तालिबानने प्रत्युत्तर दिले.हि घटना अशा वेळी घडली आहे, जेव्हा दोन्ही देशांमध्ये आधीच तणाव आहे. पाकिस्तानने मार्चमध्ये राजधानी काबुलमधील एका व्यसनमुक्ती केंद्रावरही हल्ला केला होता, ज्यात ४०० हून अधिक लोकांच्या मृत्यूचा दावा करण्यात आला होता. दोन्ही देशांनी मार्चमध्ये युद्धबंदी (सीजफायर) केली होती, ज्यामुळे अनेक आठवड्यांपासून सुरू असलेल्या रक्तरंजित चकमकी थांबल्या होत्या, पण आता परिस्थिती पुन्हा बिघडताना दिसत आहे. चीन व्यतिरिक्त तुर्कस्तान, कतार, संयुक्त अरब अमिराती आणि सौदी अरेबियानेही हा वाद मिटवण्याचा प्रयत्न केला आहे.

# अराघचींचा ४८ तासांत तिसरा पाक दौरा; शांतता प्रयत्नांना वेग

**इस्लामाबाद :** इराणचे परराष्ट्रमंत्री अब्बास अराघची आज म्हणजेच मंगळवार २८ एप्रिल रोजी पुन्हा एकदा पाकिस्तानमध्ये पोहोचले आहेत. गेल्या ४८ तासांतील इस्लामाबादचा हा त्यांचा तिसरा दौरा आहे. रशियाचा दौरा पूर्ण केल्यानंतर त्यांनी ही भेट दिली आहे. अमेरिकेसोबत सुरू असलेला संघर्ष संपवण्यासाठी सुरू असलेल्या व्यापक राजनैतिक प्रयत्नांचा हा भाग असल्याचे मानले जात आहे.अराघची यांच्या वारंवार पाकिस्तान दौऱ्यांमुळे सध्याच्या परिस्थितीत इस्लामाबाद शांतिदूताची भूमिका बजावत असल्याचे संकेत मिळत आहेत. विशेषतः, इराण आणि अमेरिका यांच्यातील अप्रत्यक्ष संवाद सुलभ करण्यामध्ये पाकिस्तानची भूमिका महत्त्वाची ठरत असल्याचे या भेटीतून स्पष्ट होते.यापूर्वी अराघची यांनी सेंट पीटर्सबर्ग येथे रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्यासोबत चर्चा केली होती. या बैठकीत द्विपक्षीय संबंध आणि प्रादेशिक घडामोडींवर भर देण्यात आला. निवेदनात अराघची यांनी सांगितले की, ही बैठक दीड तासांहून अधिक काळ चालली आणि त्यामध्ये अमेरिका व इस्रायलने लादलेल्या युद्ध आणि आक्रमकतेच्या मुद्द्यावर सविस्तर चर्चा झाली.इराणी परराष्ट्रमंत्र्यांनी म्हटले, राष्ट्राध्यक्ष पुतिन यांच्यासोबतची आमची बैठक अत्यंत सकारात्मक झाली. यात द्विपक्षीय संबंध, प्रादेशिक प्रश्र्न तसेच अमेरिका आणि झायोनी शासनाने लादलेल्या युद्ध व आक्रमकतेच्या मुद्द्यावर विस्तृत चर्चा झाली.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

# सॅमसंग इंडियाकडून उत्साहवर्धक सॅमसंग फायनान्सप्लस ऑफर्स लाँच

छत्रपती संभजीनगर – सॅमसंग इंडियाने देशभरातील ग्राहकांसाठी आपले स्मार्ट होम अप्लायन्सेस अधिक सुलभरित्या उपलब्ध करण्यासाठी सॅमसंग फायनान्स प्लस अंतर्गत नवीन योजना लाँच केल्या आहेत. ग्राहक आता सॅमसंगचे अप्लायन्सेस जसे रेफ्रिजरेटर्स, वॉशिंग मशिन्स, एसी आणि मायक्रोवेव्ह खरेदी करण्यासाठी सुलभ फायनान्स पर्यायांचा लाभ घेऊ शकतात. ही सेवा देशभरातील ८००० हून अधिक स्टोअर्समध्ये उपलब्ध आहे. सॅमसंग फायनान्स प्लस खरेदीची प्रक्रिया सुलभ करण्यासाठी डिझाइन केले आहे. यातील 'ईझी ईएमआय फॉर ऑल' पर्यायाद्वारे फक्त पाच मिनिटांत पूर्णपणे डिजिटल आणि कागदविरहित प्रक्रिया पूर्ण होते. दिवसाला फक्त ३३ रुपयांपासून सुरू होणाऱ्या परवडणाऱ्या ईएमआय पर्यायांमुळे हे सोल्यूशन पहिल्यांदाच कर्ज घेणाऱ्यांसाठी आणि ज्यांची कोणतीही क्रेडिट हिस्ट्री नाही अशा व्यक्तींसाठी अत्यंत सोयीचे आहे.

## सॅमसंगचे नवीन बीस्पोक एआय विंडफ्री एसी तापमान वाढत

छत्रपती संभजीनगर – सॅमसंग इंडियाने बीस्पोक एआय विंडफ्री इन्व्हर्टर स्प्लिट एसी श्रेणी लाँच केली आहे. यामध्ये विविध विभागांतील २३ मॉडेल्सचा समावेश आहे आणिए त्यांची किंमत ३२,९४० रुपयांपासून सुरू होते. हे नवीन एसी एआय फास्ट आणि कंफर्ट कूलिंग तंत्रज्ञानाने सज्ज आहेत, तसेच एआय एनर्जी मोड ३० टक्क्यांपर्यंत ऊर्जेची बचत करतात. सॅमसंगची एआय फास्ट व कंफर्ट कूलिंग यंत्रणा वापरकर्त्यांच्या वापराच्या पद्धतींचे आणि रूममधील परिस्थितीचे आपोआप विश्लेषण करते. त्यानंतर त्वरित थंडावा देण्यासाठी फास्ट कूलिंग मोड सक्रिय करते, ज्यामुळे ग्राहकांना कडक उन्हात त्वरित थंडावा आणि आराम मिळतो.

## कलर टच पॅनेलसह एफ 11 वॉशिंग मशीन लाँच

मुंबई : हेयर ,एफ 11 वॉशिंग मशीन भारतातील एकमेव अल्ट्रा एअर फ्रेश टेक्नॉलॉजीद्वारे कपडे १२ तासांपर्यंत सुपर फ्रेश ठेवते, धुतल्यानंतर कपडे आत राहिले तरी दुर्गंध येणार नाही याची खात्री देते. त्याच्या आकर्षक डिझाइनसोबत फुल एआय कलर टच पॅनेल असून त्यात साड्या, जीन्स आणि कॉटनसारख्या कपड्यांसाठी मोठी चिन्हे आणि स्वतंत्र प्रोग्राम आहेत, जे रोजचा वापर सोपा बनवतात. या वॉशिंग मशीनमध्ये एसेंस वॉश टेक्नॉलॉजी असून ती कपड्यांच्या भारानुसार आपोआप डिटर्जंट कमी-जास्त करते, त्यामुळे अपव्यय कमी होतो.झटपट विरघळणारे प्रीमिक्स टेक्नॉलॉजी जलद आणि प्रभावी डिटर्जंट विरघळण्यासाठी प्रीमिक्स मायक्रोबबल सोल्यूशन तयार करते.

## आयडीएफसी फर्स्ट बँकेत वाढ नोंदवली

मुंबई :आयडीएफसी फर्स्ट बँकेच्या संचालक मंडळाने आज झालेल्या बैठकीत 31 मार्च 2026 रोजी संपलेल्या तिमाही आणि संपूर्ण आर्थिक वर्षासाठीचे ऑडिट केलेले आर्थिक निकाल मंजूर केले आहेत.निकालांवर भाष्य करताना, व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. व्ही. वैद्यनाथन म्हणाले, "बँकेची मालमत्ता गुणवत्ता स्थिर राहिली आहे. आम्ही नेहमीच नमूद केले आहे की मायक्रो-फायनान्स पोर्टफोलिओ वगळता सर्व व्यवसायांची मालमत्ता गुणवत्ता चांगली कामगिरी करत आहे, कारण आर्थिक वर्ष 25 आणि आर्थिक वर्ष 26 दरम्यान हा मुद्दा संपूर्ण उद्योगासाठी होता. त्यामुळे मायक्रो-फायनान्सचा प्रश्न मागे पडल्याने जीएनपीए आणि एनएनपीए अनुक्रमे 1.61टक्के आणि 0.48टक्के या आरोग्यदायी स्तरावर आले आहेत.

## 'मॅक्स करो, रिलॅक्स करो', या जाहिरातीत झळकणार अक्षय कुमार

मुंबई: जेके सिमेंटचा संपन्न वारसा आणि उत्कृष्टता जपणाऱ्या जेके मॅक्स पेंट्सतर्फे नुकतीच 'मॅक्स करो, रिलॅक्स करो' ही त्यांची नवी जाहिरात सादर करण्यात आली. या ब्रँडचे अम्बेसेडर अक्षय कुमार पहिल्यांदाच या जाहिरातीत दिसणार आहेत. या बॉलिवुड सुपरस्टारसोबतच्या सहकार्यातून ब्रँडच्या प्रगतीच्या नव्या अध्यायाला सुरुवात झाली आहे. जेके वॉलमॅक्स या त्यांच्या मुख्य उत्पादनाच्या यशाने तयार केलेल्या भक्कम पार्श्वभूमीवर हे उत्पादन सादर झाले आहे. लोकांना आपलेसे वाटणारे आणि त्यांना आकर्षित करणारे भाष्य असणाऱ्या या जाहिरातीत ब्रँडची मूळ तत्वे सहजपणे प्रतित झाली आहेत.

## ब्रिटानियाने आपल्या ५०-५० या प्रीमियम श्रेणीचा विस्तार केला

मुंबई: : ब्रिटानिया इंडस्ट्रीजच्या प्रतिष्ठित ५०-५० ब्रँडने आपल्या अशा वैशिष्ट्यपूर्ण दुहेरी स्वादाने ग्राहकांना देत भारतातील स्नॅकिंग संस्कृतीत गेल्या तीन दशकांहून अधिक काळात आपली एक वेगळी ओळख व स्थान निर्माण केले आहे.या टप्प्याचे औचित्य साधत, ब्रिटानियाने ब्रिटानिया ५०-५० चीज डिप्ड आणि कॅरामेल डिप्ड क्रंची लेयर्ड सँडविचेस सादर केले असून, ही नवी श्रेणी ब्रँडच्या दुहेरी संकल्पनेचे पुनर्मूल्यांकन करते.हे चीज आणि कॅरामेल डिप्ड क्रंची लेयर्ड सँडविचेस ब्रँडच्या दुहेरी संकल्पनेला नव्या स्वरूपात पुढे नेतात. या सँडविचेसमधील बावीस बेक्ड स्तरांमुळे एक कुरकुरीतपणा निर्माण होतो. तसेच चीज आणि कॅरामेलच्या आवरणामुळे तोंडात सहजपणे वितळण्याचा सुखद अनुभव देतात. हा या नवीन उत्पादनांच्या टेक्स्चरमधील एक विरोधाभास आहे.

## आपुलकीचा आणि घरगुती ऊबदारपणाचा अनुभव व्यक्त केला

महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने सोनी सब चे कलाकार – नितीन बाबू, रजत वर्मा, मुस्कान बामने, इक्रबाल खान आणि सचिन कावेथम यांनी या राज्याशी असलेल्या आपुलकीच्या नात्याबद्दल मनापासून भावना व्यक्त केल्या. वेगवेगळ्या शहरांतून स्वप्नांच्या मागे मुंबईत आलेल्या अनेकांसाठी महाराष्ट्र हा संधी, स्वीकार आणि प्रगतीचा प्रदेश ठरला आहे. केवळ मनोरंजन उद्योगाचे केंद्र म्हणून नव्हे, तर आपल्या उबदारपणाने आणि समावेशकतेने या राज्याने त्यांना वैयक्तिक आणि व्यावसायिक आयुष्य घडवून दिले आहे. समृद्ध परंपरा, रंगीबेरंगी संस्कृती आणि जलद गतीचे पण आपुलकीने भरलेले जीवन यामुळे महाराष्ट्राने कलाकारांच्या मनावर कायमचा ठसा उमटवला आहे.

## मनीष वाधवा दिसणार भीष्म पितामह च्या भूमिकेत

सोनी सब आपल्या कथाकथनाचा पट विस्तारत हस्तिनापुर के वीर घेऊन येत आहे – एक पौराणिक गाथा जी पांडव आणि कौरवांच्या सुरुवातीच्या प्रवासाचा मागोवा घेते. या कथेला अधिक गाम्भीर्य आणि प्रभावी उपस्थिती देत, दिग्गज अभिनेता मनीष वाधवा आयकॉनिक भीष्म पितामहची भूमिका साकारताना दिसणार आहेत – कुरु वंशाचे रक्षक, ज्यांचे आयुष्य त्याग, कर्तव्य आणि नेतृत्वाच्या गुंतागुंतीचं प्रतीक आहे.

## तक्षशिला-२०२६ भरती प्रक्रियेतून विकसित भारत उद्दिष्टाला बळकटी

मुंबई: :ट्रायडंट लिमिटेड ही ट्रायडंट ग्रूपची मुख्य कंपनी आणि भारतातील आघाडीचा उद्योग समूह आहे. या कंपनीने भारतभरात चालणाऱ्या त्यांच्या तक्षशीला भरती उपक्रमाच्या २५ व्या पर्वाला सुरुवात केली आहे. तीन वर्षांचा अनुभव असणाऱ्या २००० हून अधिक तरुण पदवीधर आणि डिप्लोमाधारकांना या उपक्रमाअंतर्गत त्यांच्या उत्पादन कामकाजाशी संबंधित सर्व विभागांमध्ये संधी दिली जाईल. या भरती उपक्रमाचा भाग म्हणून टेक्सटाईल ऑपरेशन्स, इंजिनीअरिंग, क्वॉलिटी, अकाऊंट्स, सप्लाय चेन, इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, ॲडमिन आणि एचआर अशा तांत्रिक आणि ऑपरेशनल जबाबदाऱ्यांसाठी ट्रायडंटतर्फे अर्ज मागवले जात आहेत.

# सोयगाव तालुक्यातील फर्दापूर ते सावळदबारा 33 केव्ही लाईन साठी 8 कोटी मंजूर

## मुलतानी यांच्या प्रयत्नाला यश

तभा.वृत्तसेवा
सोयगाव,दि.२६ एप्रिल

सोयगाव तालुक्यातील सावळदबारा ३३ केव्ही साठी जी लाईन सध्या सुरू होती ती लाईन बुलढाणा जिल्ह्यातील मोताळा येथून सुरू होती व फार जुनी लाईन असल्यामुळे तारा तुटणे व बुलढाणा जिल्ह्यामध्ये ओव्हर लोड झाले की सावळदबाराची लाईन बंद होत होती, व लाईन बुलढाणा जिल्हा देत होता व बिल वसुली छत्रपती संभाजीनगर जिल्हा करत होता त्यामुळे फॉल्ट काढण्यासाठी कोणीच गांभीर्याने घेत नव्हते त्यामुळे सावळदबारा भागात लाईनची मोठी समस्या होती हा विषय सोडवण्यासाठी भाजपा अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष इद्रिसजी मुलतानी यांनी राज्याच्या मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे सर्व जिल्ह्याची लाईन फर्दापूर ते सावळदबारा मंजूर करा असे निवेदन दिले होते,मुख्यमंत्री



यांनी कार्यवाही करण्याचे आदेश दिले त्या अनुषंगाने मुख्य अभियंता वीज वितरण छत्रपती संभाजीनगर यांनी फर्दापूर ते सावळदबारा ३३ केव्ही ची नवीन ४२ किलोमीटर लाईन टाकण्यासाठी ८ कोटी रुपये खर्चाचा प्रस्ताव शासनास सादर केले होते मागच्या आठवड्यात ऊर्जा राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांनी शासन स्तरावर बैठक घेऊन लाईन मंजूर करण्याचे आदेश दिले होते त्या अनुषंगाने मुख्य कार्यालय मुंबई यांनी मंजूरि दिले असून तावडतोड काम मंजूर होणार आहे असे आश्वासन मंत्री ताईंनी दिले होते.

काम झाल्यामुळे या गावाचा विजेचा कायमचा प्रश्न दूर होणार आहे. सावळदबारा भागामध्ये पाच मध्यम प्रकल्प असून त्यामध्ये पाण्याचा साठा मोठ्या प्रमाणामध्ये आहे पाणी असून वीज नसल्यामुळे शेतकऱ्यांना रब्बी पिक घेता येत नव्हता दोन्ही ठिकाणची जर लाईन या शेतकऱ्यांना मिळाली तर हा भाग सुजलाम सुफलाम झाल्याशिवाय राहणार नाही. जिल्हा परिषद निवडणुकीमध्ये ह्याच मुद्द्यावर निवडणुकीत प्रचार प्रसार सुरू होता,आता हेच काम मंजूर झाल्यामुळे त्या भागाचा विजेचा साठा मोठ्या प्रमाणात मिळणार असून त्या भागातील सर्व शेतकऱ्यांना फायदा होणार आहे सर्व जिल्ह्यातून वीज मिळणार आहे व ती बुलढाणा जिल्ह्यातील मोताळा येथील सुद्धा वीज तसीच राहणार आहे, दोन लाईन सावळबाराला मिळणार आहे.

(मी जिल्हा परिषद च्या निवडणुकीत वीज मंजूर करण्याचे आश्वासन त्या भागातील लोकांना दिले होते, हे काम मुख्यमंत्री व ऊर्जा राज्यमंत्री यांच्यामुळे झाले.त्या बद्दल सावळदबारा भागातील जनतेच्या वतीने लवकरच सत्कार करणार आहे या कामाच्या मंजुरीसाठी अतुलजी सावे व रावसाहेब दानवे पाटील,विश्वास पाठक यांचे सहकार्य लाभलेले आहेत

# गाव ते ग्लोबल करिअर कॅम्प कन्नडमध्ये उत्साहात संपन्न

## महाराष्ट्रभरातून ४०० हून अधिक विद्यार्थ्यांचा सहभाग; १४ तज्ज्ञांचे मार्गदर्शन

तभा वृत्तसेवा

कन्नड - दि. २५ एप्रिल - ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावरील करिअरच्या संधींबाबत मार्गदर्शन करण्याच्या उद्देशाने आयोजित 'गाव ते ग्लोबल – वर्सटाइल सायंटिस्ट करिअर कॅम्प २०२६' हा दोन दिवसीय उपक्रम कन्नड येथील नवोदय महाविद्यालय परिसरात उत्साहात पार पडला. या कॅम्पमध्ये महाराष्ट्रातील विविध भागांतून ४०० हून अधिक विद्यार्थी, पालक व शिक्षक सहभागी झाले होते.

या कॅम्पचे आयोजन वर्सटाइल सायंटिस्ट या संस्थेच्या वतीने करण्यात आले होते. संस्थेचे संस्थापक व अमेरिकेत पोस्टडॉक्टोरल संशोधक म्हणून कार्यरत असलेले डॉ. नामदेव




तोगरे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला.

कार्यक्रमात एकूण १४ तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रांतील करिअरविषयक माहिती दिली. यामध्ये परदेशातील शिक्षण, सरकारी नोकरी, कृषी क्षेत्रातील संधी, स्पर्धा परीक्षा, IISER व CUET-PG प्रवेश प्रक्रिया, तसेच भाषा कौशल्य यांसारख्या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.

ग्रामीण विद्यार्थ्यांना योग्य माहितीअभावी करिअरच्या संधींपासून वंचित राहावे लागते. ही दरी कमी करण्यासाठी हा कॅम्प उपयुक्त ठरल्याचे आयोजकांनी सांगितले. "गावातूनही जागतिक स्तरावर यश मिळवता येते, यासाठी योग्य दिशा आवश्यक आहे," असे मत डॉ. नामदेव तोगरे यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी योगेश साळुंखे, डॉ. प्रियांका भोज, यादव बल्लुरे, प्रफुल्ल ढेपे यांनी नियोजन व समन्वय साधला. तसेच स्थानिक पातळीवर संजय केवट, किशोर क्षीरसागर, महेश सोनवणे व स्वाती महानंदा यांनी सहकार्य केले.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांना जर्मनीतील शिक्षण, अमेरिकेतील फंडेड पीएचडी आणि विविध राष्ट्रीय पातळीवरील संधींबाबत मार्गदर्शन मिळाल्याने हा कॅम्प विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरला.

वर्सटाइल सायंटिस्ट संस्था भविष्यातही अशा उपक्रमांद्वारे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याचा संकल्प करत असल्याचे आयोजकांनी सांगितले.

# एलोरा टॅलन्ट् सर्च परिक्षेमधील गुणवंताचा गौरव

छत्रपती संभाजीनगर: बीड बायपास रोडवरील एलोरा इंग्रजी स्कूल ॲण्ड सायन्स ज्यू. कॉलेजमध्ये एलोरा टॅलन्ट् सर्च परिक्षेत नर्सरी ते 9 वी पर्यंत विदयार्थ्यांनी सहभाग घेतला त्यामधील गुणवंत नर्सरी मधील जान्हवी वाघ, कौशल अवसारे, प्रांजल गाडेकर, पल्लवी काळे, ज्यू. के.जी मधून रेयांश फरताडे, रूद्रांश टे, भक्ती डोंगरे, सिया गुणावत, सिनियर के.जी मधून संस्कृती दिख्खत, आदित्य दुसड, वल्लभ कोरडे, सई कोटकर, गुंजन डाके, इयत्ता 1ली मधील नक्ष राठोड, हर्षसिंग चितोडीया, आरोही भोसले, 2री मधील युवराज निळ, शर्वरी राठोड, विवांन दवांडे, कैवल्य काळे, प्रणवी चव्हाण, पूरब निलाखे, आयान राठोड, चैतन्य घुले, इयत्ता 3 री मधील चैतन्य भोने, आराध्या राठोड, स्वराज बोरूडे, आराध्या पवार, अर्णव काथार,




आनंदी अग्निहोत्री, अवनी राणा, ओम दामले, इयत्ता 4 थी मधील अक्षरा चंदनशिव, स्वरा घोले, स्वराज डोंगरे, अर्णव चैधरी, आदित्य कल्लेपवार, रिध्दी सोहळे, समृध्दी वाकेकर, सई टकसाळ, स्वराज राठोड, तनुजा लोखंडे, इयत्ता 5वी मधील आरोही चोपडे, आराध्या जायभाये, स्वरा गाडेकर, संस्कृती जगताप, प्रियल जाधव, इयत्ता 6 वी मधील' यषार्थ भोने, समृध्दी राख, दक्ष राठोड, मृणाल चोपडे, आरोही राठोड, रजत लोळगे, मानव जाधव, श्रेयस डावकर, तनुजा नरके, ज्ञानेष्वरी फसाटे, इयत्ता 7 मधील ईषांनी राठोड, यष गायके, धनश्री सुर्या, काव्या चव्हाण, अव्दैत कुलकर्णी, श्रैया कुंभार, सुरूची वांडे, रूत्वी बडगु, इयत्ता 8वी मधील मनिष चव्हाण, गायत्री कांळूखे, अस्मिता उघडे, गार्गी आहिरे, श्लोक बडे, वैष्णवी ब्रम्हणात, आराध्या राठोड, गौरांगी औटे, इयत्ता 9 वी मधील ऋतुजा सोहळे, निधी साठे, सारंग महाले, चिन्मयी मोहरीर, श्रावणी कोटीये, प्रज्वल ढाकणे,

आदी गुणवंत विद्यार्थी पालकांचा शाळेच्या मुख्याध्यापिका संगीता शिंदे यांच्या हस्ते मेडल देवून सत्कार करून विद्यार्थी पालक व शिक्षकांचे कौतूक व अभिनंदन केले.

## संकट मोचन हनुमान सोनी पल वर प्रीमियर

मुंबई : सोनी पल, भारतातील लोकप्रिय फ्री-टू-एअर मनोरंजन वाहिनी, विविध प्रकारच्या दर्जेदार कार्यक्रमांसाठी ओळखली जाते. ही वाहिनी अभिमानाने संकट मोचन हनुमान या पौराणिक मालिकेच्या प्रीमियरची घोषणा करत आहे. अनेक पिढ्यांना प्रेरणा देणारी ही कालातीत मालिका आता सोनी पल वर नव्या रूपात सादर होत असून, प्रेक्षकांना भगवान हनुमानांच्या पराक्रमाची भव्य गाथा पुन्हा अनुभवण्याची संधी मिळणार आहे. या महाकथेच्या केंद्रस्थानी आहेत भगवान हनुमान भक्ती, शक्ती आणि धैर्य यांचे प्रतीक असलेले 'सुपरहिरो'. त्यांचा प्रवास शौर्य आणि अखंड निष्ठेने भरलेला आहे, जो सर्व वयोगटातील प्रेक्षकांच्या मनाला भिडतो आणि श्रद्धा, धर्मनिष्ठा व निःस्वार्थ सेवेसारख्या शाश्वत मूल्यांची आठवण करून देतो.

मा. दिवाणी न्यायाधिश, क. स्तर, सोयगांव यांचे न्यायालय, जि. औरंगाबाद.

// जाहिर प्रगटन //

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. ८७/२०२६.

अर्जदार :- १. गणेश दगडु चौधरी, ४६ वर्षे, धंदा, नोकरी, २. नारायण दगडु चौधरी, वय. ४१ वर्षे, धंदा. मजुरी, दोघेही रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर, ३. संगिता संभाजी पाटील, वय. ४९ वर्षे, धंदा. घरकाम, रा. २८४, गांधी कुटीर, उधना सुरत सिटी, उधना, सुरत.

-विरुध्द-

गैरअर्जदार :- कोणीही नाही,

प्रकरण :- वारस प्रमाण-पत्र मिळणें बाबत.

सर्व संबंधितांस या जाहीर प्रगटणांद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेंसाठी ॲड. वाय. आर. जावळे, सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयांत अर्ज केलेला आहे. मयत लिलाबाई दगडु चौधरी हे दि. १५/०४/२०२५ रोजी मौजे. सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर येथे त्यांचा मृत्यु झालेला असुन, त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे वारस आहे असा अर्ज न्यायालयांत वकीलांमार्फत दाखल आहे. अर्जदार क्रं. १ ते ३ हे मयत लिलाबाई दगडु चौधरी यांचे एकमेव वारस असुन त्यांना शासकिय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्यांकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहिर प्रगटनांद्वारे प्रसिध्द झाल्यांपासुन ३० दिवसांच्या आंत या न्यायालयांत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यांसह ऊजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशिररीत्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यांत येईल, पुढील तारीख : १०/०६/२०२६

आज दि.२७/०४/२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यांसह दिले.

आदेशांवरून

विभागीय लिपीक, सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय, क. स्तर, सोयगांव.

जाहीर प्रगटण / सायटेशन नोटीस

मा. दिवाणी न्यायाधिश साहेब क स्तर न्यायालय गंगापुर जि. औरंगाबाद

सिव्हील एम.ए. क्र.२६०/२०२६

अर्जदार:- १) तुकाराम पुंजाजी सोनवणे वय ७४ वर्षे धंदा शेतीरा, भावसिंगपुरा, औरंगाबाद २) वाल्मिक पुंजाजी सोनवणे वय ६५ वर्षे धंदा शेती रा. तांदुळवाडी ता. गंगापुर ह.मु. म्हाडा कॉलनी, गंगापुर ता. गंगापुर जि. औरंगाबाद ३) अशोक पुंजाजी सोनवणे, बय ६८ वर्षे धंदा शेती रा. नागसेन नगर, उस्मानपुरा, औरंगाबाद ४) चंद्रकला भ्र. आसाराम सोनवणे वय ६३ वर्षे, धंदा गृहिणी, रा. मुकुंदवाडी, औरंगाबाद ५) सौ. संगिता बाळु त्रिभुवन वय ४५ वर्षे धंदा गृहिणी रा. मुकुंदवाडी, औरंगाबाद ६) सौ. सुनिता संजु निकाळजे, वय ४३ वर्षे धंदा गृहणी रा. नवनाथ नगर, गारखेडा परिसर, औरंगबाद ७) विनोद पि. आसाराम सोनवणे वय ४२ वर्षे धंदा मजुरी ८) सतिप पि. आसाराम सोनवणे वय ४० बर्षे धंदा मजुरी, दोघे रा. मुकुंदवाडी, औरंगाबाद ९) शोभावाई भ्र. पोपट सोनवणे वय ६२ वर्षे धंदा गृहिणी रा. आंबेडकर नगर, सिडको, औरंगाबाद १०) सौ. उज्वला विलास रोकडे वय ४३ वर्षे, धंदा गृहिणी रा. बकवाल नगर, नायगाव ता. गंगापुर जि. औरंगाबाद ११) दिनेश पोपट सोनवणे वय ३९ वर्षे धंदा मजुरी रा. आंबेडकर नगर, सिडको, औरंगाबाद १२) दिपक पोपट सोनवणे वय ३७ वर्षे धंदा मजुरी रा. आंबेडकर नगर, सिडको, औरंगाबाद १३) सिमा भ्र. प्रमोद सोनवणे वय ३३ वर्षे धंदा गृहिणीरा. सिकंदर कॉलनी, मिसरवाडी, औरंगाबाद १४) राजन पि. प्रमोद सोनवणे वय १५ वर्षे, धंदा शिक्षण द्वारा अ.पा.क. आई अर्जदार क्र.१३ १५) कोमल पि. प्रमोद सोनवणे वद्य १३ वर्षे, धंदा शिक्षण द्वारा अ.पा.क. आई अर्जदार क्र.१३

विरुध्द

गैरअर्जदार :-निरंक

प्रकरण:- कलम २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट प्रमाणे वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. डि. के. तारु यांच्या मार्फत अर्ज सादर केला की, अर्जदार हे वर नमुद ठिकाणचे रहिवाशी असून अर्जदार क्र. १ ते ३ यांचे वडील नाम पुंजावा उर्फ पुंजाजी लक्ष्मण सोनवणे हे दिनांक ०५/०५/२००२ रोजी मौजे दिनवाडा ता. गंगापुर येथे मयत झालेले असून अर्जदार क्र.१ ते ३ यांची आई नाम सुंदराबाई या देखील दिनांक ३१/०७/२०१३ रोजी मयत झालेल्या आहेत. पुंजाया उर्फ पुंजाजी यांची आई नामे गोदाबाई या पुंजाचा यांच्या पुर्वी मयत झालेल्या आहे. मयत पुंजावा आणि सुंदराबाई यांना अर्जदारांशिवाय अन्य दोन मुले आसाराम व पोपट ही देखील होती त्यापैकी आसाराम हे दिनांक १२/०८/२०१३ रोजी तर पोपट हे दिनांक २६/०४/२०१७रोजी मयत झालेले आहे. मवत आसाराम यांच्या पश्चात अर्जदार क्र.४ ते ८ हे वारस असून अर्जदार क्र.४ ही अर्जदार क्र.५ ते ८ यांची आई आहे. त्याच प्रमाणे पोपट यांचे मृत्यु पश्चात अर्जदार क्र.९ ही विधवा पत्नी तर अर्जदार क्र.१० ते १२ ही अपत्ये आणि अन्य एक मुलगा नामे प्रमोद जो दिनांक १७/०७/२०२२ रोजी मयत झालेला आहे, त्यास अर्जदार क्र.१३ ही विधवा पत्नी तर अर्जदार क्र.१४ व १५ ही अपत्ये आहेत. मयत पुंजाबा उर्फ पुंजाजी लक्ष्मण सोनवणे यांना वर नमूद अर्जदारांशिवाय अन्य कोणीही ज्ञात कायदेशीर वारसदार नसल्याचे नमुद करून अर्जदारांनी या न्यायालयात वारसप्रमाणपत्राची मागणी केली आहे.

त्याअर्थी तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदाराच्या प्रस्तूत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप उजर असेल तर संबंधीतांनी त्यांचा असलेला आक्षेप, उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुद्तीनंतरचा आक्षेप, उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केल्याप्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आन दिनांक २२/०४/२०२६ दिलं. प्रकरणात पुढील तारीख दिनांक १९/०६/२०२६ रोजीची ठेवण्यात आलेली आहे.

वरीष्ठ / कनिष्ठ लिपीक. सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर गंगापूर

# पवन सोनवणे यांची निवड



तभा वृत्तसेवा

पैठण दि २७ :- छत्रपती संभाजीनगर शहर भारतीय जनता युवा मोर्चाच्या शहर सरचिटणीस पदी पवन सोनवणे यांची निवड करण्यात आली असून खासदार डॉ भागवत कराड, मंत्री अतुल सावे, आमदार संजय केनेकर, जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे यांच्या हस्ते भाजपा संपर्क कार्यालयात त्यांना नियुक्ती पत्र देण्यात आले.

या जबाबदारीसाठी माझ्यावर विश्वास दाखविल्याबद्दल मी पक्षश्रेष्ठी व पक्षातील सर्व वरिष्ठ पदाधिकारी यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करतो. पक्षाने दिलेल्या या जबाबदारीचे प्रामाणिकपणे पालन करून, संघटनेच्या बळकटीसाठी आणि समाजाच्या सेवेसाठी सदैव प्रयत्नशील राहीन, अशी ग्वाही देत असल्याची प्रतिक्रिया यावेळी पवन सोनवणे यांनी दिली.

## खुलताबाद येथे भागवत कथेचे आयोजन



तभा वृत्तसेवा

खुलताबाद येथील साळेवाडा . खोटी भावली या ठिकाणी संगीतमय भागवत कथेचे आयोजन करण्यात आले असून या कथेचे भागवत कथा कार .कन्हैया जी महाराज बुऱ्हानपूरकर यांच्या मधुर वाणीतून दिनांक २९ एप्रिल .ते ६ मे पर्यंत सायंकाळी ७ ते ९ या वेळेत होणारा असून या कथेचा भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन कथा आयोजक . गजानन आसाराम फुलारे नगरसेवक . यांनी केले आहे या कथेचा समारोप विविध धार्मिक कार्यक्रमाने ६ मे रोजी महाप्रसादाने होणार आहे

# कराटे ग्रेड परीक्षा मध्ये बारा विद्यार्थी उत्तीर्ण



तभा वृत्तसेवा

**बिडकीन दि २८ एप्रिल |** कांचनवाडी नक्षत्रपार्क येथे २६ एप्रिल रोजी कराटे ग्रेड बेल्ट प्रमाणपत्र परीक्षा घेण्यात आली यामध्ये १२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले मार्शल आर्टस ग्रेड बेल्ट चे आयोजन- मिशन मार्शल आर्ड्स अँड वुशु कुंग फु स्पोर्ड्स कराटे असोसिएशन इंडिया छत्रपती संभाजी नगर यांच्यावतीने आयोजित करण्यात आले होते, काता,पंच,किक,स्ट्रोक, व टेक्निकल मोमेंट या आधारावर. प्रात्यक्षिके झाले, परीक्षक प्रवीण घुगे, पवन घुगे,राधा घुगे, यांच्या निगराणीखाली , प्रॅक्टिकल प्रात्यक्षिके घेऊन , विद्यार्थ्यांना मार्शल आर्टस मधील बेल्ट प्रमाणपत्र वितरण करण्यात आले, मार्शल आर्ड्स मधील विद्यार्थी उत्तीर्ण. झालेल्या विद्यार्थ्यांची नावे खालील प्रमाणे आहेत.ग्रेड येल्लो बेल्ट ते ब्राऊन बेल्ट वेदिका शिंदे, स्वरा पाटील, वेदा अष्टुरकर, शैलेजा मुगावकर, पलक पवार, हर्षदा हिंगमिरे, क्रीष्णवी विसरेन, इशिता हिंगमिरे, देवांशी भांजा, रमण जाधव, अगस्त्य खोत, सानवी शिरसाट, साईश पाटील, मितांश पाटील, यांना येलो बेल्ट, ते ब्राऊन बेल्ट ग्रेड बेल्ट वितरण करण्यात आले, प्रशिक्षक, राम चौरे, गौरव टोकटे, यशोधन घुगे, धनश्री शिदवाडकर, अनुश्री घुगे, धनश्री वाघ, नंदा घुगे, आदींनी काम पाहिले,

## कॉस्मो फाउंडेशन आणि ग्रामपंचायतीच्या पुढाकाराने वॉटर एटीएम कार्यान्वित

छत्रपती संभाजीनगर : यंदा उन्हाळा चांगलाच वाढला आहे. उन्हाचा दाह लक्षात घेत कॉस्मो फाऊंडेशनने ग्रामीण आरोग्य आणि स्वच्छता सुधारण्यासोबत शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. छत्रपती संभाजीनगरमधील खुलताबाद तालुक्यातील कागजीपुरा ग्रामपंचायचीच्या सहकार्याने फाऊंडेशनने कागजीपुरा गावात कम्युनिटी वॉटर एटीएमचे लोकार्पण केले आहे. या उपक्रमामुळे गावक-यांना आता स्वच्छ आणि शुद्ध पिण्याचे पाणी सहज उपलब्ध होणार असून, कडाक्याच्या उन्हाळ्यात ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळणार आहे.

जाहीर नोटीस

ॲड. एस.ए.पाटील पाचोरा, जि. जळगांव येथील मे. दिवाणी न्यायाधीश क.स्तर सो. यांचे न्यायालयात

दि.कि. अर्ज क्र. १०७/२०२६ — निशाणी क्रमांक १०
चौकशी तारीख १९/०६/२०२६

अर्जदार : १) श्री. मयुर वनाजी बकले, वय २०, धंदा शिक्षण व शेती, मो. नं. ९३०७०४६५४५ २) श्रीमती सुरेखा वना परदेशी (गढरी), वय ३६, धंदा घरकाम, ३) श्रीमती देवकाबाई वनाजी बकले (गढरी), वय ५८, भंदा-शेती, सर्व रा. बदरखे, ता. पाचोरा, जि. जळगांव

विरुध्द

सामनेवाला : १) ज्योती वनाजी बकले, वय ३३, धंदा-घरकाम, २) सचिन वनाजी बकले, वय २८, धंदा-शेती, दोघे रा. घर नं. १-५-१९१, मारुती मंदीर जवळ, बजरंग चौक, पडेगांव औरंगाबाद ता. जि. औरंगाबाद (छ. संभाजीनगर)

जाहीर नोटीस देण्यात येते की, अर्जदार हे वरील ठिकाणचे रहिवासी आहेत, कै. बनाजी गरबड गढरी (बकले/परदेशी) हे बदरखे येथील रहिवासी होते, त्यांचा प्रथम विवाह दि. १०/०५/१९८५ रोजी अर्जदार क. ३ यांच्याशी झालेला आहे व ते मयत होईपावेतो अर्जदार क. ३ व कै. वनाजी गरबड बकले (गढरी) यांचे पती पत्नीचे नाते संबंध कायम होते. कै. वनाजी गरबड बकले (गढरी) व अर्जदार क. ३ यांचे आपसात पटत नसल्याने त्यांचे कोर्टात खावटीच्या कैसेस चालू होत्या त्यादरम्यान कै. वनाजी गरबड बकले (गढरी) यांचे अल्काबाई नावाच्या विवाहीत अनैतिक संबंध प्रस्तापीत होऊन त्या संबंधातुन सामनेवाले १ व २ ही मुले झालेली आहेत. ते देखील कै. वनाजी गरबड बकले (गढरी) यांचे हिंदू वारसा कायद्याप्रमाणे वारस येत असल्याने त्यांना सामनेवाला म्हणून सामील केलेले आहे. कै. वनाजी गरबड बकले (गढरी) यांचे वडील गरबड गढरी हे मयत झाल्यानंतर कै. वनाजी गरबड बकले (गढरी) यांची आई नथाबाई गरवड धनगर हया गावातील नथ्थु पाटील या व्यक्तीच्या घरात त्याच्या सोबत रहावयांस सुरुवात केली व त्या मरेपर्यंत त्या व्यक्तीकडे राहत होत्या. त्यामुळे कै. वनाजी गरबड बकले (गढरी) यांची आई नथावाई गरयड गढरी हया दि. ०२/१२/२०१९ रोजी मयत झाल्यानंतर त्यांचे मयत दाखलची नोंद घेतांना त्यांचे नांव नथाबाई नथ्थु पाटील असे नमुद झालेले आहे. कै. नथाबाई नथ्थु पाटील म्हणजेच कै. वनाजी गरबड बकले (गढरी) यांच्या आई कै. नथाबाई गरवड धनगर (बकले). अर्जदार हे धनगर या भटक्या समाजाचे असून त्यांचे समाजात कधी धनगर नांव लावले जाते तर कधी परदेशी नांव लावले जाते, तर कधी बकले हे कुळ लावले जाते, त्यामुळे अर्जदार व त्यांचे इतर नातेवाईकांचे आडनांवात वेगवेगळी आडनांवे नमुद दिसतात, परंतु अर्जदार व सामनेवाले हे सर्व एकाच धनगर समाजाचे व एकाच वंशाचे आहेत. कै. वनाजी गरबड बकले (गढरी) हे दि. २५/१२/२०२५ रोजी अमळनेर जि. जळगांव येथे मयत झालेले आहे. कै. वनाजी गरबड बकले (गढरी) हे मयत होण्यापुर्वी त्यांनी त्यांचे नावे असलेल्या मिळकतीचे कोणतेही मृत्युपत्र न करता विल्हेवाट लावलेली नाही. त्या पुढील प्रमाणे आहेत, अ) रजि. कनेरी जळगांत सब रजि. कचेरी पाचोरा पैकी मौजे बदरखे ग्रा.पं. हद्दीतील बांधीव घरजागा मालमत्ता क.३१०/ब हि घरमिळकत आहे. व) रजि. कचेरी जळगांव सब रजि. कचेरी पाचोरा पैकी मौजे नगरदेवळा बु. शिवारातील गट क. १५४/१ पैकी प्लॉट नं.१३ हि बखळ जागा आहे. क) रजि. कचेरी छत्रपती संभाजीनगर सब रजि. कनेरी छत्रपती संभाजीनगर पैकी मौजे जैसिंगपुरा शिवारातील सर्व्हे नं. १३ पैकी प्लॉट नं. १ पैकी ०.०८४ शौ. मी. हि बखळ जागा आहे. कै. वनाजी गरबड बकले (गढरी) यांच्या मृत्युनंतर वर उल्लेख केलेल्या मिळ कतींना अर्जदार क. १ ते ३ व सामनेवाले क. १ व २ हे कायदेशिर वारस आहेत. सबन अर्जदार यांनी या न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट कलम २ व ३ प्रमाणे कायदेशीर वारस म्हणुन वारस दाखला मिळावा या करीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत कै. वनाजी गरबड बकले (गढरी) यांचे मृत्युपश्चात अर्जदारास वर उल्लेख केलेल्या मिळकतींना अर्जदार क. १ ते ३ व सामनेवाले क. १ व २ हे कायदेशीर वारस असल्याचा दाखला हवा आहे याकरीता पाचोरा, जि. जळगांव येथील मे. दिवाणी न्यायालयाने सदरील अर्जाने सुनावणीसाठी दिनांक १९/०६/२०२६ रोजीचा दिवस निश्चित केला आहे.

तरी मयत कै. वनाजी गरबड बकले (गढरी) यांना अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. यांना वर नमुद वारस म्हणून समाविष्ट करणेसाठी तसेच वारस म्हणून यांचे वारस दाखल्याबाबत कोणाचा हितसंबंध किंवा अजून कोणी घारस असल्यास अगर सदरहू अर्जदार हे सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजाविण्याचे असेल तर त्यांनी स्वतः किंवा आपल्या वकिलांमार्फत दिनांक १९/०६/२०२६ रोजी मध्यान्हपूर्व ११:०० वाजता या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्या आणि ह्या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती दाखविल्या नाही तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयताचे कायदेशीर वारस म्हणून समाविष्ट करण्यासाठी वारस म्हणूनचे सर्टीफिकेट देण्यात येईल.

आज दिनांक २७/०४/२०२६ रोजी माझे सही व मे. न्यायालयाच्या शिक्क्याने दिले असे.

हुकूमावरुन

क. लिपीक — सहा अधिक्षक,

दिवाणी व फौजदारी न्यायालय, पाचोरा

तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# येलदरी धरणातील पाणीसाठ्यात घट; वाढत्या तापमानाचा मोठा फटका बसला



**रामप्रसाद कंठाळे**

**जिंतूर,/प्रतिनिधी-** मराठवाड्यातील दुसऱ्या क्रमांकाचे सर्वात मोठे धरण म्हणून ओळखले जाणारे येलदरी धरण सध्या घटत्या पाणीसाठ्यामुळे चर्चेत आले आहे. पूर्णा नदीवर बांधण्यात आलेले हे धरण परभणी जिल्ह्यातील जिंतूर तालुक्यात स्थित असून १९६८ साली त्याचे उद्घाटन झाले होते. सुमारे ७०३ दशलक्ष घनमीटर () पेक्षा अधिक पाणी साठवण्याची क्षमता असलेल्या या धरणावर परिसरातील अनेक गावांचा पिण्याच्या पाण्यासाठी तसेच शेतीसाठी मोठा आधार आहे. याशिवाय येथे जलविद्युत निर्मिती प्रकल्प कार्यरत असून हे एक महत्त्वाचे पर्यटन स्थळ म्हणूनही विकसित झाले आहे.

दरम्यान, राज्यात वाढत्या उष्णतेचा परिणाम आता जलसाठ्यावर स्पष्टपणे दिसू लागला आहे. येलदरी धरणातील पाणीसाठा झपाट्याने कमी होत असून गेल्या आठ दिवसांत पाण्याची पातळी ०.१२ मीटरने घटल्याची नोंद झाली आहे. त्यामुळे आगामी काळात पिण्याचे पाणी, शेतीसाठी पाणीपुरवठा तसेच जनावरांसाठी पाण्याची टंचाई निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आठ दिवसांपूर्वी धरणातील पाण्याची पातळी ४५८.८४ मीटर इतकी होती व पाणीसाठा ६५.३४ टक्के होता.

**मुख्य मुद्दे :**
- ✻ आठ दिवसांत ०.१२ मीटर पाण्याची घट
- ✻ पाणीसाठा ६५.३४% वरून ६४.०२% पर्यंत खाली
- ✻ वाढत्या तापमानामुळे बाष्पीभवन वाढले
- ✻ पिण्याचे व शेतीचे पाणी धोक्यात येण्याची शक्यता
- ✻ प्रशासनाकडून पाणी बचतीचे आवाहन

**येलदरी धरण एक नजर :**
- ✻ स्थान : पूर्णा नदी, जिंतूर (जि. परभणी)
- ✻ मराठवाड्यातील दुसरा सर्वात मोठा जलाशय
- ✻ उद्घाटन : १९६८
- ✻ क्षमता : ७०३ पेक्षा अधिक
- ✻ जलविद्युत निर्मिती केंद्र कार्यरत
- ✻ प्रमुख पर्यटन स्थळ.

मात्र, रविवारी (दि. २५ एप्रिल) सकाळी घेतलेल्या मोजणीनुसार ही पातळी ४५७.७२ मीटरपर्यंत घसरली असून पाणीसाठा ६४.०२ टक्क्यांवर आला आहे. या घटत्या पातळीमुळे प्रशासन आणि नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

वाढत्या तापमानामुळे बाष्पीभवनाचा वेग मोठ्या प्रमाणात वाढला असून त्याचा थेट परिणाम धरणातील पाणीसाठ्यावर होत आहे. विशेषतः एप्रिल महिन्याच्या अखेरीस तापमान उच्चांक गाठत असल्याने पाण्याची घट अधिक वेगाने होत असल्याचे तज्ज्ञांनी नमूद केले आहे. येलदरी धरणावर अवलंबून असलेल्या गावांसाठी ही स्थिती चिंताजनक ठरत आहे. पाणीसाठ्यातील सातत्याने होत असलेल्या घटेमुळे येत्या काही दिवसांत पिण्याच्या पाण्याचा तसेच शेतीसाठी होणाऱ्या पाणीपुरवठ्यावर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रशासनाने योग्य नियोजन करून पाणीवाटपावर नियंत्रण ठेवणे अत्यावश्यक असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

येलदरी धरणामुळे मराठवाड्यातील परभणी, हिंगोली, नांदेड या तीन जिल्ह्यांतील हजारो हेक्टर शेतीसाठी सिंचनाची सोय झाली आहे. हे धरण दरवर्षी पावसाळ्यात पूर्ण क्षमतेने भरते, ज्यामुळे रब्बी आणि उन्हाळी हंगामासाठी पाणी उपलब्ध होते. दरम्यान, स्थानिक प्रशासनाने नागरिकांना पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहन केले आहे. अनावश्यक पाणी वाया घालवू नये, पाणी बचत हीच काळाची गरज असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

## संक्षिप्त वृत्त...

### जगाकडे नीट पाहण्याची दृष्टी देणारे शिक्षण ही काळाची गरज : प्राचार्य डॉ. प्रल्हाद लुलेकर : डॉ. आशा गीरी लिखित दोन पुस्तकांचे प्रकाशन

**परभणी,/प्रतिनिधी-** ज्ञान वाढवून ते जगाला देण्यासाठी सावित्री-ज्योतीप्रमाणे स्त्री शिकली पाहिजे. जगाकडे नीट पाहण्याची दृष्टी देणारे शिक्षण ही आज काळाची गरज आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत प्राचार्य डॉ. प्रल्हाद लुलेकर यांनी केले.

कै. सौ. कमलताई जामकर महिला महाविद्यालयातील कमलताई जामकर सांस्कृतिक सभागृहात डॉ. आशा सोपानराव गीरी लिखित 'अण्णाभाऊंच्या कथानायिका' या समीक्षात्मक ग्रंथासह 'नक्षी' या कवितासंग्रहाच्या प्रकाशन सोहळ्यात ते उद्घाटक म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नूतन विद्या मंदिर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हेमंतराव जामकर होते. प्रमुख उपस्थितीत विजयराव जामकर, डॉ. केदार काळवणे, डॉ. विठ्ठल भंडारे, डॉ. वसंतराव भोसले, डॉ. सूर्यकांत देशमुख, प्राचार्य डॉ. रामचंद्र भिसे, सौ. कविता सुभेदार, ड. मंगेशराव सुभेदार, सौ. मृणालताई सुभेदार, डॉ. मिनाताई टाकळकर आदी मान्यवर उपस्थित होते. प्रारंभी सावित्रीबाई फुले व कै. सौ. कमलताई जामकर यांच्या प्रतिमांचे पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. यानंतर हेमंतराव जामकर यांच्या हस्ते डॉ. प्रल्हाद लुलेकर यांचा सत्कार करण्यात आला. तसेच सर्व मान्यवरांचाही यावेळी गौरव करण्यात आला.

पुढे बोलतांना डॉ. लुलेकर म्हणाले, सावित्रीबाई फुले आणि महात्मा ज्योतिराव फुले यांनी स्त्री शिक्षणाला दिलेले महत्त्व आजही प्रेरणादायी आहे. शिक्षणातून समता, वास्तवाचे भान आणि सामाजिक परिवर्तन शक्य असून स्त्री शिक्षणाची आस्था समाजात अधिक दृढ होण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. प्रास्ताविकात डॉ. आशा गीरी यांनी पुस्तक लेखनामागील भूमिका मांडली. डॉ. विठ्ठल भंडारे आणि डॉ. केदार काळवणे यांनी दोन्ही पुस्तकांवर अभ्यासपूर्ण भाष्य करत लेखिकेच्या विचारमंथनाचे कौतुक केले. विजयराव जामकर व डॉ. वसंतराव भोसले यांनी डॉ. आशा गीरी यांच्या पुढील लेखनासाठी शुभेच्छा दिल्या.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. रामचंद्र भिसे यांनी डॉ. आशा गीरी यांच्या लेखनवैशिष्ट्यांवर प्रकाश टाकत शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाला प्राध्यापक, शिक्षक, कर्मचारी, साहित्यप्रेमी, मित्रपरिवार व नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. अरुण पडघन यांनी केले, तर आभार डॉ. आशा गीरी यांनी मानले.

### बसची दुचाकीला धडक; एक जण गंभीर

**परभणी,/प्रतिनिधी:** मानवत शहरातील बाह्यवळण रस्त्यावरील राष्ट्रीय महामार्गावर मंगळवारी (दि.२८) सकाळच्या सुमारास राज्य परिवहन मंडळाच्या 'शिवाई' बसने दुचाकीला धडक दिल्याने एक जण गंभीर जखमी झाल्याची घटना घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, नांदेड-बीड मार्गावरील एमएच ४९ बीझेड ७२१९ क्रमांकाची 'शिवाई' एसटी बस परभणीहून पाथरीकडे जात होती. त्याचवेळी भगवान पाथरीकर हे एमएच २२ एएच ४८५५ क्रमांकाच्या दुचाकीवरून मानवत रोडकडे जात असताना बसने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या धडकेत पाथरीकर गंभीर जखमी झाले. अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी तत्परता दाखवत जखमींना तातडीने मानवत येथील रुग्णालयात दाखल केले. तेथे प्राथमिक उपचारानंतर पुढील उपचारासाठी त्यांना परभणी येथे हलविण्यात आले. या अपघातामुळे काही काळ परिसरात नागरिकांची गर्दी झाली होती.

### तोष्णीवाल यांनी मानवत गटशिक्षणाधिकारी पदाचा स्विकारला पदभार

**मानवत,/प्रतिनिधी :** मानवत पंचायत समिती गट साधना केंद्राच्या नूतन गटशिक्षणाधिकारी पदाचा सुनीलकुमार तोष्णीवाल यांनी पदभार स्वीकारला. यानिमित्त गट साधन केंद्राच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. माजी गटशिक्षणाधिकारी मंगेश नरवाडे यांनी शाल व श्रीफळ देऊन तोष्णीवाल यांचे अभिनंदन करत स्वागत केले.

या प्रसंगी ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी पवार सर, राजकुमार गाढे, गिरी सर, पाटील सर, वाबूरकर सर, सीमाताई कच्छवे तसेच गट साधन केंद्रातील तज्ज्ञ समन्वयक उपस्थित होते. कार्यक्रमात राजकुमार गाढे यांनी मनोगत व्यक्त करत सुनीलकुमार तोष्णीवाल यांना पुढील कारकीर्दीसाठी शुभेच्छा दिल्या. आपल्या अनुभव, ज्ञान आणि कार्यशैलीतून तालुक्याच्या शिक्षण क्षेत्राला योग्य दिशा व मार्गदर्शन मिळेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला. यापूर्वी तालुक्यात सेवा केलेली असल्याने तालुक्यातील परिस्थिती आणि गरजा त्यांना परिचित असल्याचेही नमूद करण्यात आले.

यावेळी बोलताना नव्या नेतृत्वाखाली प्रशासन अधिक स्वच्छ, पारदर्शक आणि गुणवत्तापूर्ण होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. तसेच माजी गटशिक्षणाधिकारी मंगेश नरवाडे यांनी आपल्या कार्यकाळात पारदर्शक व गुणवत्तापूर्ण प्रशासन देत सर्व घटकांना मार्गदर्शन केल्याबद्दल त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. कार्यक्रमात दोन्ही अधिकाऱ्यांच्या कार्याचा गौरव करत उपस्थितांनी शुभेच्छा दिल्या.

### नागरजवळा शिवारात आगीत शेतकऱ्यांचे मोठे नुकसान; अग्निशमन दलाच्या तत्परतेने अनर्थ टळला



**मानवत,/प्रतिनिधी :** तालुक्यातील नागरजवळा रोड शिवार परिसरात युवा शेतकरी नरेश वाल्मीक यांच्या शेतातील आखाड्यावर अचानक आग लागून मोठे नुकसान झाल्याची घटना घडली. वाढत्या तापमानामुळे आग लागल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

या आगीत जनावरांचे खाद्य, भुस्याची वळई, बैलगाडी, ज्वारीचा कडबा, ज्वारी तसेच ठिबक सिंचनाचे साहित्य जळून खाक झाले. या दुर्घटनेमुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. घटनेची माहिती मिळताच मानवत नगर परिषदेच्या अग्निशमन दलाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. अग्निशमन दलाचे वाहन त्वरित दाखल होत चालक सय्यद कलीम, मुकेश कुमावत, राम दहे आणि संदीप जाधव यांनी शर्थीचे प्रयत्न करून आग आटोक्यात आणली.

अग्निशमन दलाच्या तत्परतेमुळे आग अधिक पसरली नाही आणि मोठा अनर्थ टळला. आग शेजारील शेतांमध्ये पसरली असती तर नुकसान अधिक वाढण्याची शक्यता होती. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसल्याचे समोर आले आहे.

दरम्यान, आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पुढील तपास सुरू आहे. मानवत अग्निशमन दलाच्या तातडीच्या कारवाईचे परिसरातून कौतुक होत आहे.

## मानवत येथे गाईला 'राष्ट्रमाता' दर्जा व गोहत्येवर संपूर्ण बंदीची मागणी

### ५४०० तहसील कार्यालयात एकाच वेळी निवेदन

**मानवत,/प्रतिनिधी-** येथे अभियानाला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला असून, शहरातील पाच हजाराहून अधिक नागरिकांनी स्वाक्षऱ्या करून आपल्या समर्थनाची नोंद केली.शहरातील संत-महंतांच्या हस्ते तहसीलदारांना निवेदन देण्यात आले. यावेळी श्री १००८ आचार्य स्वामी शिवेंद्र चैतन्य महाराज,गोभक्त सागर भाऊ श्री महाराज, ह.भ.प. पंडित महाराज डाके यांच्यासह इतर संत-मंडळी उपस्थित होती.




तसेच शहरातील नागरिक,मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. गाईला 'राष्ट्रमाता' दर्जा मिळावा, देशभरात गोहत्येवर संपूर्ण बंदी घालावी आणि गोवंश संरक्षणासाठी कडक केंद्रीय कायदा लागू करावा, या प्रमुख मागण्यांसाठी 'गो सन्मान आह्वान अभियान' सोमवारी देशभरात मोठ्या प्रमाणावर राबविण्यात आले. महाराष्ट्रासह देशभरातून या अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून, हजारो ठिकाणी शांततापूर्ण मार्गाने प्रशासनाला निवेदने सादर करण्यात आली. देशातील सुमारे ५४०० हून अधिक तहसील कार्यालयांमध्ये एकाच वेळी ही मोहीम राबविण्यात आली. महाराष्ट्रातील विविध भागांत गोभक्त, साधू-संत, पशुप्रेमी आणि नागरिकांनी तहसील कार्यालयांवर जाऊन आपली मागणी नोंदवली. अनेक ठिकाणी रॅली, पदयात्रा व मोर्चांचे आयोजन करण्यात आले होते.

Late. wamanraojikdambordikarsavasanstha, jintursanchalit

BORDIKAR COLLEGE OF PHARMACYMathalaTq. Jintur Dis. Parbhani

Affiliated by Dr. Babasaheb Ambedkar Technological University,
Lonere Tal- Mangaon, Dist – Raigad. Maharashtra (India). 402103

WANTED
Application areinvited from eligible candidates for following posts.

| Sr.No. | Name og post | No. of posts | Reservation |
|---|---|---|---|
| A. | Principal | 01 | 01-Open to All |
| B. | Professor: | | |
| 1 | Pharmaceutics | 01 | 01-Open to All |
| 2 | Quality Assurance | 01 | 01-Open to All |
| C. | Associate professor: | | |
| 1 | Pharmaceutics | 02 | 01-Open to All |
| 2 | Quality Assurance | 02 | 01-Open to All |
| D. | Assistant professor: | | |
| 1 | Pharmaceutics | 01 | 01-Open to All |
| 2 | Quality Assurance | 01 | 01-Open to All |
| 3 | Pharmacognosy | 02 | 01-Open to All |
| 4 | Pharmaceutical Chemistry | 01 | 01-Open to All |

Place: Mathala, Tq. JIntur
Date:29/04/2026

Secretary President
Late. wamanraojikdambordikarsavasanstha, jintur

Note: For Detailed information about post, Qualification And other terms and condition Viste University website:https://dbatu.ac.in/

## पाथरी अपघात प्रकरणात आरोपीस २ वर्षे सक्तमजुरीची शिक्षा: जिल्हा व सत्र न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्णय

**परभणी,/प्रतिनिधी:** पाथरी अपघात प्रकरणात आरोपीस २ वर्षे सक्तमजुरीची शिक्षा : जिल्हा व सत्र न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्णय देण्यात आला आहे.

पाथरी येथील २०१८ मधील भीषण अपघात प्रकरणात जिल्हा व सत्र न्यायालयाने अपील मंजूर करत आरोपी कारचालकास दोषी ठरवून २ वर्षे सक्तमजुरीची शिक्षा सुनावली आहे. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयाने यापूर्वी निर्दोष मुक्त केलेल्या आरोपीस अपीलात शिक्षा झाल्याने या प्रकरणाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

२६ एप्रिल २०१८ रोजी पाथरी तहसील कार्यालयासमोर रतन रोहीदास कड, त्यांची बहीण शिल्पा कड व भाचा समर्थ हे उभे असताना मानवतकडून भरधाव व निष्काळजीपणे आलेल्या पांढऱ्या रंगाच्या कारने त्यांना जोरदार धडक दिली होती. या अपघातात समर्थचा जागीच मृत्यू झाला, तर शिल्पा कड या गंभीर जखमी झाल्या होत्या. या प्रकरणाचा तपास तत्कालीन सहाय्यक पोलीस निरीक्षक किशोर बोधगिरे यांनी करून आरोपी सुनिल लिंबाजी सोनवणे (वय ५१, रा. भीमनगर, परळी, जि. बीड) याच्याविरुद्ध दोषारोपपत्र दाखल केले होते. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पाथरी यांनी १८ मे २०२२ रोजी आरोपीची निर्दोष मुक्तता केली होती. मात्र या निकालाविरोधात फिर्यादीने जिल्हा व सत्र न्यायालय, परभणी येथे अपील दाखल केले होते.

जिल्हा व सत्र न्यायाधीश-१ एन. आर. नाईकवाडे यांच्या न्यायालयात सुनावणी होऊन अपील मंजूर करण्यात आले व आरोपीस दोषी ठरविण्यात आले. २७ एप्रिल २०२६ रोजी न्यायालयाने आरोपीस भादंवि कलम ३०४ (अ) अंतर्गत २ वर्षे सक्तमजुरी व दंड, कलम २७९ अंतर्गत ६ महिने सक्तमजुरी, तसेच कलम ३३७ व ३३८ अंतर्गत शिक्षा सुनावली. याशिवाय फिर्यादीस शासनामार्फत नुकसानभरपाई देण्याचे आदेशही देण्यात आले.

या खटल्यात मुख्य सरकारी अभियोक्ता अ‍ॅड. ज्ञानोबा दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली अ‍ॅड. आनंद गिराम यांनी सरकारतर्फे बाजू मांडली, तर फिर्यादीतर्फे अ‍ॅड. भारत चिलवंत यांनी युक्तिवाद केला. प्रकरणाच्या पैरवीसाठी पोलीस अधीक्षक रविंद्रसिंग परदेशी, अप्पर पोलीस अधीक्षक सुरज गुंजाळ यांच्या मार्गदर्शनाखाली कोर्ट पैरवी अधिकारी व पोलिस कर्मचाऱ्यांनी काम पाहिले.

## तिरुपती-अकोला-तिरुपती साप्ताहिक एक्सप्रेस ३ मे पासून अकोल्याहून तर ८ मे पासून तिरुपतीहून धावणार

**परभणी,/प्रतिनिधी :** महाराष्ट्र, आंध्र प्रदेश आणि तेलंगणा राज्यांमधील रेल्वे संपर्क अधिक मजबूत करण्यासाठी रेल्वे बोर्डाने गाडी क्रमांक १७४२९/१७४३० तिरुपती-अकोला-तिरुपती साप्ताहिक एक्सप्रेसला मंजुरी दिली असून ही गाडी आता नियमित साप्ताहिक सेवेच्या स्वरूपात धावणार आहे. यामुळे विदर्भ व मराठवाड्यातील प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.

गाडी क्र. १७४३० अकोला-तिरुपती साप्ताहिक एक्सप्रेस प्रत्येक रविवारी अकोला येथून सकाळी ८.१० वाजता सुटणार असून ३ मे २०२६ पासून सेवा सुरू होईल. ही गाडी वाशिम, हिंगोली, बासमत, पूर्णा, हजूर साहेब नांदेड, धर्माबाद, बासर, काचिगुडा आणि कर्नूल टाउन मार्गे सोमवार रोजी सकाळी ८.३० वाजता तिरुपती येथे पोहोचणार आहे. तसेच गाडी क्र. १७४२९ तिरुपती-अकोला साप्ताहिक एक्सप्रेस प्रत्येक शुक्रवारी दुपारी १२.२५ वाजता तिरुपतीहून सुटेल. ८ मे २०२६ पासून सुरू होणारी ही सेवा कर्नूल टाउन, काचिगुडा, निजामाबाद, बासर, धर्माबाद, नांदेड, पूर्णा, बासमत, हिंगोली आणि वाशिम मार्गे शनिवार रोजी दुपारी २ वाजता अकोला येथे पोहोचेल.

या नव्या रेल्वे सेवेचा विशेष लाभ अकोला, वाशिम, हिंगोली, बासमत, पूर्णा आणि नांदेड परिसरातील प्रवाशांना होणार आहे. तिरुपती या प्रमुख तीर्थक्षेत्राशी थेट रेल्वे संपर्क उपलब्ध झाल्याने यात्रेकरूंसह विद्यार्थी, व्यापारी आणि सर्वसामान्य प्रवाशांसाठी ही सेवा अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. विशेष म्हणजे विद्यमान विशेष गाडीच्या ऐवजी नियमित साप्ताहिक सेवा सुरू होत असल्याने प्रवाशांना अधिक नियोजनबद्ध आणि सोयीस्कर प्रवासाची सुविधा उपलब्ध होणार आहे. नव्याने सुरू झालेल्या या सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन रेल्वे प्रशासनाने केले आहे.

## अग्रलेख...

# भविष्यातील धोक्याची घंटा...

युद्धाच्या मैदानावर अनेक डावपेच आखले जात असतात. जेव्हा पराभवाचे सावट गडद होणार असे दिसू लागते, तेव्हा काही पावले माघार घेणे ही युद्धनीतीच असते. पण अशी माघार हा पराभव नसतो. भारतातून माओवाद संपल्याचा दावा केंद्रीय गृहमंत्र्यांनी संसदेत केला, तेव्हा युद्धनीतीच्या या डावपेचांची त्यांना कल्पना नसेल असे नाही. माओवादी लढाईचा नवा मार्ग शोधून काढतील आणि त्याला तोंड देण्यासाठी नवी रणनीती आखावी लागेल, याचीही सरकारला पुरेपूर जाणीव असेल. म्हणूनच माओवाद संपल्याचे जाहीर केल्यानंतर केंद्र सरकार स्वस्थ बसलेले नाही. नवा संघर्ष सुरू करण्याची माओवाद्यांची तयारी असणार, याचे संकेत आता मिळू लागले असून त्यास तोंड देण्यासाठी तयारी करावी लागणार, हे केंद्र सरकारचे आडाखे अचूक असल्याचे स्पष्ट होऊ लागले आहे. अनेक बिनीच्या मोहऱ्यांची शरणागती आणि सशस्त्र संघर्षाकरिता असलेल्या ताकदीचे खच्चीकरण यामुळे खिळखिळ्या झालेल्या माओवाद्यांनी गनिमी काव्याने चळवळ चालविण्याची तयारी केली आहे. तेलंगणातील माओवाद्यांनी प्रसिद्धी पत्रक जारी करून संघर्षाचा नवा पवित्रा जाहीर केला आहेच; पण आत्मसमर्पण करणाऱ्या नेत्यांवर आगपाखड करीत सुडाचे नवे सत्र आरंभण्याचा इशारा देऊन नव्या रक्तरंजित संघर्षाचे संकेतही दिले आहेत. माओवाद संपलेला नाही, तर तो अस्तित्वहीन झाला आहे. ही या चळवळीची तात्पुरती माघार असून अधिक सावध राहावयास हवे, असा इशारा देणाऱ्या या पत्रकातून उमटणाऱ्या भविष्याच्या हाका सावधपणे ऐकाव्या लागतील.

एकेकाळी देशातील १८० हून अधिक जिल्ह्यांमध्ये पसरलेला माओवादी चळवळीचा 'रेड कॉरिडॉर' आता केवळ काही मोजक्या भागांत मर्यादित राहिला आहे. माओवादी किंवा नक्षलवादी चळवळ सध्या तिच्या इतिहासातील सर्वांत कठीण आणि निर्णायक टप्प्यावर उभी आहे. भारत 'नक्षलवाद मुक्ती'च्या मार्गावर दाखल झाल्याची आनंदवार्ता केंद्र सरकारने संसदेच्या अधिवेशनात देशाला दिली.छत्तीसगडमधील सुकमा आणि विजापूर यांसारख्या अत्यंत दुर्गम भागांतील अस्तित्वाच्या काही खाणाखुणा वगळता, माओवाद्यांचा इतर भागांतील सशस्त्र प्रभाव जवळपास संपुष्टात आला आहे. नक्षल प्रभावित जिल्ह्यांची संख्या आता शून्याच्या जवळपास पोहोचल्याचा गृह मंत्रालयाचा अहवाल आहे. 'सीपीआय (माओवादी)' या प्रतिबंधित संघटनेची केंद्रीय समिती आणि पोलिटब्युरो आता पूर्णपणे विस्कळीत झाली आहे. मे २०२५ मध्ये नंबाला केशव राव याचा मृत्यू आणि २०२६ च्या सुरुवातीला थिप्पिरी तिरुपती याने केलेले आत्मसमर्पण यांमुळे संघटना 'नेतृत्वहीन' अवस्थेत आहे. सुरक्षा दलांनी दुर्गम भागात 'फॉरवर्ड ऑपरेटिंग बेसेस' स्थापन केल्यामुळे नक्षलवाद्यांचे भौगोलिक कवच नष्ट झाले आहे. गेल्या दोन वर्षांत ४८०० हून अधिक कडव्या माओवाद्यांनी शस्त्रे टाकून सरकारसमोर आत्मसमर्पण केले आहे. महाराष्ट्रात, विशेषतः गडचिरोली जिल्ह्यात तर ही चळवळ शेवटच्या घटका मोजत आहे. अनेक आदिवासी गावांनी नक्षलवाद्यांना प्रवेश नाकारून 'गावबंदी' जाहीर केली आहे. नक्षलग्रस्त भागांत विकासाचे वारे वाहू लागले आहेत. रस्ते, पूल आणि मोबाईल टॉवर्सच्या जाळ्यामुळे नक्षलवाद्यांची रसद आणि माहिती मिळविण्याचे मार्ग बंद झाले आहेत. गोंदिया आणि चंद्रपूर यांसारख्या जिल्ह्यांत आता केवळ माओवादाचे अवशेष दाखविणाऱ्या काही खाणाखुणा उरल्या आहेत; त्यांच्याकडे सक्रिय सशस्त्र तुकड्या नाहीत. तथापि, अजूनही या चळवळीने उभी केलेली काही आव्हाने कायम आहेत. सशस्त्र लढा कमकुवत झाल्यावर विचारधारेचा प्रसार करण्यासाठी शहरी भागातील छुप्या नेटवर्कचा वापर वाढण्याची शक्यता वर्तविली जात आहे. जोपर्यंत दुर्गम भागातील आदिवासींच्या जमिनीचे प्रश्न, जल-जंगल-जमीन यांवरील हक्क आणि स्थानिक असंतोष पूर्णपणे दूर होत नाही, तोपर्यंत ही विचारधारा सुप्त स्वरूपात जिवंत राहू शकते. भविष्यात ही चळवळ हिंसक संघर्षापेक्षा राजकीय किंवा सामाजिक आंदोलनाच्या छुप्या स्वरूपात टिकून राहण्याचा प्रयत्न करू शकते, हे ओळखून केंद्र सरकारने टाकलेली पावले आणि हिंसाचाराची शक्यता नजरेआड न करता नक्षलग्रस्त भागांत वाढविलेली सुरक्षा ही आश्वासक बाब ठरते.

केंद्रीय गृहमंत्र्यांनी नक्षलवाद मुक्तीसाठी आखलेली रणनीती आणि मार्च २०२६ पर्यंतचे लक्ष्य यावर संसदेत दिलेले सविस्तर स्पष्टीकरण पाहता, शरणागती पत्करलेल्या माओवाद्यांची वाढती संख्या हे या चळवळीच्या पतनाचे एक मोठे लक्षण नक्कीच आहे, परंतु सुरक्षा यंत्रणांनी 'लष्करी विजय' मिळविल्यानंतर आता वैचारिक अस्तित्व टिकविण्याचे अस्त्र या चळवळीने परजले आहे. हे खरे आहे की, मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या शरणागतीमुळे चळवळीला धक्के बसले आहेत. जेव्हा पहिल्या फळीचा एखादा नेता शरणागती पत्करतो, तेव्हा खालच्या फळीचा विश्वास डळमळीत होतो. शरणागती पत्करलेले नक्षलवादी पोलिसांना त्यांच्या गुप्त तळांची, शस्त्रास्त्रांच्या साठ्यांची आणि 'लॉजिस्टिक' पुरवठ्याची अचूक माहिती देतात. यामुळे सुरक्षा दलांना मोठे यश मिळत आहे; सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, सरकारच्या पुनर्वसन धोरणामुळे नक्षलग्रस्तांनाही नक्षलवादी विचारधारेपेक्षा विकासाचा मार्ग अधिक आश्वासक वाटू लागला आहे. मैदानावर सशस्त्रपणे लढताना माघार घ्यावी लागते, तेव्हा त्या चळवळीचा मार्ग बदलला जातो. छत्तीसगड आणि ओडिशाच्या सीमेवरील अबुझमाडसारखे काही भाग अजूनही अत्यंत दुर्गम आहेत. तिथे सशस्त्र तुकड्या पूर्णपणे नष्ट झालेल्या नाहीत. त्यामुळे देश नक्षलवाद मुक्त झाल्याचे सरकारने जाहीर केल्यानंतरही, माओवाद्यांचे अस्तित्व पुसले गेले, असे म्हणता येत नाही. म्हणूनच आता अधिक सावधपणे छुप्या चळवळीचा सामना करण्याचे आव्हान सरकारसमोर उभे राहणार आहे. ही केवळ तात्पुरती माघार असल्याने सद्यस्थितीत ही चळवळ काहीशी 'अप्रासंगिक' ठरली आहे, याची नोंद घ्यावयास हवी.

सशस्त्र लढाईतील संघर्षात माओवाद्यांशी सामना करणारे प्रगत तंत्रज्ञान सुरक्षा यंत्रणांकडे उपलब्ध आहे. ड्रोन, उपग्रहांमार्फत उपलब्ध होणारी माहिती आणि मोबाईल संपर्क यंत्रणांनी सज्ज असलेल्या सुरक्षा दलांच्या अत्याधुनिक तंत्रामुळे माओवाद्यांच्या जंगलातील लढायांच्या कारवाया निकामी ठरल्या आहेत. यापुढे या लढाईचे तंत्र बदलण्याचा गनिमी कावा पुढच्या संघर्षात वापरला जाईल, असे नव्या आखणीतून दिसू लागले आहे. यापुढची चळवळ कदाचित हिंसक स्वरूपात नसेल, पण राजकीय प्रतिकार म्हणून जिवंत राहू शकते. तो प्रतिकार मोडून काढावयाचा असेल, तर गडचिरोलीमध्ये राबवण्यात आलेले आत्मसमर्पण आणि पुनर्वसन मॉडेल हा प्रभावी उपाय आहे. केवळ गडचिरोली जिल्ह्यात नव्हे, तर केवळ महाराष्ट्रासाठीच नव्हे, तर संपूर्ण देशासाठी हे एक दिशादर्शक उदाहरण आहे. या मॉडेलने माओवादी चळवळीचा कणा मोडला आहे. या नीतीतून सरकारने माओवाद्यांना केवळ शस्त्रे खाली ठेवण्यास सांगितले नाही, तर त्या बदल्यात सन्मानाने जगण्याची संधी दिली. पोलिस आणि स्थानिक प्रशासनाने माओवाद्यांच्या विरोधात शस्त्र उपसण्यापेक्षा विश्वासाचे नाते निर्माण करण्यावर भर दिला. आदिवासींना जातीचे दाखले, रेशन कार्ड आणि इतर शासकीय योजनांचा लाभ मिळवून दिल्यामुळे आदिवासी भागातील जनतेचा पोलिसांवरील विश्वास वाढला आणि नक्षलवाद्यांची माहिती देणारी यंत्रणा कमकुवत झाली. आत्मसमर्पण केलेल्या तरुणांना प्रशिक्षण देऊन रोजगाराशी जोडले गेले. माजी माओवाद्यांना गावाच्या कारभारात नेतृत्व करण्याची संधी दिसू लागली. हा बदल पचवून चळवळ जिवंत ठेवण्याकरिता माओवाद्यांची धडपड सुरू झाली आहे. आता यापुढचा लढा शस्त्रांचा राहिला नसून विकासाचा आहे. गडचिरोलीत सुरू असलेले लोखंडी खाणींचे प्रकल्प आणि रस्ते बांधणीची कामे यामुळे स्थानिक तरुणांना रोजगार मिळत आहे. जोपर्यंत विकास तळागाळातील माणसापर्यंत पोहोचत राहील, तोपर्यंत माओवादी चळवळ पुन्हा उभी राहणे कठीण आहे. सावध राहावयास हवे. कारण भविष्यातील धोक्याच्या घंटा वाजण्यास सुरुवात झालेली आहे.

---

## आंतरराष्ट्रीय

# नेपाळमध्ये महिनाभरातच जनआक्रोश

**प्रा. जयसिंग यादव**

नेपाळमध्ये सध्या दिसत असलेला जनआक्रोश हा केवळ विरोध नसून सरकारसाठी एक महत्त्वाचा संदेश आहे. लोकशाही व्यवस्थेत सरकार आणि जनता यांच्यातील संवाद टिकून राहणे अत्यावश्यक असते. निर्णयांचा परिणाम थेट लोकांच्या जीवनावर होतो, तेव्हा पारदर्शकता आणि संवाद यांची भूमिका अधिक महत्त्वाची ठरते. बालेन शाह यांच्या नेतृत्वासमोर आता खरी कसोटी आहे. निवडणुकीमध्ये मिळालेला पाठिंबा टिकवून ठेवण्यासाठी आणि प्रभावी प्रशासनासाठी केवळ धोरणे जाहीर करणे पुरेसे नसते, तर त्यांची अंमलबजावणी करताना जनतेच्या भावना आणि गरजा समजून घेणे आवश्यक असते. या परिस्थितीमध्ये सरकारने संवादाचा मार्ग स्वीकारणे गरजेचे आहे. व्यापारी, नागरिक आणि संबंधित घटकांशी चर्चा करून निर्णयप्रक्रियेत पारदर्शकता आणल्यास विश्वास पुन्हा निर्माण होऊ शकतो. आर्थिक सुधारणा करताना अल्पकालीन अडचणी आणि दीर्घकालीन फायदे यामध्ये संतुलन राखणे अत्यंत महत्त्वाचे आहे. नेपाळमधील सध्याची परिस्थिती ही केवळ एका देशापुरती मर्यादित नाही, तर सर्व लोकशाही व्यवस्थांसाठी एक धडा आहे. बालेन शाह यांच्या नेतृत्वाखालील प्रशासनाविरोधात जनतेचा रोष रस्त्यावर दिसू लागला आहे. काठमांडूच्या रस्त्यांपासून सत्तेचे केंद्र मानल्या जाणाऱ्या सहदरबारपर्यंत आंदोलनांची लाट उसळली असून सरकारच्या धोरणात्मक निर्णयांविरोधात विविध स्तरांवर विरोध नोंदविला जात आहे. विशेषतः विद्यार्थी संघटनांवर घालण्यात आलेल्या निर्बंधांमुळे तरुणांमध्ये असंतोष वाढला आहे.

शिक्षण संस्थांमधील संघटनात्मक स्वातंत्र्यावर गदा येत असल्याचा आरोप करीत विद्यार्थी रस्त्यावर उतरले आहेत. याशिवाय, भ्रष्टाचाराविरोधात कारवाईच्या नावाखाली घेतलेले काही निर्णय निवडक आणि पक्षपाती असल्याची टीका होत आहे. सरकारच्या काही धोरणांना जनविरोधी ठरवत व्यापारी आणि नागरी समाजातील घटकांनी आंदोलनात सहभाग घेतला आहे. प्रशासनाने घेतलेल्या निर्णयांमध्ये पारदर्शकतेचा अभाव असल्याचे सांगत विरोधकांनी सरकारवर दबाव वाढविला आहे. राजकीय विश्लेषकांच्या मते, नव्या नेतृत्वासमोरची ही पहिली मोठी कसोटी आहे. सरकारकडून या आंदोलनांना उत्तर देताना आपल्या निर्णयांचे समर्थन केले जात आहे. दीर्घकालीन सुधारणा आणि शिस्त आणण्यासाठी हे पाऊल आवश्यक असल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे. नेपाळमधील राजकीय वातावरण अधिक तणावपूर्ण बनण्याची शक्यता आहे. सरकारने संवादाचा मार्ग स्वीकारून परिस्थिती हाताळली नाही, तर हा जनआक्रोश तीव्र होऊ शकतो. सहा महिन्यांपूर्वीच्या युवा पिढीच्या आंदोलनातून सत्तेवर आलेल्या नेपाळमधील शाह यांच्या सरकारवर अवघ्या २६ दिवसांमध्ये नामुष्की आली. नेपाळमध्ये सध्या घडत असलेल्या राजकीय आणि आर्थिक घडामोडी या केवळ एका देशापुरत्या मर्यादित नाहीत, तर नव्या पिढीच्या नेतृत्वाची आणि त्यांच्या धोरणात्मक दृष्टिकोनाची मोठी परीक्षा ठरत आहेत.



'जेन-झी' आंदोलनातून पुढे आलेल्या बालेन शाह आणि रवी लामिछाने यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय स्वतंत्र पार्टी सत्तेत आल्यानंतर बदलाची मोठी अपेक्षा निर्माण झाली होती. पारंपरिक राजकारणाला पर्याय म्हणून या नेतृत्वाकडे पाहिले गेले; मात्र सत्तेच्या वास्तवात या अपेक्षांची पूर्तता करणे किती कठीण असते, हे आता प्रकर्षाने समोर येत आहे. येथे सुदान गुरुंग यांनी गृहमंत्रिपदाचा राजीनामा दिला आहे. उद्योगपती दीपक भट्टा यांच्याशी कथित संबंध आणि 'मनी लॉण्ड्रिंग' प्रकरणातील वादाच्या पृष्ठभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे. या घडामोडीमुळे बालेन शाह यांच्या नेतृत्वाखालील सरकारसमोर नवे राजकीय आव्हान उभे राहिले आहे.

युवकांना आंदोलनात पाठिंबा देणारे शाह धुतल्या तांदळासारखे नाहीत, हे युवकांना माहीत नसेल, तरी देशातील सुज्ञांना चांगलेच उमगले आहे. नेपाळमध्ये नुकत्याच झालेल्या निवडणुकांनंतर २७ मार्च रोजी शाह यांनी पंतप्रधान म्हणून शपथ घेतली होती. त्यानंतर अवघ्या एका महिन्याच्या आतच सरकारमध्ये मोठ्या उलथापालथी घडताना दिसत आहेत. यापूर्वी कामगार मंत्री कुमार शाह यांना शिस्तभंगाच्या आरोपांवरून पदावरून हटवण्यात आले होते. आता गृहमंत्र्यांचा राजीनामा ही दुसरी मोठी घटना ठरली आहे. राजीनामा देताना गुरुंग यांनी सोशल मीडियावर आपली भूमिका स्पष्ट केली. स्वतःशी संबंधित प्रकरणांची निष्पक्ष चौकशी व्हावी आणि पदावर राहून हितसंबंधांचा संघर्ष होऊ नये, यासाठी आपण पदत्याग केल्याचे त्यांनी नमूद केले. पंतप्रधानांनी एकीकडे सात माजी पंतप्रधान, माजी राजा, माजी राष्ट्रपती यांच्या कथित घोटाळ्याच्या चौकशीसाठी न्यायिक समित्या स्थापन केल्या असताना दुसरीकडे आपल्याच मंत्रिमंडळात आरोप असलेल्यांना स्थान देऊन गृहमंत्रिपदासारखे मोठे पद देण्याचा प्रमाद केला. गुरुंग यांचे नाव एका मायक्रो इन्शुरन्स कंपनीतील गुंतवणुकीशी जोडले गेले आहे. या कंपनीत 'मनी लॉण्ड्रिंग' प्रकरणात चौकशी सुरू असलेल्या दीपक भट्टा यांच्यासह इतर व्यावसायिकांचाही सहभाग असल्याचे सांगितले जात आहे.

ताज्या राजीनाम्यामुळे नेपाळमधील नव्या सरकारची प्रतिमा आणि स्थैर्यापुढे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. 'जेन-झी' आंदोलनातून सत्तेत आलेल्या नेतृत्वाकडून पारदर्शकता आणि स्वच्छ प्रशासनाची अपेक्षा होती. त्यामुळे अशा वादग्रस्त प्रकरणांमुळे सरकारवर दबाव वाढण्याची शक्यता आहे. प्रशासनातील पारदर्शकता, जबाबदारी आणि नैतिकता या मूल्यांवर सरकार किती ठाम राहते, यावर पुढील राजकीय दिशा अवलंबून राहणार आहे. नव्या सरकारने घेतलेल्या निर्णयांमध्ये सीमा शुल्क नियमांमधील बदल हा सर्वाधिक चर्चेचा विषय ठरला आहे. हे बदल केवळ प्रशासनिक सुधारणांच्या दृष्टीने पाहिले गेले, तरी त्यांचा थेट परिणाम अर्थव्यवस्थेवर आणि जनजीवनावर झाला आहे. नेपाळची अर्थव्यवस्था मोठ्या प्रमाणावर आयातीवर अवलंबून आहे. विशेषतः भारतासोबतचा व्यापार हा त्याचा कणा मानला जातो. अशा परिस्थितीत सीमावर्ती व्यापारावर परिणाम करणारे कोणतेही निर्णय अत्यंत संवेदनशील ठरतात. व्यापारात अनिश्चितता वाढली असून वस्तूंच्या किमतींवर याचा परिणाम होत आहे. महागाईचा दबाव वाढण्याची चिन्हे दिसत आहेत. यामुळे सामान्य नागरिकांमध्येही नाराजी वाढली आहे. दीर्घकालीन आर्थिक शिस्तीसाठी घेतल्या जाणाऱ्या निर्णयांचा अल्पकालीन परिणाम जनतेला सहन करावा लागतो, ही वस्तुस्थिती येथे पुन्हा अधोरेखित झाली आहे.

या पृष्ठभूमीवर उभा राहिलेला जनआक्रोश हा केवळ राजकीय विरोध मानणे योग्य ठरणार नाही. हा लोकशाही व्यवस्थेतील एक नैसर्गिक प्रतिसाद आहे. निर्णय प्रक्रियेत संवादाचा अभाव जाणवतो, तेव्हा लोक रस्त्यावर उतरतात. नव्या नेतृत्वाकडून अपेक्षित असलेली पारदर्शकता आणि संवाद यामध्ये काही प्रमाणात कमी पडल्याची भावना निर्माण झाली आहे. दुसरीकडे सरकारच्या दृष्टीने पाहता हे निर्णय पूर्णपणे चुकीचे आहेत, असे म्हणता येणार नाही. भ्रष्टाचाराला आळा घालणे, महसूल वाढविणे आणि प्रशासन अधिक कार्यक्षम बनविणे हे कोणत्याही सरकारचे प्राथमिक उद्दिष्ट असते; मात्र, या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी घेतलेल्या उपाययोजनांची वेळ, पद्धत आणि अंमलबजावणी यांचा विचार तितकाच महत्त्वाचा असतो.

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

---

## वेध

**चंद्रकांत लोहाणा**

# घातक विळखा फास्ट फूडचा

आजच्या आधुनिक युगामध्ये आमच्या सर्व सवयी बदलल्या. ताटामध्ये काय असावे, याचे आम्हाला साधे भानही उरले नाही. आम्ही अन्नाला पूर्णब्रह्म मानणारे असूनही त्यापासून दूर होत गेलो. खाण्या-पिण्याच्या बदललेल्या सवयीने समाजाला अनेक घातक परिणामांना सामोरे जावे लागत असून घातक रोगांना बळी पडणाऱ्यांच्या संख्येमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. फास्ट फूडच्या अति सेवनाने शरीरावर होणाऱ्या परिणामाची माहिती असूनही खाऊ घालणारे आणि खाणाऱ्यांची संख्या कमी न होता ती दिवसागणीक वाढतच आहे. फास्ट फूडचे नियमित सेवन शरीरावर दीर्घकालीन आणि गंभीर परिणाम करू शकते. अशा या फास्ट फूडमध्ये भरपूर कॅलरिज, ट्रान्सफॅट, मीठ आणि साखरेचे प्रमाण सर्वाधिक असते. त्यामध्ये शरीराला आवश्यक असणारी जीवनसत्त्वे, खनिज आणि फायबरचे प्रमाण शून्य असते. असे पदार्थ खाल्ल्याने शरीरास त्वरित ऊर्जा मिळत असली, तरी ती ऊर्जा संपतेही तेवढ्याच लवकर. त्यामुळे शरीर सुस्त बनून माणसाच्या काम करणाऱ्या क्षमतेवर त्याचा गंभीर परिणाम होतो. फास्ट फूडमधून शरीरास पोषक तत्त्व मिळत नसल्यामुळे शरीराची प्रतिकारशक्ती कमी होऊन शरीर अनेक व्याधींचे माहेरघर बनते. या फास्ट फूडपायी लहान मुले तर अक्षरशः वेडी झाली आहेत. पिझ्झा, बर्गर, नूडल्स, मोमोज, केक, पेस्ट्री यांसारख्या पदार्थांना मुलांची प्रथम पसंती असते. परिणामाची चिंता न करता पालकही आपल्या पाल्यांना आनंदाने त्याचा घास भरविण्यात धन्यता मानत आहेत. त्यामुळे पूर्वीच्या काळामध्ये शरीराला पोषक तत्त्व देणारी भाजी, भाकरी, पोळी, वरण, भात यांसारखे पारंपरिक पदार्थ ताटामध्ये दिसून येत नाहीत. नैसर्गिक पदार्थावर प्रक्रिया करून तयार होणारा पदार्थ शरीरासाठी अतिशय घातक आणि हानिकारक असतात. निसर्ग निर्मित वस्तूचे सेवन नैसर्गिकरीत्या केले तरच ते शरीरासाठी उपयुक्त ठरतात. फास्ट फूडमध्ये मोनोसोडियम ग्लुटामेट फार अधिक प्रमाणात वापरले जात असल्यामुळे डोकेदुखीचा त्रास होण्याची शक्यता सर्वाधिक असते. फास्ट फूडमध्ये ट्रान्सफॅटचे प्रमाणही सर्वाधिक असते;



जे शरिराला आतून पोखरण्याचे काम करते. फास्ट फूडमध्ये अधिकची साखर, चरबी व मीठ त्यास चवदार बनवितात. परंतु, या तीन पदार्थामुळे हृदयावर त्याचा गंभीर परिणाम होऊन लोक आजारी पडतात. फास्ट फूडमधील ट्रान्सफॅटमुळे रक्तामधील वाईट कोलेस्ट्रॉलची पातळी वाढून चांगल्या कोलेस्ट्रॉलची पातळी कमी होते. त्यामुळे टाईप-२ या प्रकारामधील मधुमेह हा आजार होण्याचा धोका अधिक बळावतो तसेच हृदयविकाराचा धोकाही कितीतरी पटीने वाढतो. आहारामध्ये मिठाचे सेवन वाढल्याने उच्च रक्तदाबाचा त्रास होण्याचा धोका अधिक असतो. फास्ट फूडमध्ये कॅलरिजचे प्रमाण सर्वाधिक असल्याने लठ्ठपणा हमखास वाढतो. लठ्ठपणा वाढला की, दमा आणि श्वसनासंबंधी इतर अनेक आजार होण्याचा धोका कितीतरी पटीने वाढतो. असे हे विष खाऊन काही काळासाठी आपली भूक भागत असली, तरी त्याच्या दुष्परिणामांची चर्चा होताना समाजामध्ये कधीच दिसून येत नाही. ज्या व्यक्तींना फास्ट फूड खाण्याची सवय आहे, अशा व्यक्तींना नैराश्याने बाधित होण्याची शक्यता ५१ टक्के अधिक असते. तर, दुसरीकडे शरीरामधील हार्मोन्सवर त्याचा परिणाम होऊन प्रजनन क्षमतेवरही त्याचे गंभीर परिणाम होत असल्याचे मत अभ्यासकांनी वर्तविले आहे. फास्ट फूडच्या अति सेवनाने घातक आजारांचे प्रमाण वाढत असतानाच मागील दोन दशकामध्ये हे आजार होण्याचे वयही २५ ते ३० वर्षे एवढे खाली आले आहे. फास्ट फूड तयार करताना ते अधिक काळ पाकिटामध्ये टिकावे यासाठी त्यामध्ये अनेक रसायनांचा भडीमार केलेला असतो. आपणास या सर्व बाबींची कल्पना असूनही त्याकडे पूर्णपणे डोळेझाक करून दिवसेंदिवस त्या विषाच्या आहारी आम्ही जात आहोत. शरीराला अपाय करणारे पदार्थ जर ठासून पोटामध्ये भरत राहिलो तर त्याची प्रतिक्रिया निश्चित होणार, हे आम्हाला समजत असले, तरी ते उमगत नाही, ही शोकांतिका आहे. पैसे खर्च करून आम्ही आजार विकत घेत आहोत आणि त्या आजाराच्या दुरुस्तीसाठी लाखो रुपये पाण्यासारखे खर्च करून धन्यता मानण्यात आयुष्याची राखरांगोळी करीत आहोत. देशाचे भविष्य घडविणाऱ्या पिढ्या अशा प्रकारे कमजोर होत गेल्या तर भविष्यामध्ये आपल्या पुढ्यात काय ठेवले असेल, हे सांगण्यासाठी कोण्या भविष्यवेत्त्याची गरज नक्कीच नाही.

९८८१७१७८५६

---

## इतस्ततः

# 'लव्ह जिहाद'चे व्यवस्थापकीय संदर्भ

**दत्तात्रेय आंबुलकर**

नाशिकच्या टाटा कन्सलटन्सी अर्थात टीसीएस या प्रथितयश कंपनीत योजनापूर्वक झालेल्या 'लव्ह जिहाद'चे प्रकरण आणि त्याचा भीषण तपशील उघड झाल्यापासून या धक्कादायक प्रकरणाचे गांभीर्य कंपनी प्रशासन, पोलिस विभाग, स्थानिक प्रशासन, कंपनी कर्मचारी व त्यांचे कुटुंबीयांना जाणवले आहे. मुख्यतः टाटा समूहातील कंपनीत कर्मचाऱ्यांनी योजनापूर्वक पद्धतीने आपल्या सहकारी महिला कर्मचाऱ्यांचे शारीरिक शोषण, अत्याचार असे भीषण प्रकार करून त्याची भीषण परिणीती लक्षणीय संख्येतील लव्ह जिहादमध्ये झाल्याने त्याचे परिणाम टाटा उद्योग समूहांतर्गत टाटा सन्सपासून टाटांचे मुख्यालय असणाऱ्या बॉम्बे हाऊसपर्यंत सर्वदूर उमटणे स्वाभाविक होते व झालेही तसेच.

यासंदर्भातील कंपनी-कर्मचारी आणि व्यवस्थापकीय संदर्भातील पृष्ठभूमी म्हणजे, कंपनी कर्मचाऱ्यांनी महिला कर्मचाऱ्यांचे लैंगिक शोषण करून, प्रलोभन, भीती दाखवून त्यांच्यावर जबरदस्तीने व बळपूर्वक लव्ह जिहादच्या नावाखाली झालेले भयानक प्रकार. व्यापक कायदेशीरसंदर्भात संवैधानिकच नव्हे, तर धार्मिक, सामाजिक व भावनिक परिणाम पाहता, प्रसंग आणि परिस्थितीचे गांभीर्य साहजिकच वाढले आहे. मूलतः मुद्दा उपस्थित होतो, तो टाटा उद्योग समूहांतर्गत व्यवस्थापनाची कार्यपद्धती-संस्कृती कामकाजाची परंपरा व त्याचवेळी कंपनीच्या कर्मचाऱ्यांकडून अपेक्षित असणाऱ्या शिस्तपूर्ण व्यवहाराची. हे दोन्ही मुद्दे यासंदर्भात महत्त्वाचे व चिंतनीय ठरतात.

सकृतदर्शनी सांगायचे झाल्यास, कायद्याच्या मूळ निर्देशांनुसार १९६१ च्या औद्योगिक स्थायी आदेशात प्रामुख्याने नमूद केलेल्या कलम २२ अंतर्गतच्या 'झेड'या तरतुदींनुसार, मुळातच प्रत्यक्षाप्रत्यक्ष व हावभाव-संवादासह केलेल्या सर्वच प्रकारच्या गैरकृत्यांना कर्मचाऱ्याने केलेली गैरवर्तणूक ठरविण्यात आली असून त्यानुसार संबंधित कर्मचाऱ्यावर नियमांनुसार शिस्तभंगाची कारवाई करण्याचे अधिकार व्यवस्थापनाला कायद्यांतर्गत देण्यात आले आहेत. त्यानुसार या मार्गदर्शक व महत्त्वाच्या तरतुदींनुसार उद्योगांतर्गत शिस्तभंगाची कारवाई होणे केवळ अपेक्षितच नव्हे, तर आवश्यक अशी प्रथा-परंपरा ठरली आहे. कंपनी-कर्मचाऱ्यांच्या संदर्भात कामाच्या ठिकाणी महिला कर्मचाऱ्यांचे कुठल्याही प्रकारे लैंगिक शोषण होऊ नये, या उद्देशाने केंद्र सरकारतर्फे महिला लैंगिक अत्याचार नियंत्रणाच्या संदर्भात 'पॉश' म्हणजेच प्रिव्हेंशन ऑफ सेशुअल हर्रासमेंट या विशेष कायद्याची निर्मिती करून त्याच्या काटेकोर अंमलबजावणीवर भर दिला जात आहे. 'पॉश' कायदा वैधानिकदृष्ट्या सर्वच आस्थापना-कार्यालये व कंपन्यांना लागू करून आवश्यक त्या कारवाईसह अंमलबजावणी सक्तीची करण्यात आली आहे, हे उल्लेखनीय आहे. महिला कर्मचाऱ्यांचे कामाच्या ठिकाणी कुठल्याही संदर्भात लैंगिक शोषण न होण्याची खातरजमा करण्यासाठी व 'पॉश' कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी आस्थापनेतील महिला कर्मचाऱ्यांसाठी पॉश अंतर्गत, कंपनी अंतर्गत तक्रार निवारण समिती गठित केली जाते. या समितीमध्ये महिलांशी संबंधित क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या स्वयंसेवी व्यक्तीचा समावेश करून पॉश अंतर्गत महिला कर्मचाऱ्यांच्या प्रत्येक तक्रारीवर चौकशी करून, त्यांचे कालबद्ध स्वरूपात चौकशीसह कारवाईचा अहवाल समितीने कंपनी प्रशासनासह संबंधित ठिकाणच्या प्रशासकीय अधिकाऱ्यांना कळविणे कायदेशीररीत्या बंधनकारक आहे. कामाच्या ठिकाणी महिला कर्मचाऱ्यांना आवश्यक ते संरक्षण देणे व त्याचवेळी त्यांच्या प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे झालेल्या अथवा होणाऱ्या लैंगिक शोषणाच्या तक्रारींची दखल घेऊन त्यांचे कालबद्ध स्वरूपात निवारण करण्याच्या संदर्भात अत्यंत संवेदनशील असणाऱ्या पॉश कायद्याची टीसीएस प्रकरणी कशी पायमल्ली झाली, याची मूलभूत पडताळणी व्यवस्थापनाच्या संदर्भात महत्त्वाची ठरते. कंपनीच्या व्यवस्थापनाची यासंदर्भातील सकृतदर्शनी बेजबाबदार व विषयाशी संबंधित महिला साहाय्यक व्यवस्थापक यांच्या बेपर्वा वृत्ती आणि कृतीची सखोल चौकशी होणेपण तेवढेच आवश्यक ठरते. प्रकरणाची व्याप्ती व गांभीर्य लक्षात घेता, टीसीएस कंपनीतील महिलांचा छळ, त्यांचे झालेले ब्लॅकमेलिंग व त्यातून लव्ह जिहादची झालेली व्यापक परिणीती, ही बाब तपासाच्या पहिल्याच टप्प्यात स्पष्ट झालेली दिसते. आता अधिकृतपणे स्पष्ट झाल्यानुसार, कंपनीतील महिला कर्मचाऱ्यांचा विनयभंग, अत्याचार, लैंगिक शोषण व धार्मिक भावना दुखावण्याचाच अंतिम टप्पा म्हणून लव्ह जिहादचा सामूहिक प्रकार होण्याच्या योजनाबद्ध व विकृत जिहादी प्रकरणाची तपास-चौकशी करण्याचे काम घटनेचे गांभीर्य लक्षात घेता, केंद्रीय गुप्तचर यंत्रणा, राज्य गुप्तवार्ता विभाग, राष्ट्रीय तपास यंत्रणा यांच्याकडे सोपविल्यामुळेच या प्रकरणी लव्ह जिहाद घडवून आणण्यासाठी विदेशी पैशाचा मोठा वापर झाल्याचे लक्षात आल्याने, केवळ टीसीएस व्यवस्थापनच नव्हे, तर संपूर्ण व्यवस्थापन क्षेत्र स्वाभाविकपणे हादरले आहे. राष्ट्रीय महिला आयोगानेदेखील या प्रकरणाची वेळेत दखल घेतल्याने एकूणच तपास प्रक्रियेला निश्चितच बळकटी मिळाली आहे. आयोगाने मुंबई उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीश साधना जाधव, हरयाणाचे माजी पोलिस संचालक बी. के. सिन्हा, सर्वोच्च न्यायालयातील वकील मोनिका अरोरा व राष्ट्रीय महिला आयोगाच्या वरिष्ठ समन्वयक लीलावती यांचा या चौकशी समितीत समावेश केला आहे. आता नव्यानेच संमत झालेल्या महाराष्ट्र धर्मांतरण विरोधी कायद्याच्या नव्या पृष्ठभूमीवर या प्रथम चाचण्या निश्चितच लक्षणीय ठरणार असून त्यालाच जलदगती (फास्ट ट्रॅक) न्यायदान पद्धतीची आवर्जून जोड द्यायला हवी.

वरील प्रमुख मुद्यांशिवाय व्यवस्थापन क्षेत्राच्या संदर्भात दोन प्रमुख मुद्यांचा उल्लेख अपरिहार्य ठरतो. एक म्हणजे, व्यवस्थापनांतर्गत कंपनी-कर्मचारी संवाद. केवळ वाद-तक्रारीच नव्हे, तर सर्वसाधारण स्थितीत कंपनी-कर्मचारी यांच्यात संवाद असायलाच हवा. त्याला व्यवस्थापक व सहकारी कर्मचाऱ्यांमधील संवादाची साथ दिली, तर ते सर्वांच्याच फायद्याचे व व्यावसायिकदृष्ट्या परिणामकारक ठरणार आहे. दुसरा व तेवढाच महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, मोठ्या प्रमाणात विकृत मनोवृत्तीतून व जात्यंध धार्मिक भावनेपोटी योजनाबद्ध पद्धतीने आपल्या महिला सहकाऱ्यांचे शारीरिक शोषण करून, त्यांचे जिहादी भावनेतून धर्मांतरण करणाऱ्या या प्रकरणाची राष्ट्रीय स्तरावर दखल घेऊन त्यानुसार चौकशीसह कारवाई सुरू झाली असताना, त्याच गांभीर्याने व तातडीने प्रमुख व राष्ट्रीय स्तरावरील कर्मचारी-कामगार संघटनांनी या प्रकरणी आवाज उठवणे अपेक्षित असते. एरवी कर्मचाऱ्यांवर वैयक्तिक वा सामूहिक संदर्भात कर्मचारी-सहकाऱ्यांवर कुठलाही अन्याय झाल्यास त्याविरुद्ध आवाज उठवून प्रसंगी आंदोलनात्मक पवित्रा घेणाऱ्या प्रमुख कामगार संघटनांनी नाशिक लव्ह जिहादप्रकरणी ठोस भूमिका घेणे अपेक्षित होते. असे झाले, तर सध्या ठरवून कॉर्पोरेट उद्योग-व्यवसाय क्षेत्रात कर्मचारी निवड-ठेकेदारी एवढेच नव्हे, तर विशेषतः माहिती-तंत्रज्ञान व संगणक व्यवसाय क्षेत्रात शिरकाव झालेल्या व योजनापूर्वक पद्धतीने उद्योग-व्यवसायासाठी संबंधित अशा महत्त्वाच्या व विशेषतः संवेदनशील माहिती-तंत्रज्ञानाची जिहादी मानसिकतेचे तस्करी करणाऱ्यांच्या प्रयत्नांना खीळ बसू शकेल, ही मोठी व महत्त्वपूर्ण बाब नाशिक लव्ह जिहाद प्रकरणातून अधोरेखित झाली आहे.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

---

## वाचक पत्रे

### महापालिकेच्या कामांत सहभाग

आपण दरवर्षी महानगर पालिकेकडे मालमत्ता कर भरतो. त्यासाठी महापालिका आपल्याला काही नागरी सुविधा पुरवते. या नागरी सुविधांमध्ये कुठेही कमतरता भासली की आपण महापालिकेला दोष देत राहतो. महापालिकेकडून वर्षभर नवीन अथवा दुरुस्तीची कामे सुरू असतात. या कामामुळे नागरिकांना बराच त्रासही सहन करावा लागतो. आपण सोयीस्कररीत्या प्रशासन व महापालिकेला नाव ठेवत असतो.पण एक जागरूक नागरिक म्हणून आपण काय करतो याचा विचार होणे गरजेचे आहे. पावसाळ्याआधी महापालिका रस्त्याच्या बाजूच्या नाल्या स्वच्छ करतात. काही नागरिक खाद्यपदार्थांचे वेष्टण, प्लॅस्टिक प्लेट्स आणि चमचे खिडकीतून बाहेर फेकून देतात, ते नष्ट होत नाही व ड्रे मध्ये अडकून रस्त्यावर पाणी साचते. काही जण वापरलेले काही प्लॅस्टिक-वस्तू कचराकुंडीत न टाकता थेट ड्रेनमधून फ्लश करून देतात त्यामुळे सिवेज पाईपलाईन ब्लॉक होते. काही अशा ठिकाणी गाड्या पार्क करतात की पालिकेला ड्रेन साफ करता येत नाही. काही लोक ओला कचरा व सुका कचरा यांच्यामध्ये वर्गीकरण करत नाही. खरेदीसाठी मार्केटमध्ये जाताना पुनर्वापर करण्यायोग्य कापडी पिशव्या न घेता प्लॅस्टिकच्या कॅरीबॅग वापरतो. सबब, सतत महापालिकेला दोषी न ठरवता आपण या शहराची काळजी घ्यावी व एका जबाबदार नागरिकाप्रमाणे वागून महापालिकेला सहकार्य करून आपले शहर सुंदर केले पाहिजे, असे वाटते.

**शशिकांत दलाल**/९८२२३६५१९०

### 'आशा' नाम मनुष्याणां काचिदाश्चर्यशृंखला

'आशा' नावाची एक अजब साखळी आहे. ती माणसाच्या पायी बांधलेली असेल तर तो धावू लागतो. ती बेडी पायातून विलग झाली, की माणूस अगतिक होतो; पांगळा होतो. आशा हे माणसातल्या गतिमानतेचं एकमात्र कारण आहे. आशाताई भोसले हे देखील त्याच गतिमानतेचं सांगीतिक प्रतिरूप आहे. भारतीय संगीत रसिकांसाठी जसा 'लता' हा एकेरी संबोधनाचा शब्द, तसाच 'आशा' हादेखील! आशाच्या जाण्यामुळे सांगीतिक गतिमानतेचं एक चक्र थांबलं. गाणारे खूप झाले, पुढेही होतील. प्रत्येकाची जीवनचक्रं कधी ना कधी थांबणारच. पण आशा नावाचं हे चक्र हे काही साधंसुधं नव्हतं. ते सुदर्शनासारखं दैवी होतं अन् धारदार होतं! बिजलीसारखा लखलखीत, भेदक आणि अमोघ असलेला तो आशेचा स्वर अद्वितीय असा होता. लता म्हणजे भगवंताची बासरी, तर आशा म्हणजे त्याचं सुदर्शन! सुरेश भटांनी आशेच्या स्वरांना बिजलीसम तळपत राहण्याच्या शुभेच्छा दिल्या होत्या. आशेचा स्वर म्हणजे इंद्रधनु! मानवी भावविश्वाच्या साऱ्या रंगांना त्या इंद्रधनुष्याने चितारले. शृंगार, वीर, करुण, अद्भुत, हास्य, भयानक, बीभत्स, रौद्र, शांत अशा नऊही रसांना त्या स्वराने संपूर्ण न्याय दिला. भजनातली आर्तता, कॅब्रेतली मादकता, अंगाईतले वात्सल्य, बालगीतातली निरागसता, प्रेमगीतातला प्रणय, विराणींमधला विरह, मुजऱ्यांमधली नजाकत, लावण्यांमधला ठसका, आधुनिक गाण्यांमधला धिंगाणा, गझलांमधली कशिश, नाट्यसंगीतातला बाज, शास्त्रीय संगीतातली गरिमा- हे एकाच गळ्यातून इतकं अचूक कसं काय प्रकटू शकतं; हे आशाला ऐकून सतत वाटत राहतं. सर्वार्थानं व्हर्सटाईल म्हणावी अशी एकमेव गायिका म्हणजे आशा! आशा पुन्हा होणे नाही. तसे गाणेही आता होणे नाही. एक मात्र खरं. आशेच्या जाण्याने जी पोकळी निर्माण झाली, ती भरू शकते केवळ तिच्याच गाण्याने! आशा अजर आणि अमर असते!



**डॉ. प्रसाद प्रकाश देशपांडे**/९८२२८२८५४४

### उष्णता प्रतिबंधक योजना

२७ एप्रिल २६ च्या अंकाच्या मुखपृष्ठावरील 'विदर्भावर 'रवि'वार' हे शीर्षक खूप भावले. सूर्य अक्षरशः आगरूपी वार करीत आहे. सकाळपासूनच सुरू झालेल्या उष्ण झळा रात्री ११ वाजेपर्यंत असतात. लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांचे प्रचंड हाल होतात. रात्री विजेचा पुरवठा मध्येच बंद झाला तर झोपेचे खोबरे होते.

भर दुपारी उन्हात फिरणाऱ्याची चिंता वाटते. ते घरी बसले तर खातील काय? प्रत्येक चौकात सिग्नलवर दुचाकी वाहकासाठी सावली मिळावी म्हणून हिरवी जाळी लावण्याची वार्ता वाचण्यात आली. पण अजूनही अनेक चौक तसेच आहेत. महानगर पालिकेच्या कर्मचाऱ्यांची 'कूर्म गती'ने पावसाळा उजाडेल असे वाटते. सध्याचे वाढते तापमान बघता सर्व उपाययोजना तातडीने अंमलात आणल्या तरच त्यांचा लाभ मिळू शकतो. अधिकारी वर्ग याकडे लक्ष देतील, अशी अपेक्षा करण्यास हरकत नसावी.

**संजय पाठक**/नागपूर

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

# इस्लापूरमध्ये वानरांचा सुळसुळाट, नागरिक त्रस्त

## वानरांच्या त्रासाला कंटाळून २ हजार झाडे काढण्याची वेळ

**तभा वृतसेवा**
**इस्लापूर , दि. २८ एप्रिल -**

भीषण उन्हाळा, वाढती पाणीटंचाई आणि त्यात भर म्हणून वानरांचा वाढता उपद्रव या तिहेरी संकटाने इस्लापूर शहरातील नागरिक हैराण झाले आहेत. पाण्याच्या शोधात वानरांचे कळप मोठ्या प्रमाणावर शहरात घुसत असून, दैनंदिन जीवन अक्षरशः विस्कळीत झाले आहे.

शहरातील विविध भागांमध्ये वानरांनी अक्षरशः सुळसुळाट केला असून, घरांच्या छतांवर चढून ते पाण्याच्या टाक्यांवर हल्ले करत आहेत. टाक्या फोडणे, झाकणे उघडणे, पाइपलाइनचे कनेक्शन तोडणे आणि साठवलेल्या पाण्याची सर्रास नासाडी करत धिंगाणा घालणे हे प्रकार आता रोजचेच झाले आहेत. त्यामुळे घरांमध्ये जपून ठेवलेले पाणी क्षणात वाया जात असून, नागरिक संताप व्यक्त करत आहेत.

या अचानक आणि आक्रमक हालचालींमुळे लहान मुले, महिला आणि वृद्ध नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. घरांच्या छतांवरून एका घरावरून दुसऱ्या घरावर झेप घेत वानरांचा सुरू असलेला उच्छाद पाहून अनेकांनी घराबाहेर पडतानाही सावधगिरी बाळगण्यास सुरुवात केली आहे.

आधीच पाणीटंचाईने त्रस्त असलेल्या इस्लापूरकरांना या प्रकारामुळे दुहेरी फटका बसत आहे. एकीकडे पाण्याचा तुटवडा आणि दुसरीकडे साठवलेले पाणी वानरांकडून वाया घालवले जात असल्याने परिस्थिती अधिकच गंभीर बनली आहे. शिवाय, टाक्यांमध्ये वानरांच्या हस्तक्षेपामुळे



पिण्याच्या पाण्याच्या स्वच्छतेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

**फळबाग उध्वस्त : शेतकऱ्याचा लाखोंचा फटका**

इस्लापूर येथील शेतकरी पांडुरंग जाधव यांच्या शेतातील शासनाच्या 'पोखरा' योजनेअंतर्गत उभारलेली जांबाची फळबाग वानरांच्या सततच्या त्रासाला कंटाळून अक्षरशः उद्ध्वस्त करावी लागली. साडेतीन एकर क्षेत्रातील तब्बल २२०० झाडे काढून टाकण्याची वेळ

### टाक्या फोडून पाण्याचा हैदोस; साठवलेल्या पाण्याची उधळपट्टी

या शेतकऱ्यावर आली आहे.मेहनतीने उभा केलेला बाग प्रकल्प डोळ्यादेखत नष्ट झाल्याने शेतकरी हतबल झाला असून, या घटनेमुळे लाखोंचे आर्थिक नुकसान झाल्याची माहिती समोर आली आहे. वानरांच्या उपद्रवामुळे शेतीक्षेत्रालाही मोठा धोका निर्माण झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

तज्ज्ञांच्या मते, वाढती उष्णता आणि नैसर्गिक अधिवासात पाण्याची कमतरता यामुळे वन्य प्राणी मानवी वस्तीकडे वळत आहेत. इस्लापूरमध्ये हा प्रश्न आता गंभीर बनला असून, तातडीने उपाययोजना करण्याची गरज आहे.

नागरिक आणि शेतकरी प्रशासनाकडे तीव्र नाराजी व्यक्त करत असून, वानरांना सुरक्षितरित्या त्यांच्या अधिवासात परत पाठवावे, पाण्याचे योग्य व्यवस्थापन करावे आणि या उपद्रवावर नियंत्रण आणावे, अशी जोरदार मागणी होत आहे. सध्या तरी इस्लापूरमध्ये वानरांचा वाढता कहर लक्षात घेता नागरिकांनी सतर्क राहणे आणि आवश्यक ती खबरदारी घेणे अत्यावश्यक ठरत आहे.

# कर्ज वाटप व स्वयंरोजगार मेळाव्यात लाभार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे : मंत्री अतुल सावे

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २८ एप्रिल -**

महाराष्ट्र राज्यातील विमुक्त जाती, भटक्या जमाती इतर मागास प्रवर्ग आणि विशेष मागास प्रवर्गातील शेतकरी, लघुउद्योजक, सुशिक्षित बेरोजगारांना स्वावलंबी बनविण्यासाठी तसेच त्यांना स्वत:चा व्यवसाय सुरू करण्यासाठी इतर मागास बहूजन कल्याण विभागाच्यावतीने लातूर, परभणी, हिंगोली, नांदेड जिल्ह्यातील लाभार्थींसाठी कर्जवाटप व स्वयंरोजगार मेळाव्याचे दि.३० एप्रिल २०२६ रोजी आयोजन करण्यात आले आहे, तरी या मेळाव्यात लाभार्थींनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी केले.



इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, वंसतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, महाज्योती आणि वनार्टी यांच्या संयुक्त विद्यामाने लातुर, परभणी, हिंगोली आणि नांदेड या जिल्ह्यातील लाभार्थ्यांकरीता श्री. शंकरराव चव्हाण सभागृह, विष्णुनगर, नांदेड या सभागृहात दि.३० एप्रिल २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता कर्ज वाटप व स्वयंरोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या मेळाव्यात महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, वंसतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, महाज्योती व वनार्टी या महामंडळाच्या कर्ज वाटप व प्रशिक्षण योजनांबाबत ऑनलाईन अर्ज कसा करावा, अर्जाकरीता आवश्यक कागदपत्रे कोणती आणि अर्जातील त्रृटी कशा टाळाव्यात याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, वंसतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, महाज्योती व वनार्टी या योजनेतील पात्र, निवड झालेल्या लाभार्थ्यांना सशर्त हेतुपत्र (ङजख), मंजुरी पत्राचे वाटप, प्रशस्तीपत्र, मेडलचे वाटप, ट्रॅक्टर, वाहने वगैरे वस्तुचे वितरण करण्यात येणार आहे.

विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील शेतकरी, लघुउद्योजक, सुशिक्षित बेरोजगार तरुणांनी महामंडळाच्या योजनांचा लाभ घेऊन स्वत:चा व्यवसाय सुरू करण्यासाठी, लाभार्थींना तांत्रिक व आर्थिक मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यात येणार असल्याने, या संधीचा जास्तीत जास्त लोकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुलजी सावे यांनी केले आहे.

## मुदखेड शहरात भारतरत्न डॉ. आंबेडकर जयंती मोठ्या उत्साहात साजरी

**मुदखेड** -मुदखेड शहरात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती महोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. भिमजयंती निमित्त दरवर्षीप्रमाणे याही वर्षी महात्मा फुले चौक मित्र परिवाराच्या वतीने खिचडी वाटप करण्यात आले. मुदखेड शहरातील बौद्ध प्रशिक्षण केंद्र भिमनगर नयाआबादी, अशोक नगर, लुंबिनी नगर, रेल्वे कॉलनी, समता नगर, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या



नियोजित जागी महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती दि.२६ एप्रिल रोजी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी भंतेजी व उपासक यांच्या हस्ते पंचशील ध्वजारोहण करून बुद्ध वंदना घेण्यात आली. विविध राजकीय पक्ष व संघटनांच्या वतीने महामानवास अभिवादन करण्यात आले. या नंतर शहरातील प्रमुख मार्गावरून महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात आली होती. यंदा डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त मुदखेड येथील भिमजयंती मंडळाने आकर्षक देखावे सादर केले. भिमनगर भिमजयंती मंडळाने संविधान प्रस्तावना आणि पेन असा आकर्षक देखावा सादर केला होता. तर अशोका नगर भिमजयंती मंडळाने महाड चवदार तळे सत्याग्रह १९२७ चे ऐतिहासीक घटनेचा जिवंत देखावा उभारून जनजागगृती केली. नविआबादी लुंबिनी नगर, समता नगरच्या भिमजयंती मंडळानेही देखावे केला होता. भिमजयंती निमित्ताने का. गोदावरीबाई शेटीबा झगडे यांच्या स्मरणार्थ झगडे परिवाराच्या वतीने थंड पेय वाटप करण्यात आले होते. तर अपरंपार मित्रमंडळाच्या वतीने मठ्ठा वाटपाचा कार्यक्रम ठेवण्यात आला होता. तसेच चौधरी गल्ली येथे माजी नगराध्यक्ष राम चौधरी यांच्या वतीने मठ्ठा व माजी नगराध्यक्ष राजबहादुर कोत्तावार यांच्या वतीने पाणी बॉटल वाटप करण्यात आले. शहरातील सर्व भिमजयंती मिरवणूक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नियोजित पुतळ्याच्या ठिकाणी सांगता करण्यात आली. यावेळी भिमजयंती उत्साहात पार पडावी यासाठी मुदखेड पोलिस ठाण्याचे पोलिस निरिक्षक धिरज चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि बि.आर. कांबळे, आकाश सरोदे, बलविरसिंह ठाकुर, मधुकर भिसे,अरविंद शिंगारपुतळे, यासह पोलिस कर्मचारी व होमगार्ड, यांनी कडक बंदोबस्त ठेवला होता.

## 'बुध्द पहाट'ची कार्यकारिणी जाहिर अध्यक्षपदी सावंत तर सचिवपदी एडके

**नवीन नांदेड** -विश्वाला शांतीचा संदेश देणारे महाकारुणिक तथागत भगवान बुद्ध यांच्या जयंती निमित्त बुद्ध पहाट या सांस्कृतिक कार्यक्रमाचे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी आयोजन करण्यात आले आहे. सदरील समितीचे



मुख्य संयोजक प्रमोदकुमार गजभारे यांच्या अध्यक्षतेखाली संयोजन समिती गठीत करून विविध पदाधिकाऱ्याची निवड करण्यात आली आहे. नांदेड शहरात मध्ये दिनांक १ मे रोजी तथागत गौतम बुद्ध यांच्या जयंतीनिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर सोशल अँण्ड कलचरल मुहमेंट नांदेड निर्मित प्रमोदकुमार गजभारे यांच्या वतीने बुद्ध पहाट हा लोकप्रिय सांस्कृतिक कार्यक्रम दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी दि.२ मे रोजी पहाटे ५ वाजता आयोजित करण्यात आला आहे. यावर्षी सलग १८ वे वर्षे असुन हा कार्यक्रम दि.१ मे रोजी बुद्ध पौर्णिमा दिवसी महाराष्ट्र दिन असल्या कारणाने हा कार्यक्रम दि.२ मे रोजी पहाटे ५ वाजता डॉ शंकरराव चव्हाण प्रेक्षागृह येथे होणार आहे.सदरील कार्यक्रम हा सर्व जनतेत लोकप्रिय असून बुद्ध धम्मातील उपासक-उपासिका यांचा मोठा प्रतिसाद मिळनार आहे.यावर्षी आतापासूनच सदरील जयंती कार्यक्रमाचे आयोजन केले आसल्याने समाज बांधवांतुन मोठी उत्सुकता असुन त्याची जोरदार तयारी सुरू आहे.यावर्षी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संयोजन समिती गठीत करण्यात आली असून ती पुढील प्रमाणे आहे. कार्यक्रमाचे मुख्य स्वागत अध्यक्षपदी सामाजिक कार्यकर्ते राजरत्न पवार हे असून अध्यक्ष प्रभू सावंत, उपाध्यक्ष सुरेश गजभारे ,विजय कांबळे, सचिव संदीप एडके, कार्याध्यक्ष आनंद जोधंळे, सहसचिव एम.टी.पंडित, कोषाध्यक्ष पंडित अढाव , मारुती कांबळे, संघटक दिनेश सूर्यवंशी यासह संघटक अंकुश कुमार चित्ते सल्लागार अनिल भद्रे, एस. व्ही. हनुमंते तर सदस्य म्हणून नितीन विनकरे, शिवाजी सोनकांबळे, रवींद्र सोनकांबळे कल्हाळीकर अशी समिती गठीत करण्यात आले आहे.

## चुडावा रेल्वे स्टेशन येथे भीमजयंती सोहळा

**चुडावा** -पूर्णा तालुक्यातील चुडावा रेल्वे स्टेशन या ठिकाणी दरवर्षी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव बाबासाहेब डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहाने साजरी होते, यावर्षी दि. ३० एप्रिल रोजी जयंती सोहळा आयोजीत करण्यात आला आहे. महामानवाच्या विचारांना अभिवादन व आनंदोत्सव साजरा करण्यासाठी चुडावा रेल्वे स्टेशन परिसरातील सर्वांनी यावे असे आवाहन भीमजयंती मंडळाकडून करण्यात आली आहे.

## राष्ट्रध्वजासाठी प्लास्टिक वापरास सक्त मनाई ध्वजसंहितेचे पालन करण्याचे आवाहन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २८ एप्रिल -**

राष्ट्रीय कार्यक्रम, महत्वाचे सांस्कृतिक कार्यक्रम आदी समारंभाच्या निमित्ताने राष्ट्रध्वजाचा वापर करताना, भारतीय राष्ट्रध्वज संहितेचे काटेकोर पालन करावे. तसेच कोणत्याही परिस्थितीत प्लास्टीकचे राष्ट्रध्वज वापरण्यात येऊ नयेत. यासाठी सर्व शासकीय यंत्रणांसह शाळा, महाविद्यालय, संस्था, संघटना आदीसह नागरीकांनी दक्ष रहावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

दरवर्षी २६ जानेवारी, १५ ऑगस्ट, १ मे तसेच मराठवाडयात १७ सप्टेंबर आणि इतर राष्ट्रीय कार्यक्रम, महत्वाचे सांस्कृतिक कार्यक्रम व क्रिडा सामन्यांच्यावेळी विद्यार्थी व नागरिकांकडून राष्ट्रध्वजाचा वापर करण्यात येतो. अशा कार्यक्रमात प्लास्टिक चे ध्वज वापरल्याने, कार्यक्रमानंतर फाटलेले कागदी तसेच प्लास्टिकचे ध्वज मैदानात, रस्त्यावर तसेच कार्यक्रमाच्या ठिकाणी इतस्तत: पडलेले असतात, पायदळी तुडविले जातात. त्यामुळे राष्ट्रध्वजाचा अवमान होतो. राष्ट्रध्वजाचा उचीत सन्मान राखण्यासाठी भारतीय ध्वज संहितेच्या कलम १.२ ते १.५ मध्ये राष्ट्रध्वजाच्या उचित वापराबाबत स्पष्ट तरतूद आहे. ध्वजसंहितेच्या कलम २.२ () मधील प्रयोजनासाठीच कागदी राष्ट्रध्वज वापरता येतो. प्लास्टिकच्या राष्ट्रध्वजाच्या वापराबाबत ध्वजसंहितेमध्ये उल्लेख नमूद नाही. याचा विचार करता ध्वजसंहितेच्या तरतुदींचे पालन करावे. तसेच कोणीही प्लास्टिकच्या राष्ट्रध्वजाचा वापर करु नये.

प्लास्टिक व कागदी राष्ट्रध्वजांचा वापर थांबविण्यासाठी जनजागृती करण्याकरिता जिल्हा व तालुका पातळीवर समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. कार्यक्रम पार पडल्यानंतर खराब झालेले, माती लागलेले राष्ट्रध्वज मैदानात, रस्त्यावर तसेच कार्यक्रमाच्या ठिकाणी इतस्तत: पडलेले राष्ट्रध्वज गोळा करुन ते तालुका व जिल्हा स्तरावर निर्माण करण्यात आलेल्या यंत्रणेस सुपूर्द करण्याचे अधिकार अशासकीय संस्था तसेच इतर संघटनांना देण्यात आले आहेत. त्यांनी असे खराब झालेले, माती लागलेले ध्वज जिल्हाधिकारी व तहसिलदार यांच्याकडे सुपुर्द करावेत. अशासकीय संस्था, इतर संघटनांनी तसेच नागरिकांनी सुपूर्द केले असे ध्वज गोणी किंवा कपडयामध्ये व्यवस्थित बांधून शिवून बंद करावे. अशाप्रकारे बांधलेले राष्ट्रध्वज सन्मानपूर्वक नष्ट करण्याबाबत परिपत्रकात व ध्वजसंहितेत स्पष्ट सूचना आहेत. त्यानुसार खराब झालेल्या ध्वजाची विल्हेवाट लावण्यासाठी तालुका व जिल्हा पातळीवर केलेल्या उपरोक्त व्यवस्थेबाबत सर्व शासकीय कार्यालये, अर्धशासकीय कार्यालये, स्थानिक प्राधिकरणे व शैक्षणिक संस्था यांनी योग्य ती दखल घ्यावी व कार्यवाही करावी, असेही गृह विभागाने म्हटले आहे.

## प्रा. जोगेंद्र कवाडे यांच्या हस्ते महेंद्र पिंपळगावकर यांचा सन्मान

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २८ एप्रिल -**

२० मार्च महाड चवदार तळे सत्याग्रह दिन हा राष्ट्रीय जलदिन म्हणून घोषित करण्याची मागणी सातत्याने लावून धरलेले महेंद्र पिंपळगावकर यांच्या कार्यास प्रोत्साहन मिळावे म्हणून त्यांचा डॉ. बी.आर. आंबेडकर फाऊंडेशनच्यावतीने आयोजित कृष्णाई पुरस्कार वितरण समारंभात लाँग मार्च प्रणेते प्रा. जोगेंद्र कवाडे यांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला.

हॉटेल ताज पाटील च्या सभागृहात पार पडलेल्या पुरस्कार वितरण सोहळा कार्यक्रमास पीआरपीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. जोगेंद्र कवाडे, किनवट- माहूरचे आ. भीमराव केराम, संपादक शंतनु डोईफोडे, वंचित बहुजन आघाडीचे फारुख अहेमद, सभापती विरेंद्रसिंघ गाडीवाले, श्रीकांतअण्णा गायकवाड, डॉ. बी.आर. आंबेडकर फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष बापूसाहेब गजभारे, उपाध्यक्ष सतीश बनसोडे आदी मान्यवरांची यावेळी उपस्थिती होती.

२० मार्च महाड चवदार तळे सत्याग्रह दिन हा राष्ट्रीय जलदिन घोषित करण्याच्या मागणीसाठी महेंद्र पिंपळगावकर हे मागील काही काळापासून सातत्याने प्रयत्नरत आहेत. देशाच्या राष्ट्रपती, पंतप्रधानांसह विविध राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांच्या प्रत्यक्ष भेटी घेऊन व काही जणांना निवेदने देऊन ही मागणी लावून धरली आहे. पिंपळगावकर यांच्या या कार्याचे कौतुक करुन त्यांचा प्रा. जोगेंद्र कवाडे यांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला. पिंपळगावकर यांच्या या कार्याचे सर्वत्र कौतुक होत असून त्यांना सर्व स्तरातून मोठ्या प्रमाणात पाठिंबा मिळत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

## लोहा तालुक्यातील आडगाव येथे प्रवीण चिखलीकर यांच्या हस्ते ५६ लक्ष रुपयांच्या बंधाऱ्याचे भूमिपूजन



**तभा वृतसेवा**
**लोहा, दि. २८ एप्रिल -**

आडगाव ता. लोहा येथे युवा नेते प्रविण पाटील चिखलीकर यांच्या हस्ते ५६ लक्ष रुपयाच्या बंधाऱ्याचे भूमीपुजन करण्यात आले. या बंधाऱ्यामूळे भूजल पातळीत वाढ होईल तसेच पाणी अडविले जाईल त्याचा शेतीसाठी उपयोग होणार आहे. असे प्रविण पाटील चिखलीकर यांनी विश्वास व्यक्त केला.

आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी आपल्या मतदार संघात सिंचन क्षेत्र वाढावे यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत .पाटबंधारे तसेच संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यां सोबत त्यांनी मागील महिण्यापूर्वी बैठक घेतली नाला सरळीकरण लोहा शहरातुन वाहणाऱ्या नदीचे खोलीकरण सिमेंट ,दगडी ,माती बंधारे तसेच कृषी विभागाकडून छोटे चर, जलयुक्त मध्ये कामे काय घेता येतील याबाबत सविस्तर चर्चा केली अडीअडचणीच्या जाणून घेतल्या काही तांत्रिक अडचणी दूर केल्या तसेच कामांचे मान्यता अंदाजपत्रक तयार करण्या बाबतच्या सूचना देण्यात आल्या.

लोहा तालुक्यातील आडगाव येथे लघु पाटबंधारे विभागाच्या वतीने ५६ लक्ष रुपयाच्या साठवण सिमेंट बंधाऱ्याचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस प्रविण पाटील चिखलीकर यांच्या हस्ते भूमीपुजन करण्यात आले . माजी उपनगराध्यक्ष या भागाचे माजी पं. स. सदस्य दता वाले. गावचे सरपंच मंगेश क्षीरसागर, इजि . माधव पाटील चितळीकर शासकीय तालुकास्तरीय बांधकाम समिती सदस्य अर्जुन राठोड, माजी सरपंच लक्ष्मण वाले यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी गावातील शेतकयांचा सत्कार करण्यात आला.



## जीवघेण्या उड्डाण पुलावर गतिरोधक बसविण्याची मागणी

**तभा वृतसेवा**
**भोकर, दि. २८ एप्रिल -**

वेगवान वाहनांची गती कमी होण्यासाठी शहरातील उड्डानपुलावर डांबरी गतिरोधक बसवा अशी मागणी प्रहार जनशक्ती पक्षाचे तालुकाध्यक्ष यांची ड. शेखर कुंटे यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

दि.२६एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमीत्त शहिद प्रफुल्ल नगर येथून तैलचित्रासह मिरवणूक निघाली होती मिरवणूक उड्डानपुलावर आली असता भोकर शहरातून नांदेडकडे निघालेल्या भरधाव पिकअप बोलेरो क्र एम एच २६ सिएच ३७४१वरील चालकाचा ताबा सुटल्याने वाहन मिरवणुकीत घुसले मिरवणुकीत सहभागी झालेले संदीपभाऊ गायकवाड व खंडेश्वर जिनेवाड हे गंभीर जखमी झाले उपचारासाठी नेत असतांना वाटेतच संदिप गायकवाड यांचा मुत्यु झाला तर खंडेश्वर जिनेवाड गंभीर जखमी झाले उड्डानपुलावर अनेक छोटे मोठे आपघात घडले असून सदर उड्डान पुल सामान्य नागरिकासाठी जीवघेणा झाला आहे सुसाट येणाऱ्या वाहनांचा वेग कमी असावा यासाठी उड्डान पुलावर जागोजागी मजबूत डांबरी गतिरोधक बसवण्यात यावे अशी मागणी प्रहार पक्षाचे भोकर तालुकाध्यक्ष अॅड. शेखर कुंटे यांनी भोकर सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडे केली. यावेळी भोकर प्रहार युवा तालुकाध्यक्ष सुनीलभाऊ उल्लेवाड, विधीसेवा तालुकाध्यक्ष शेख शम्मू अल्पसंख्याक तालुकाध्यक्ष,शेख कलीम आदिची उपस्थिती होती.

# मुक्रमाबाद येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी

**तभा वृतसेवा**
**मुक्रमाबाद, दि. २८ एप्रिल -**

मुक्रमाबाद येथील सिद्धार्थ नगर नालंदा बौद्ध विहार येथे दि.२७ एप्रिल रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली आहे.

मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद येथील नालंदा बौद्ध विहार येथे दि. २७ रोजी सकाळी ठिक १० वाजता उपस्थित मान्यवरांच्या हस्ते भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार महामानव भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज, जगत् ज्योती महात्मा बसवेश्वर, राजश्री शाहू महाराज, साहित्य रत्न लोकशाहिर अण्णाभाऊ साठे, आदि सर्व महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करुन अभिवादन करण्यात आले.

प्रारंभी सरपंच सौ.अंजिताताई बोधने यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी उपस्थित अनेक मान्यवरांनी महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जिवन चरित्रावर प्रकाश टाकला

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष लोकनेते व्यंकटराव पाटील गोजेगावकर, हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून उपसरपंच सदाशिव बोयवार, बालाजी पाटील गोजेगावकर, भाजपाचे मुखेड तालुका अध्यक्ष हेमंत खंकरे, शेतकरी संघटनेचे नेते शिवशंकर पाटील कलंबरकर, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष गौसखाँ पठाण, माजी सैनिक व्यंकट सुर्यतळे, पोलिस पाटील व्यंकट सुवर्णकार, सामाजिक कार्यकर्ते अब्दुल पटेल, बिट जमादार सुरेश भुताळे, पत्रकार दादाराव गुमडे, विनोद आपटे, युवानेते अतुल सुन्नेवाड, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवानेते मगदुम पठाण. आदिंची प्रमुख उपस्थिती होती. सुत्रसंचलन पत्रकार रज्जाक कुरेशी यांनी केले तर आभार राजकुमार गायकवाड यांनी मानले.

मुक्रमाबाद शहरातील जूना बौद्ध विहार येथुन डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या तैलचित्राचे रथातून भव्य दिव्य मिरवणूक ढोल ताशाच्या गजरात जय भिम घोषणांनी काढण्यात आली हि मिरवणूक जुन्या गावातुन निघून होऊन भवानी मंदिर चौक ते गणपती मंदिर परिसर व मुख्य बाजारपेठेतुन बसस्थानकावरील मुख्य चौकातून मिरवणूक मार्गस्थ झाली. तर बसस्थानकावरील मुख्य चौकात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जिवन चरित्र व त्यांनी केलेल्या कार्याची एलीईडी स्क्रीनवर चित्रफीत दाखविण्यात आली. यावेळी अनेक नागरिकांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर बद्दल माहिती जाणून घेतली

जयंती कार्यक्रम यशस्वीतेसाठी जयंती मंडळाचे अध्यक्ष सागर वानकर, उपाध्यक्ष अमोल कांबळे, सचिव मनोज गायकवाड, सहसचिव संदीप कांबळे, मार्गदर्शक बालाजी गायकवाड, मार्गदर्शक क्रांती कुमार वाघमारे, राहुल कांबळे, पवन वानकर, संघर्ष गायकवाड, अमोल गायकवाड, शैलेश वानकर, बुद्धभुषण कांबळे, अविनाश गायकवाड, सुनिल कांबळे, अधूनिक फकिरा प्रतिष्ठान ग्रुपचे जगदीप कांबळे, धनाजी बोयवार, विकास बोयवार, अमोल बोयवार,आदि पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले. या जयंती कार्यक्रम व मिरवणूकीत काही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक राजू चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली बिट जमादार सुरेश भुताळे,एस.जी देवकत्ते, गोपनीय शाखेचे माधव मलगीरवार, होमगार्ड बाबूराव गवते, आदिनी चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता. कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी ट्रगिंग फोर्स नांदेड यांना पाचारण करण्यात आले होते

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## जिल्हाधिकाऱ्यांकडून ग्राम रोजगार सहायकांच्या आंदोलनाची दखल

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि.२८ एप्रिल :** महाराष्ट्र राज्य ग्रामरोजगार सेवक संघ, जिल्हा लातूर यांच्या वतीने प्रलंबित मागण्यांसाठी सोमवार दि. २७ एप्रिल पासून जिल्हाधिकारी कार्यालया समोर बेमुदत धरणे आंदोलन सुरू केले होते. सध्या उन्हाळ्याचे दिवस असल्याने उष्माघाताने होणाऱ्या परिणामामुळे जिल्हाधिकारी यांनी आजच्या आज ग्राम रोजगार सहाय्यकांच्या आंदोलनाची दखल घेऊन मंत्रालयाला पत्र पाठवून आंदोलन मागे घेण्याची विनंती केली. ग्राम रोजगार सहाय्यकांनी त्यांच्या विनंतीला मान देऊन आंदोलन तात्पुरते स्थगित केले आहे.

शासनाच्या ३ ऑक्टोबर २०२४ च्या निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी, तसेच इतर प्रलंबित व न्याय्य मागण्यांसाठी जिल्ह्यातील सर्व रोजगार सहाय्यकांनी १ एप्रिल पासून काम बंद आंदोलन सुरू केले आहे. मात्र, अनेक वेळा प्रशासनाशी पत्रव्यवहार करूनही अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. या पार्श्र्वभूमीवर जिल्ह्यातील सर्व रोजगार सहाय्यक, जिल्हा पदाधिकारी व तालुका पदाधिकाऱ्यांची बैठक घेऊन, मागण्या पूर्णपणे मान्य झाल्याशिवाय काम बंद आंदोलन मागे घेतले जाणार नाही, अशी ठाम भूमिका घेण्यात आली. त्यानुसार सोमवार दि. २७ एप्रिल पासून जिल्हाधिकारी कार्यालया समोर ग्राम रोजगार सहाय्यकांनी बेमुदत धरणे आंदोलन सुरू केले होते. जिल्हाधिकारी आंदोलनाची दखल घेऊन मंत्रालयाला पत्र पाठवून आंदोलन मागे घेण्याची विनंती केली. ग्राम रोजगार सहाय्यकांनी त्यांच्या विनंतीला मान देऊन आंदोलन तात्पुरते स्थगीत केले आहे.



## विविध वृत्त...

### लातूरचा पाणीपुरवठा सुरळीत

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि.२८ एप्रिल :** शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या मांजरा प्रकल्पावरील विद्युत पुरवठ्यात रविवारी (दि.२६) बिघाड झाल्यामुळे धनेगाव येथील मांजरा प्रकल्पावरून शहराला होणारा पाणीपुरवठा खंडित झाला होता. परंतु, सायंकाळीच बिघाड दुरुस्त करण्यात आला. त्यानंतर पाणीपुरवठा सुरळीत झाला असल्याचे महापालिका प्रशासनाच्या वतीने कळविण्यात आले.

रविवारी धनेगाव येथून पाणीपुरवठा करणाऱ्या मांजरा प्रकल्पाला एक्सप्रेस फीडरद्वारे होणारा पाणीपुरवठा तांत्रिक कारणांनी खंडित झाला होता. युद्धपातळीवर काम करून तो सायंकाळपर्यंत पूर्ववत करण्यात आला. परंतु, या बिघाडामुळे रविवारी दुपारी १२ ते सायंकाळी ७ या कालावधीत प्रकल्पावरून पाणी उचलण्याची प्रक्रिया थांबलेली होती. सायंकाळी ती पुन्हा सुरू झाली. यामुळे काही काळासाठी शहरातील पाणीपुरवठ्याचे नियोजन विस्कळीत झाले होते. सोमवारी ते पूर्ववत सुरू झाले आहे. शहरातील नागरिकांना दर पाचव्या दिवशी नियमितपणे पाणीपुरवठा केला जात आहे. उन्हाळ्याचे दिवस असले तरी पाणी वेळेत मिळावे, याची काळजी प्रशासनाच्या वतीने घेतली जात आहे. तांत्रिक बाबींमुळे काही वेळा अडचणी निर्माण झाल्या तरी तत्काळ उपाययोजना करून पाणीपुरवठा सुरळीत केला जात असल्याची माहिती महापालिकेच्यावतीने देण्यात आली.

### वासवीदेवी जयंतीनिमित्त मिरवणूक

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि.२८ एप्रिल :** आर्य वैश्य समाजाची कुलस्वामिनी वासवीदेवी जयंतीनिमित्त शहरात भक्तिभावाने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. आर्य वैश्य यूथ संघटनेने येथील शासकीय रुग्णालयात रुग्ण व नातेवाईकांना खिचडी व बर्फी वाटप केले. आर्य वैश्य समाजाच्या वतीने काढण्यात आलेल्या मिरवणुकीत समाजबांधवांनी सहभाग नोंदविला.

यात आकर्षक रथावर माता वासवीदेवींची प्रतिमा सजविण्यात आली होती. पारंपरिक वेशभूषेत महिला, युवकांनी सहभाग नोंदविला. ढोल-ताशांच्या गजरात वातावरण भक्तिमय झाले होते. विविध सांस्कृतिक कार्यक्रम, भजन-कीर्तन आणि धार्मिक प्रवचनांचे आयोजन करण्यात आले होते. समाजातील ऐक्य, बंधुता वाढवण्याचा संदेश देण्यात आला. शहरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते. मिरवणुकीनंतर नगरेश्र्वर मंदिरात वासवीदेवीची आरती झाली. समाज बांधवांनी स्नेहभोजन केले. या मिरवणुकीच्या यशस्वीतेसाठी सोमनाथ बोरलेपवार, संगम कोटलवार, संजय पंपटवार, आर्य वैशय समाज अध्यक्ष दीपक कोटलवार, सचिव सुनील बच्चेवार, उषा बट्टेवार, विठ्ठल तगडपल्लेवार, संजय पंपटवार यांच्यासह समाजबांधवांनी परिश्रम घेतले.

### जिल्हा परिषदेत होणार ओपीडी सोय

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि.२८ एप्रिल :** हल्ली जीवघेण्या उन्हामुळे नागरिकांना सकाळपासून सायंकाळपर्यंत प्रचंड अस्वस्थ होत आहे. गेल्या आठवडाभरात जिल्हा परिषदेत एक, दोघांना चक्कर येण्याचा प्रकार घडला. ही बाब जि. प. अध्यक्षा उषा पाटील यांच्यापर्यंत गेल्याने त्यांनी जिल्हा परिषदेत एक स्वतंत्र ओपीडी सुरू करण्याचा निर्णय जाहीर केला.

जिल्हा परिषदेत सुरू केल्या जाणाऱ्या ओपीडीत अधिकारी, कर्मचाऱ्यांसह कामानिमित्त जिल्हा परिषदेत येणाऱ्या अभ्यंगतांनाही आरोग्य सुविधा दिल्या जाणार आहेत. जिल्हा परिषदेकडे स्वतंत्र आरोग्य विभाग कार्यरत आहे. या विभागात चार, पाच तज्ज्ञ डॉक्टरांची टीम आहे. तसेच औषध, गोळ्यांचीही उपलब्धता आहे. जिल्हा परिषदेतल्या तळमजल्यावरील आरोग्य विभागाच्या नजीक स्वतंत्र ओपीडी कक्ष स्थापन करण्याचा मनोदय अध्यक्षा पाटील यांनी व्यक्त केला.

## भगवंताच्या सेवेसाठी आपला देह अर्पण करावा : उत्तरेश्वर पिंप्रीकर



**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि.२८ एप्रिल :** भगवंताचे नामचिंतन घेतले तर ते स्थान पवित्र होते. चांगल्या जागेत सकारात्मक संकल्प सतत येत असतात. त्यामुळे हा देह भगवंताच्या सेवेसाठी अर्पीत करावा. जेथे संतांचे स्थान असते तेथे भगवंताचे अधिष्ठान असते. तिथली माती सुद्धा पवित्र होते. आज विश्वधर्मी मानवतातीर्थ भवनाची वास्तू हे विश्वाचे कल्याण करेल असे मौलीक विचार ह.भ.प. नारायण महाराज उत्तरेश्वर पिंप्रीकर यांनी व्यक्त केले.

विश्वशांती केंद्र आळंदी, माईर्स एमआयटी, पुणे व समस्त गावकरी रामेश्वर यांच्या संयुक्त विद्यमाने विश्वधर्मी मानवतातीर्थ भवन रामेश्वर येथे संत गोपाळबुवा महाराज अखंड हरिनाम सप्ताह आणि शिवशक्ती अनुष्ठान यज्ञ सोहळा मोठ्या भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. या सप्ताहाचा समारोप ह.भ.प. नारायण महाराज उत्तरेश्वर पिंप्रीकर यांच्या काल्याच्या किर्तनाने झाला. विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ कराड यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या विश्वधर्मी मानवतातीर्थ भवनाची वास्तुशांती होम हवन आणि अध्यात्मिक अनुष्ठानाच्या माध्यमातून करण्यात आली.

समारोप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे कार्याध्यक्ष डॉ. राहुल विश्वनाथ कराड हे होते. यावेळी रामेश्वरचे माजी सरपंच तुळशीराम कराड, प्रगतीशील शेतकरी काशीराम कराड, लातूर ग्रामीणचे आ. रमेशअप्पा कराड, एमआयटी एडीटीचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. मंगेशबापू कराड, सौ. उषा विश्वनाथ कराड, कमल राजेखाँ पटेल, संत गोपाळबुवा कारखान्याचे चेअरमन राजेश कराड, सरपंच सचिन कराड यांच्यासह रामेश्र्वर आणि पंचक्रोशितील भाविक भक्त मोठ्या संख्येनी उपस्थित होते. या सप्ताहात तानाजी पांचाळ यांच्या पुढाकाराने मुस्लिम मुलांनी सात ही दिवस विष्णुसहस्त्र नाम, मधुराष्टकम, भगवतगीतेतील १५ वा अध्याय, श्री पांडुरंग अष्टकम आणि पसायदान यांचे पठण केले ही सर्वात विशेष बाब होती.

ह.भ.प. नारायण महाराज पिंप्रीकर म्हणाले की, नामचिंतनात शक्ती असते. त्यामुळे भगवंताचे नामस्मरण सतत करावे. संकल्पांना सत्यात पूर्ण करण्याचे कार्य संतांच्या हस्ते होत असते. जन्म देणारी भूमी आणि माता ही स्वर्गापेक्षा श्रेष्ठ असते. तर याप्रसंगी बोलताना डॉ. राहुल कराड म्हणाले राज्यात वारकरी संप्रदायाचा प्रभाव आहे. त्यातच कराड घराण्यात ही संस्कृती तयार झाली. प्रत्येक व्यक्तीची नाळ ही गावाशी जुळली जावी. आज रामेश्र्वर गावाचे नाव संपूर्ण जगभरात मानवतेचा व विश्र्वशांतीचा संदेश देणारे गाव म्हणून ओळखले जात आहे. २१ व्या शतकात भारतीय संस्कृती ही संपूर्ण जगाला सुख, समाधान व शांतीचा मार्ग दाखवेल. तसेच ज्ञानाचे दालन म्हणून उदयास येईल. त्याची सुरूवात रामेश्र्वर या गावातून झाली आहे.

आ. रमेशअप्पा कराड म्हणाले की, ज्या गावात संप्रदाय वाढतो, त्या गावात एकी निर्माण हाते. डॉ. विश्र्वनाथ कराड यांच्या मार्गदर्शनाने रामेश्वर गावात राम मंदिर, दर्गा मस्जिद, बुद्ध विहार, राम-रहिम सेतू, गोपाळबुवा मंदिर आणि विश्र्वधर्मी मानवतातीर्थ भवन उभारल्याने गावाचे स्वरूप बदलले आहे. या सप्ताहात सर्व जाती धर्माचे लोग सहभागी झाले आहेत, हे अभिमानस्पद आहे.

डॉ. मंगेश कराड म्हणाले की, आपली जन्मभूमी स्वर्गापेक्षा अधिक प्रिय आहे. गाव आणि समाज बदलत चालला आहे. या बदलेल्या काळात गावातील सर्वांना एकत्रित आणणे गरजेचे असून त्यासाठी हरिनाम सप्ताहाचे आयोजन अतिशय महत्वाचे आहे. गावातील प्रत्येकाचे नाते हे या मातीशी जुळलेले असले पाहिजे. तर राजेश कराड म्हणाले की, मानवतातीर्थ भवन हे अद्वितीय आहे. ज्याची निर्मिती विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ कराड यांनी केली आहे. सर्वांना प्रेरणा देणारी ही वास्तू आहे. सप्ताहात रामेश्वर येथील प्रत्येक जाती धर्माचे व्यक्ती सहभागी झाले हे जगातील एकमेव उदाहरण आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ह.भ.प. शालिकराम खंदारे यांनी केले.

## लातुरात 'गो सन्मान अभियान'ची अभूतपूर्व शोभायात्रा





**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि.२८ एप्रिल :** 'न भूतो न भविष्यती' अशी भव्य आणि अद्भुत गो सन्मान अभियानाची शोभायात्रा सोमवारी लातूर शहरात उत्साहात पार पडली. हभप श्रीरंग महाराज औसेकर, हभप विद्याधरसागर महाराज गातेगावकर, हभप बाळकृष्ण महाराज वृंदावन गातेगावकर, बाबामहाराज काटेगावकर, हभप सुगावकर महाराज आदी संतांच्या मार्गदर्शनाखाली तसेच अजित पाटील कव्हेकर, मोटेगावकर सर, ललितभाई शहा, विनय भुतडा, संजय बोरा यांच्या प्रमुख उपस्थितीत या शोभायात्रा काढण्यात आली. लातुरातील हनुमान चौक येथून शोभायात्रेला प्रारंभ करण्यात आला. प्रारंभी शांतीनाथ जैन मंदिरात मान्यवरांच्या हस्ते आरती करण्यात आली. त्यानंतर श्री गणेश पूजन, श्रीराम पूजन व गोपूजन करून शोभायात्रेला सुरुवात झाली. या शोभायात्रेत गोमातेची भव्य प्रतिकृती, भगवान श्रीरामांचा आकर्षक रथ, भगवे झेंडे तसेच गोमातेच्या महत्त्वावर प्रकाश टाकणारे विविध फलक यांचा समावेश होता. जवळपास १०० गायी आणि हजारो गोभक्त व गोप्रेमी सहभागी झाल्याने वातावरण भक्तिमय झाले होते.

'गोमाता की जय', 'गोहत्या बंद करो' अशा घोषणांनी संपूर्ण शहर दुमदुमून गेले. टाळ-मृदुंगाच्या गजरात वारकरी, विद्यार्थी आणि पारंपरिक वेशभूषेतील सहभागी यांनी शोभायात्रेला रंगत आणली. महिलांचाही मोठ्या प्रमाणात सहभाग होता. ही शोभायात्रा गांधी चौक, लोकमान्य टिळक चौक मार्गे तहसील कार्यालयात विसर्जित करण्यात आली. तहसील कार्यालयात साधू-संत व गोप्रेमींनी तहसीलदारांना निवेदन दिले. यात गाईला 'राष्ट्रमाता' घोषित करणे, गोवंश हत्याबंदी कायद्याची कडक अंमलबजावणी, गोशाळांना वाढीव अनुदान व गोविज्ञानाला प्रोत्साहन देण्याच्या मागण्या करण्यात आल्या. हे निवेदन राष्ट्रपती, पंतप्रधान, मुख्यमंत्री आणि राज्यपाल यांच्याकडे पाठविण्यात येणार आहे. या शोभायात्रेने लातूरकरांचे विशेष लक्ष वेधले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी श्रीकांत रांजनकर, शरद डुंगरवाल, गोविंद कोठारी, निळकंठ महाराज, नितीन चापसी, किरण ब्रहोचा, सत्यनारायण सोनी, अतुल शहा, अजय गंभीरे, केयूर कामदार, आदर्श जैन, विवेक कुचेरिया, शुभम संकलेचा, प्रसिध्दी प्रमुख राजेश डुंगरवाल तसेच गोपाल गोसेवा न्यास मंडळ व सर्व गोप्रेमींनी परिश्रम घेतले.

## युरिया व डीएपी विक्री बंद ठेवण्याचा असोसिएशनचा निर्णय

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि.२८ एप्रिल :** रासायनिक खतांचे मार्जिन व लिंकिंग, खतांची विक्री करताना थेट गुन्हा दाखल करणे आणि 'साथी' ॲपच्या माध्यमातून बियाणे विक्री अनिवार्य केल्याच्या निषेधार्थ दि. २७ एप्रिलपासून खत विक्री बंद करण्याचा निर्णय लातूर जिल्हा फर्टीलायझर्स, पेस्टीसाईडस ॲण्ड सीड्स डिलर्स असोसिएशने घेतला आहे. ऐन खरीपाच्या पेरणीच्या तोंडावर खत विक्री बंद झाल्याने शेतकऱ्यांसमोर अडचणीचा डोंगर उभा राहिला आहे.

महाराष्ट्र फर्टिलायझर्स, पेस्टिसाइडस सीड्स डिलर्स विशाल कृतीचा असोसिएशन 'माफदा' यांनी सोमवारपासून बेमुदत बंदची हाक दिली आहे. 'माफदा'च्या या बंदला लातूर जिल्हा फर्टीलायझर्स, पेस्टीसाईडस ॲण्ड सीड्स डिलर्स असोसिएशनने पाठिंबा दिला आहे. कृषी निविष्ठा विक्रेत्यांना होणाऱ्या त्रासाच्या विरोधात 'माफदा'ने हा बंद पुकारला आहे. कृषी निविष्ठा विक्रेत्यांनी सीलबंद खतांची विक्री केली तरी त्यांच्याविरोधात थेट फौजदारी स्वरुपाची कारवाई केली जाते. खत विक्रेत्या कंपन्यांकडून लिकिंगची सक्ती केली जाते. साथी ॲपचा अग्रह, चनावट एचटीबीटी बियाणे आदी मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी 'माफदा'ने बेमुदत बंदची हाक दिली आहे. त्यास लातूरच्या खत विक्रेत्यांनी पाठींबा दिल्याने सोमवारी लातूर जिल्ह्यतील खत विक्री बंद होती.

जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांनी युरिया व डीएपी विक्री बाबत गाईडलाईन्स स्पष्ट व लेखी स्वरुपात जोपर्यंत येणार नाही तोपर्यंत आम्ही कोणताही डीएपी व युरिया उतरवून घेणार नाही व विक्री करणार नाही, असे निवेदन जिल्हा कृषी अधिकारी यांना देण्यात आले. लातूर जिल्हा फर्टीलायझर्स, पेस्टीसाईडस ॲण्ड सीड्स डिलर्स असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष प्रदीप सोनवणे यांच्या नेतृत्वात शिष्टमंडळाने लातूर जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांची भेट घेऊन त्यांच्या समोर जिल्ह्यातील युरिया व डीएपी विक्री करताना येणाऱ्या अडचणींचा पाढा वाचला. भावातील तफावत व खत विक्रीबाबत स्पष्ट स्वरुपात नसलेल्या गाईडलाईन यामुळे शेतकरी ग्राहक व विक्रेते दुकानदार यांच्यात अनेकदा वाद होतात. यामुळे दुकानदारांना शेतकऱ्यांना योग्य दरात व वेळेवर खत मिळावे यासाठी खत विक्रेते मोठ्या प्रमाणात गुंतवणुक करतात तरी ही अनेक वर्षांपासून प्रामाणिकपणे व्यवसाय करणाऱ्या दुकानदारांना विनाकारण प्रशासकीय कार्यवाहीचा सामना करुन आपला व्यवसाय करावा लागतो, असे सांगुन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांनी यांनी युरिया व डीएपी विक्रीबाबतची गाईडलाईन्स स्पष्ट व लेखी स्वरुपात दिल्यास शेतकऱ्यांत व दुकानदारांमध्ये वाद होणार नाही.

## खरीप हंगामात शेतकऱ्यांना कुठलीही अडचण येऊ नये : आ. रमेशअप्पा कराड



**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. २८ एप्रिल :** समाधानकारक पाऊस पडला की खरीप हंगामाच्या पेरणीसाठी शेतकऱ्याची घाई असते अशावेळी शेतकऱ्यांना हवे ते खत बी बियाणे मिळायला हवे मात्र अनेकदा शेतकऱ्यांची अडवणूक, फसवणूक होते जाणीवपूर्वक तुटवडा निर्माण केला जातो याची दखल घेऊन संबंधित अधिकाऱ्यांनी येणाऱ्या खरीप हंगामात शेतकऱ्यांना कसलीही अडचण येणार नाही सुरळीत हंगाम पार पडावा याची दक्षता घ्यावी अशा सूचना लातूर ग्रामीणचे आमदार रमेशअप्पा कराड यांनी दिल्या.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघ कार्यक्षेत्रातील खरीप हंगाम २०२६ पूर्वतयारी व नियोजन आढावा बैठक लातूर ग्रामीणचे आमदार. रमेशअप्पा कराड यांच्या अध्यक्षतेखाली सोमवार २७ एप्रिल २०२६ रोजी लातूर येथील शासकीय विश्रामगृहात झाली. या बैठकीस किसान मोर्चाचे विक्रमकाका शिंदे, जिल्हा बँकेचे माजी अध्यक्ष नाथसिंह देशमुख, जिल्हा परिषदेचे सदस्य महादेव साळुंके, सौ. छायाताई पद्माकर चिंचोलकर, रेणापूरचे उपसभापती शरद दरेकर, लातूर तालुका कृषी अधिकारी प्रमोद राठोड, रेणापूर तालुका कृषी अधिकारी नितीन कांबळे, औसा अधिकारी दत्तात्रय हाके, यांच्यासह विमा कंपनीचे संबंधित अधिकारी, गुण नियंत्रण कृषी अधिकारी, मंडल अधिकारी, उपकृषी अधिकारी, सहाय्यक कृषी अधिकारी व इतर संबंधित उपस्थित होते.

या बैठकीत खरीप हंगाम २०२६ पूर्वतयारी अनुषंगाने पर्जन्यमान, पीक पेरणी व नियोजन, विविध कंपन्याची खते आणि बी बियाणे, पीक विमा स्थिती, गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सहानुग्रह अनुदान योजना, पीएम किसान योजना, आपत्कालीन पीक नियोजन, क्षेत्र विस्तार व उत्पादकता वाढ, फलोत्पादन, सोयाबीन बियाणे नियोजन, पाणलोट विकास, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प, नैसर्गिक आपत्ती यासह विविध विषयाचा तालुका निहाय आढावा आ. रमेशअप्पा कराड यांनी घेतला.

शेतकऱ्यांच्या गरजेनुसार युरिया, डीएपी खताचा आणि बियाण्याचा वेळेत पुरवठा करण्यात यावा, पेरणीसाठी खताची अडचण शेतकऱ्यांना येणार नाही याची काळजी घ्यावी. गावोगावच्या कृषी सेवा केंद्राकडून शेतकऱ्यांची अडवणूक आणि फसवणूक होणार नाही यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी दक्ष रहावे असे सांगून बैठकीत बोलताना आ. रमेशअप्पा कराड म्हणाले की, पेरणीच्या काळात हव्या त्या नामांकित कंपनीचे बियाणे मिळत नसल्याने बाजारात विविध कंपन्यांच्या नावाचे बोगस बियाणे उपलब्ध असते, सदरील बियाणे कुठल्या कंपनीचे आहे, ते अधिकृत आहे का, सर्टिफाईड आणि दर्जेदार आहे का याची माहिती घेतली जावी जेणेकरून शेतकऱ्यांचे नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी.

घरचे बियाणे पेरणी केल्यास उत्पादन कमी होते ही वस्तुस्थिती असल्याने नामांकित बियाण्याच्या मागणीकडे शेतकऱ्याचा कल असतो. महाबीजच्या बियाणेची टंचाई निर्माण झाल्यास त्याच तोडीचे पर्याय उपलब्ध करावे, खरीप पेरणी बरोबरच ऊस आणि फळबागासाठी खताची टंचाई होणार नाही याची काळजी घेऊन नियोजन करावे, येणारा खरीप हंगाम हा सुरळीत पार पडावा. सरकार विषयी राग रोष निर्माण होऊ नये. शेतकऱ्यांना समाधान मिळाले पाहिजे. शेतकऱ्यांची तक्रार येणार नाही त्यांची अडवणूक आणि अडचण होणार नाही यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी दक्ष राहून काम करावे असेही लातूर ग्रामीणचे आमदार रमेशअप्पा कराड यांनी बोलून दाखवले.

## शिक्षकांचे प्रलंबित प्रश्न सोडविणार : मंत्री पाटील

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि.२८ एप्रिल :** राज्यातील शिक्षकांचे प्रलंबित प्रश्र्न सोडविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आश्र्वासन राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी येथे दिले.

महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या वतीने आयोजित गुरूगौरव पुरस्कार व उपक्रम शाळांच्या सन्मान सोहळ्याचे उद्घाटन करतेवेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी शिक्षक परिषदेचे प्रांताध्यक्ष मधुकर उन्हाळे होते. प्रमुख पाहुणे म्हणून आ. विक्रम काळे, जि. प.चे उपाध्यक्ष दयानंद सुरवसे, जि. प.तील भाजपचे गटनेते रामचंद्र तिरूके, महिला व बाल कल्याण सभापती शिवकन्या गोडभरले, रेणापूर नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा शोभा आकनगिरे, अंबेजोगाई डायटच्या प्राचार्या भागिरथी गिरी, मराठवाडा कार्याध्यक्ष बालाजी पाटील, प्रशांत भिंगोले उपस्थित होते. याप्रसंगी जिल्ह्यातील ७१ प्राथमिक, माध्यमिक शिक्षक व १२ शाळांना उपस्थितांच्या हस्ते सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र देऊन गुरूगौरव पुरस्काराने सन्मानित केले. उन्हाळे म्हणाले, सध्या देशात टीईटी परीक्षेचे भूत शिक्षकांच्या मानगुटीवर बसले आहे. यासंदर्भात, न्यायालयीन लढा चालू आहे. शासनाने सर्वोच्च न्यायालयात पुनर्विचार याचिका दाखल करावी, यासाठी संघटनेद्वारे प्रयत्न सुरू आहेत.

## जिल्ह्यातील २१ शिक्षकांचा गुरूगौरव पुरस्काराने सन्मान



**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि.२८ एप्रिल :** अक्षय तृतीयाच्या शुभ मुहूर्तावर अखिल भारतीय शैक्षिक महासंघ सलग्न असलेल्या महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद लातूर जिल्हा व लातूर महानगर यांच्या संयुक्त विद्यमाने लातूर जिल्ह्यातील २१ शिक्षकांना शैक्षणिक वर्ष २०२५ -२६ चा गुरु गौरव पुरस्कार महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे राज्य अध्यक्ष वेनुनाथ कडू पाटील व नागपूर विभागाचे माजी शिक्षक आमदार नागो गाणार सर यांच्या उपस्थितीत जिल्ह्यातील २१ शिक्षकांचा गुरु गौरव पुरस्कार ने सन्मानित करण्यात आले.

सविस्तर वृत्त असे की महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद लातूर जिल्हा व लातूर महानगर च्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी लातूर जिल्ह्यातील शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार देण्याची परंपरा कायम ठेवत जिल्ह्यातील होतकरू, विद्यार्थी प्रिय शिक्षकांना त्यांच्या कार्याची दखल घेऊन २१ शिक्षकांचा सन्मान करून त्यांच्या पाठीवर आपल्या केलेल्या कामाची छोटीशी पावती समजून त्यांचा सन्मान ऋषितुल्य व्यक्तिमत्व असणारे माजी आमदार महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद नेते नागो गाणार सर व राज्य अध्यक्ष माननीय वेनुनाथ कडू पाटील व संघटन मंत्री किरण भावठाणकर यांच्या हस्ते शाल श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन सपत्नीक शिक्षकांचा गौरव करण्यात आला सदरील गुरु गौरव कार्यक्रमासाठी अत्यंत उत्साहाने आदर्श शिक्षक पात्र शिक्षक व त्यांचे मित्र मंडळी व त्यांचे नातेवाईक मोठ्या उत्साहाने उपस्थित झाले होते.

सदरील गुरु गौरव कार्यक्रमात मार्गदर्शन करण्यासाठी राज्याध्यक्ष वेणुनाथ कडू पाटील यांनी संघटनेबद्दल बहुमोल असे मार्गदर्शन केले संघटनेमुळे प्रत्येकाला आपल्यावर झालेल्या अन्यायाबद्दल संघर्ष करण्याची ताकद निर्माण होते आणि आपल्याला न्याय संघटना मिळवून देते. संघटनेत काम करण्याची प्रत्येकाला गरज वाटली पाहिजे.माजी आ. नागो गाणार यांनी आपल्या भाषणात जुनी पेन्शन योजना व नवीन योजना यामधील फरक त्रुटी कशा पद्धतीने दूर करता येतील याबद्दल बहुमोल मार्गदर्शन केले आणि प्रत्येक व्यक्तीला संविधानाने दिलेल्या अधिकाराप्रमाणे नियत वयो मानाने सेवानिवृत्त झाल्यानंतर शासनाला पेन्शन द्यावेच लागते असे ठणकावून सांगितले.

सदरील कार्यक्रमात संघटन मंत्री किरण भावठाणकर राज्य विस्तारक प्रा. मधुकर कुलकर्णी शेळगावकर जिल्हाध्यक्ष शिवकुमार मुर्गे यांनी आपले मनोगत व्यक्त केले सदरील कार्यक्रमाचे प्रास्ताविक दत्ता पाटील यांनी केले व आभार सुधाकर बुर्गे आणि मांडले.कार्यक्रमाची सांगता पसायदानाने झाली.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

# जिव्हाळ्याचे प्रश्न ऐरणीवर घेणार; थोर महात्म्यांच्या विचारांचा जागर

## सोमवार पासून अंबाजोगाई ते कळंब लोकसंवाद पदयात्रेचे आयोजन

तभा. वृत्तसेवा

**अंबाजोगाई** | अंबाजोगाई ते कळंब तालुक्यांतील सुमारे २० गावांमधून लोकशक्तीच्या चैतन्याला साद घालणारी आणि थोर महात्म्यांच्या विचारांचा जागर करीत जनतेच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांचे लोकशिक्षण करणारी आश्वासक लोकसंवाद पदयात्रा सोमवार, दिनांक २७ एप्रिल पासून अंबाजोगाई तालुक्यातील चनई येथून सुरू झाली असून, कळंब येथे १ मे २०२६ रोजी या लोकसंवाद पदयात्रेचा समारोप होणार आहे. ही माहिती पदयात्रेचे प्रमुख संयोजक डॉ.सोमनाथ रोडे यांनी येथे दिली.

महात्मा ज्योतिबा फुले यांचे द्विशताब्दी स्मृतीवर्ष, सावित्रीबाई फुले यांची १९५ वी जयंती, कस्तुरबा व महात्मा गांधी यांची १५७ वी जयंती आणि महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेली ही पदयात्रा केवळ जनाधारावर चालणार आहे. त्यामुळे जनतेने स्वेच्छेने पदयात्रेसाठी आर्थिक मदत करण्याचे आवाहन संयोजकांनी केले आहे. विविध संस्था व संघटनांच्या समन्वयातून ही पदयात्रा आयोजित करण्यात आलेली असून साधारणतः दररोज तीन ते चार गावातून सेंद्रीय शेती, गोबर गॅस, गांडूळ खत निर्मिती, पारंपरिक बियाणांचे जतन, स्वदेशीचा वापर, पर्यावरण संतुलन, अंधश्रध्दा निर्मूलन, ग्रामसफाई, महिला सक्षमीकरण, कुटुंब नियोजन, वृक्ष संगोपन, जमीन आणि पाणी व्यवस्थापन, रक्तदान, संविधानात्मक मूल्यांची जोपासना, व्यसनमुक्ती, योग आणि आरोग्य शिक्षण, लोकनीतीचे सक्षमीकरण, एड्स समज आणि गैरसमज, सौरऊर्जा, प्लॅस्टीक निर्मूलन इत्यादी प्रश्नांबाबत लोकजागरण करण्यात येणार



आहे. लोकसंवाद पदयात्रेच्या दरम्यान महाराष्ट्रातील आणि मराठवाड्यातील विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांचे व मान्यवरांचे बहुमोल मार्गदर्शनही ग्रामस्थांना लाभणार असल्याचे संयोजकांनी सांगितले. राळेगण सिद्धी, हिवरे बाजार (अहिल्यानगर), आनंदवन (चंद्रपूर), कडवंची (जालना), पाटोदा (छत्रपती संभाजीनगर) आणि लेखा-मेंढा (गडचिरोली) या गावांच्या धर्तीवर स्थानिक ग्रामस्थांच्या व विशेषतः तरूणांच्या सामूहिक प्रयत्नांतून नवे गाव, नवे चैतन्य साकार व्हावे ह्या प्रामाणिक जाणीवेतूनच ही जनाधारित लोकसंवाद पदयात्रा आयोजित करण्यात आलेली आहे. महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, महात्मा गांधी, कस्तुरबा गांधी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, आचार्य विनोबा भावे व लोकनायक जयप्रकाश नारायण यांच्या स्वप्नातील स्वयंपूर्ण, स्वावलंबी भारत निर्माण करण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणजेच ही जनाधारीत पदयात्रा होय. लोकसंवाद पदयात्रेच्या कालावधीत ग्रामविकास व अन्य परिवर्तनाच्या चळवळीस उपयुक्त ठरणाऱ्या पुस्तकांचे प्रदर्शन व विक्रीची व्यवस्था पदयात्रेसोबत राहणार आहे. पक्षनिरपेक्ष विचारांशी बांधिलकी मानणारी आणि सांप्रदायिक सद्भावना जागवणारी ही एक विचार दिंडीच आहे. गाव, ग्रामस्थांशी अस्मिता असणाऱ्यांनी या लोकसंवाद पदयात्रेत सहभागी होऊन सहकार्य करावे, असे आवाहन लातूर जिल्हा सर्वोदय मंडळ, लातूर, जयप्रभा ग्रामीण विकास मंडळ, अंबाजोगाई, मराठवाडा जनता विकास परिषद (शाखा- लातूर, अंबाजोगाई, कळंब) व अंधश्रध्दा निर्मूलन समिती (शाखा - लातूर, अंबाजोगाई, कळंब) च्या वतीने प्राचार्य डॉ.सोमनाथ रोडे, शिवाजी खोगरे, माधव बावगे, शरद देशपांडे, नागनाथ तोंडारे, प्रदीप चव्हाण, शिरिष आपेट, दयानंद देशमुख, हरीदास तम्मेवार, नरसिंग घोडके, के.ई.हरिदास, दादाराव शिंदे व प्रा.शंकर भोसले यांनी केले आहे.

पदयात्रेत सहभागी होण्याचे आवाहन :

लोकसंवाद पदयात्रा आयोजित करण्यात आली असल्याचे डॉ.सोमनाथ रोडे म्हणाले. या लोकसंवाद पदयात्रेत मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन महाराष्ट्र प्रदेश सर्वोदय मंडळ (मुंबई), जिल्हा सर्वोदय मंडळ (लातूर), समाज भारती (लातूर), माध्यम (लातूर), स्वराज अभियान (लातूर), राष्ट्रसेवा दल व अंधश्रद्धा निर्मूलन समिती (लातूर, अंबाजोगाई आणि कळंब), जी-२४ (लातूर), सत्यशोधक समाज (छत्रपती संभाजीनगर), जयप्रभा ग्रामीण विकास मंडळ (अंबाजोगाई) व ग्रामस्वराज्य प्रतिष्ठान (वसमत) आदी संस्था-संघटनांनी केले आहे.

# सरस्वती नदीतील प्रस्तावित काँक्रीटीकरणामुळे अर्ध्या परळीवर भविष्यात जलसंकट

## धोकादायक काम त्वरित रद्द करण्यात यावे - अश्विन मोगरकर

तभा. वृत्तसेवा



**परळी वैजनाथ** | सरस्वती नदीपात्रात केले जाणारे प्रस्तावित भूजल पातळीला धोका निर्माण करणारे सिमेंट काँक्रीटीकरण रद्द करण्याची मागणी भाजपा शहर सरचिटणीस अश्विन मोगरकर यांनी परळी नगरपरिषदेकडे केली आहे.

बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या प्रभू वैद्यनाथ मंदिर असलेल्या परळी शहरातील जुन्या गावभागातून वाहणारी सरस्वती नदी वैद्यनाथ मंदीरासमोरील स्मशानभूमी पासून, अंबेवेस, कृष्णा नगर, बरकत नगर मार्गे गंगाखेड रोडकडे नदीत मिसळते. सरस्वती नदीतून सर्वसाधारणपणे जून पासून जानेवारी पर्यंत सहा ते आठ महिने पावसाचे पाणी वहात असते. याच नदीवर सार्वजनिक स्मशानभूमी जवळ नाथ पॅटर्न चा बंधारा बांधण्यात आला आहे. महाराष्ट्र शासन नदी संवर्धनासाठी मोठ्या प्रमाणावर विविध उपाय योजना करीत असते. मात्र परळी नगरपरिषद आपल्या शहरातील नदी पात्राचे सिमेंटीकरण करत आहे. महाराष्ट्र आपत्ती सौमीकरण प्रकल्प अंतर्गत परळीतील सरस्वती नदीपात्रात काँक्रीटीकरण करण्याचा प्रस्ताव मंजूर करून घेण्यात आला मात्र यामुळे पर्यावरणाला व भूजल पातळीला धोका निर्माण होणार असल्याचा इशारा अश्विन मोगरकर यांनी दिला आहे.

सरस्वती नदीमुळे जवळपास अर्ध्या परळी शहरात भूजल पातळी वाढण्यास मदत होते. या नदीतून वाहणारे पाणी जमिनीत मुरून गावभागातील आड (घरातील छोट्या पाण्याच्या विहिरी) बोअरवेल ला पाणी टिकून असते व जमिनीत पाण्याचे पुनर्भरण होते व भूजल पातळी वाढते. मात्र नुकत्याच मंजूर झालेल्या सरस्वती नदीपात्राचे संपूर्ण सिमेंट काँक्रीटीकरण यामुळे गावभागातील परिस्थिती भविष्यात गंभीर होणार आहे. गावभागातील संपूर्ण नैसर्गिक परिसंस्था (eco-system) बदलून जाणार आहे. भविष्यात पाण्यावरची परळी ही बिनपण्याची परळी होऊन जाईल. याविषयात गावभागातील रहिवाश्यांना कुठलीही माहिती न देता हा प्रस्ताव तयार करण्यात आला असल्याचा आरोप अश्विन मोगरकर यांनी केला आहे.

सरस्वती नदीपात्रात केले जाणारे प्रस्तावित पर्यावरण व भूजल पातळीला धोका निर्माण करणारे सिमेंट काँक्रीटीकरण रद्द करण्याची मागणी करत परळी नगरपरिषदेचे उपमुख्याधिकारी संतोष रोडे यांना २७ एप्रिल, सोमवारी दिलेल्या निवेदनात भाजपा शहर सरचिटणीस अश्विन मोगरकर यांनी केली आहे.

# मसू जाधव यांच्यावर टोळक्याकडून सशस्त्र हल्ला

## 7 जणांविरुद्ध ठाण्यात गुन्हा दाखल

**बीड|प्रतिनिधी**

आंबेडकरी चळवळीतील सक्रिय नेते,अन्याय अत्याचाराच्या विरोधात आवाज उठवून सर्व सामान्य जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी कायम तत्पर असणारे सामाजिक नेते मसू जाधव यांच्यावर दहा ते पंधरा जणांच्या टोळक्याकडून मसू जाधव यांना मारहाण आणि गलिच्छ शिवीगाळ करण्यात आली, या घटनेने नाळवंडी सह परिसरात खळबळ उडाली असून परिसरात दूषित आणि भयभीत वातावर तयार झाले आहे.

काल रात्री साडे दहाच्या सुमारास भीमनगर नाळवंडी येथे एका युवकाला मारहाण झाली,त्या मारहाणीच्या संदर्भात मसू जाधव यांना फोन आल्या नंतर मसू जाधव सह अन्य चार जण मसू जाधव सोबत मारहाण झालेल्या युवकाच्या घरी गेले,घरी गेल्यानंतर मारहाण झालेल्या युवकाला विचार पूस करत असताना काही नीच वृत्तीच्या लोकांनी दहा ते पंधरा जणांच्या टोळक्याकडून मसू जाधव आणि त्यांच्या साथीदार यांना घरात घुसून तू इथे कस काय आला म्हणत मारहाण आणि अश्लील खालच्या पातळीची शिवीगाळ करण्यात आली.

तू आमच्या पेक्षा लई मोठा झाला का तुझी काय औकात आहे म्हणत दहा ते पंधरा जण मोठ्या मोठ्या आवाजात आज तुला जीवच मारून टाकू,याला मारायला हत्यार काढा,गोळ्या घाला,तुझा डोळाच फोडून टाकू, आमच्या इकडे यायची तुझी हिंमत कशी झाली आम्ही इथले डॉन आहोत असे म्हणत गंभीर मारहाण करण्यात आली.

या टोळीकडून मसू जाधव यांच्या गाडीची तोडफोड देखील केली असून मोठे नुकसान झाले आहे. या घटनेने नाळवंडी सह सर्वत्र खळबळ उडाली असून सामाजिक कार्यकर्ते मसू जाधव यांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे.

मात्र तेथील काही लोकांनी मसू जाधव सह अन्य चार जणांची त्या टोळक्याच्या जमावातून सुटका केली,आणि तत्काळ तिथून पळ काढून पिंपळनेर पोलीस ठाण्या कडे धाव घेतली.रात्री उशिरा पिंपळनेर पोलीस ठाण्यात सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल झाला.

मसू जाधव यांच्या जीवाला धोका निर्माण झाला असून अश्या सर्वसाधारण नेतृत्वाला काही जळाऊ प्रवृत्तीच्या टोळक्याकडून झालेल्या मारहाणीचा सर्वत्र जाहीर निषेध होत असून आरोपीवर कठोर शासन व्हावे असे नाळवंडी सह परिसरातील नागरिकांतून म्हंटले जात आहे.

# आ.संदिप क्षीरसागरांनी घेतला विविध विभागांचा आढावा

## मतदारसंघातील महत्वाचे प्रश्न तातडीने मार्गी लावण्याच्या केल्या संबंधितांना सुचना

तभा. वृत्तसेवा

**बीड दि.२७ (प्रतिनिधी)** | बीड विधानसभा मतदारसंघातील विविध महत्वाच्या प्रश्नांच्या अनुषंगाने आ.संदिप क्षीरसागर यांनी वेगवेळ्या शासकीय विभागांची सोमवारी (दि.२७) रोजी आढावा बैठका घेतल्या. यामध्ये संबंधित विभागांशी निगडीत असलेले नागरिक, शेतकरी यांचे प्रश्न तातडीने मार्गी लावण्याच्या सुचना संबंधित अधिकाऱ्यांना केल्या.

सोमवार (दि.२७) रोजी शासकीय विश्रामगृह बीड येथे बीड पंचायत समिती, शिरूर कासार पंचायत समिती, जलसंधारण विभाग, जलसंपदा विभाग, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण या विभागांचा आढावा घेण्यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मतदारसंघातील नागरिकांचे प्रश्न, शेतकऱ्यांचे प्रश्न, विकास कामांचा आढावा या बाबत चर्चा करण्यात आली. यावेळी आ.संदिप क्षीरसागर, माजी आ.सय्यद सलीम यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी आणि सामान्य नागरिक उपस्थित होते.



**पुल कम बंधाऱ्याच्या कामासाठी महामार्ग प्राधिकरण, जलसंपदा, जलसंधारण विभागांची संयुक्त बैठक**

बीड शहरातील बार्शी नाका येथे सुरू असलेल्या पुल कम बंधारा कामाच्या अनुषंगाने राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, जलसंपदा विभाग आणि जलसंधारण विभाग या तीन विभागांची संयुक्त बैठक झाली. पुढिल येत्या काळात पाणी टंचाई होऊ नये यासाठी लवकरात लवकर पुल कम बंधाऱ्याचे काम पुर्ण होऊन पाणी अडविण्या बाबतच्या नियोजना संदर्भात यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली. येत्या पावसाळ्यातच या ठिकाणी पाणी अडवून बीड शहर आणि परिसरातील गावांची पाणी पातळी वाढविण्याच्या अनुषंगाने ही बैठक महत्वपुर्ण ठरली आहे.

# वडवणी तालुक्यात तरुणाचा मृतदेह आढळला

## नातेवाईकांची घातपाताची शक्यता व्यक्त



वडवणी : वडवणी तालुक्यातील पुसरा शिवारात चार दिवसांपासून बेपत्ता असलेल्या तरुणाचा संशयास्पद अवस्थेतील मृतदेह आढळून आला. निवास राठोड (३५) असे या तरुणाचे नाव असून या प्रकरणात सखोल चौकशीची मागणी करण्यात आली आहे.

तिगांव ग्रामपंचायत हद्दीतील गांडगे वस्ती येथील रहिवासी निवास गोविंद राठोड (वय ३५) हे आयुर्वेदिक औषध विक्रीचा व्यवसाय करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते. शांत, मनमिळावू स्वभावामुळे ते गावात परिचित होते. गुरुवार, २३ एप्रिल रोजी सकाळी ते नेहमीप्रमाणे घराबाहेर पडले; मात्र रात्रीपर्यंत परत न आल्याने कुटुंबीयांची चिंता वाढली. कुटुंबीयांनी स्वतःच्या पातळीवर शोध घेतला. मोबाईलवर संपर्क साधण्याचे अनेक प्रयत्न निष्फळ ठरले.

नातेवाईक, मित्रमंडळी आणि गावकऱ्यांनी परिसरातील गावांमध्ये, ओळखीच्या ठिकाणी तसेच रुग्णालयांमध्ये चौकशी केली; मात्र काहीही धागेदोरे मिळाले नाहीत. अखेर पत्नी संगीता राठोड यांनी २५ एप्रिल रोजी वडवणी पोलिस ठाण्यात बेपत्ता असल्याची तक्रार दाखल केली. तक्रारीनंतर पोलिसांनी तातडीने शोधमोहीम सुरू केली.

मोबाईल लोकेशन, संपर्कातील व्यक्ती यांचा तपास सुरू असतानाच रविवारी (दि. २६ एप्रिल) दुपारी सुमारे ४ वाजता पुसरा शिवारातील एका शेतात तरुणाचा मृतदेह आढळल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असता मृतदेहाची ओळख निवास राठोड अशी पटली. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून सर्व पुरावे जप्त केले असून मृतदेह अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात पाठवण्यात आला.

# अर्वाच्य भाषा वापरुन लोकशाहीची गळचेपी हीच संस्कृती का? : माकप

## आ.संजय गायकवाड, बागेश्वर बाबा प्रकरणी कारवाईची मागणी-कॉ.अजय बुरांडे

तभा. वृत्तसेवा



**परळी , प्रतिनिधी** | छत्रपती शिवाजी महाराज यांचा खरा इतिहास जनतेसमोर आणणाऱ्या कॉम्रेड गोविंद पानसरे यांच्या शिवाजी कोण होता? या पुस्तकाच्या शीर्षकावरून शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांनी या पुस्तकाचे संपादक प्रशांत अंबी यांना अत्यंत वाईटरित्या शिवीगाळ करत धमक्या दिल्या. माता भगिनी वरून त्यांनी वापरलेली भाषा कोणत्याही सभ्य माणसाला सहन होणार नाही अशी आहे. आमदार संजय गायकवाड यांचा व त्यांच्या पक्षाचा देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारला पाठिंबा आहे.लोकशाही मध्ये व्यक्त होणाऱ्या व्यक्तीला अशा पद्धतीने शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी देणे, हीच आपल्या पुरोगामी महाराष्ट्राचा वारसा आणि संस्कृती आहे का असा प्रश्न करत सरकारला पाठिंबा देणाऱ्या संजय गायकवाड यांच्या वक्तव्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कारवाई करत आपली भूमिका जाहीर करावी अशी मागणी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष बीड यांनी केली आहे.

कॉ.गोविंद पानसरे लिखित पुस्तकावरून प्रकाशकाना आ. संजय गायकवाड यांनी खालच्या पातळीवर जाऊन अर्वाच्य भाषेत शिवीगाळ केली. या कथित संभाषणात स्त्री जातीबद्दल अवमानकारक शब्द प्रयोग करण्यात आले.एकीकडे नारी वंदनाची भाषा करायची व दुसरीकडे महिलांबद्दल अर्वाच्य भाषा वापरणाऱ्यांचा पाठिंबा घेत त्यांच्या कृतीचे, मौन बाळगत समर्थन करायचे का? योग्य कारवाई करणार याबाबत भूमिका स्पस्ट करण्याची मागणी केली तसेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मोहन भागवत यांच्या उपस्थितीमध्ये कथा वाचक बागेश्वर बाबा यांनी छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल अतिशय वादग्रस्त विधान केले या सर्व प्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मोहन भागवत समर्थन करत आहेत काय ? असा प्रश्न मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने उपस्थित केला असून याबाबतही त्यांनी भूमिका स्पष्ट करावी असे आवाहन मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष बीड जिल्हासचिव कॉ.ॲड. अजय बुरांडे यांनी केले असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आमदार संजय गायकवाड व कथावाचक बागेश्वर बाबा या दोघांवरही कडक कारवाई करावी अशी मागणी ही वतीने करण्यात आली आहे.

# रामकीसन मुंडे यांचे निधन



तभा. वृत्तसेवा

**केज दि.२८ ( प्रतिनिधी )** | केज तालुक्यातील देवगांव येथील रहिवासी जेष्ठ नागरिक रामकीसन पांडूरंग मुंडे वय ९० वर्षे यांचे २८ एप्रिल मंगळवारी सकाळी वृध्दपकाळाने निधन झाले.

त्यांच्यावर मंगळवारी अंतिम संस्कार करण्यात आले.रामकीसन मुंडे यांच्या पश्चात दोन मुले,सुना, मुली जावाई,नातावंडे अशा परिवार आहे.देवगांवचे माजी उपसरपंच विठ्ठल मुंडे व उध्दोजक नितीन नागरगोजे यांचे ते आजोबा होतं.

# ग्लोबल विकास ट्रस्टच्या कामामुळे बीडमध्ये सकारात्मक परिवर्तन!

## अंजली व अनिश दमानिया यांचा दोन दिवशीय कृषीकुल दौऱ्यात प्रभावी सुसंवाद, माजी विभागीय आयुक्त सुनील केंद्रेकर यांचीही भेट; शेती, मातीच्या विषयावर सखोल चर्चा

तभा. वृत्तसेवा

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)** | कधीकाळी तीव्र दुष्काळ, शेतीचे अपयश आणि मोठ्या प्रमाणावर होणारे स्थलांतर यासाठी ओळखला जाणारा बीड जिल्हा आज हळूहळू सकारात्मक बदलाच्या दिशेने वाटचाल करत असल्याचे चित्र दिसत आहे. या परिवर्तनामागे ग्लोबल विकास ट्रस्टच्या सातत्यपूर्ण आणि शाश्वत कामाची मोठी भूमिका असल्याचे प्रतिपादन सुप्रसिद्ध सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केले. २०१२ साली बीड जिल्ह्यात प्रथम दौरा केल्याच्या आठवणी सांगताना त्या म्हणाल्या, "त्या वेळी अनेक गावांमध्ये अत्यंत विदारक परिस्थिती होती. पाण्याचा तीव्र दुष्काळ, शेती संकटात आणि गावात केवळ लहान मुले व वृद्धच दिसत असत. मात्र गेल्या काही वर्षांत झालेल्या कामांमुळे आज या परिस्थितीत लक्षणीय बदल झालेला दिसतो."

त्या पुढे म्हणाल्या की, २०१६ पासून माझे बंधू मयंक गांधी आणि संजय परमार यांनी ग्लोबल विकास ट्रस्टच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी केलेल्या कामामुळे हा बदल शक्य झाला आहे. फळबाग लागवडीसाठी प्रोत्साहन, आधुनिक तांत्रिक मार्गदर्शन आणि थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन दिलेला आधार यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले. परिणामी, शेतीकडे पुन्हा ओढ निर्माण झाली असून जिल्ह्यातील स्थलांतरालाही आळा बसला आहे. जलसंधारणाच्या प्रभावी कामांमुळे शेतीला पाणी उपलब्ध होणे ही या बदलाची सर्वात महत्त्वाची बाजू असल्याचे त्यांनी नमूद केले.

सिरसाळा येथील ग्लोबल विकास ट्रस्टच्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या "कृषीकुल" प्रशिक्षण केंद्राला दिलेल्या दोन दिवसीय भेटीत अंजली दमानिया आणि त्यांचे पती अनिश दमानिया यांनी विविध उपक्रमांची सखोल पाहणी केली. डेमो प्लॉट्स, माती परीक्षण प्रयोगशाळा, जलसंधारण प्रयोगशाळा, पीक संरक्षण प्रयोगशाळा, सेंद्रिय शेती प्रयोग आणि बायोगॅस संयंत्र यांचा त्यांनी प्रत्यक्ष अनुभव घेत संवाद साधला. यावेळी संस्थापक अध्यक्ष मयंक गांधी यांनी सांगितले की, "देशातील शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या ध्येयाने आम्ही काम करत आहोत. हजारो शेतकऱ्यांपर्यंत पोहोचून त्यांना आवश्यक तंत्रज्ञान व प्रशिक्षण दिल्यामुळे त्यांच्या उत्पन्नात वाढ झाली आहे. मात्र अजूनही अनेक अडचणी आहेत, शेतीसाठी आवश्यक रस्त्यांची कमतरता, प्रशासनाचे अपुरे सहकार्य आणि सरकारी योजनांच्या अंमलबजावणीतील अडथळे गंभीर आहेत." या पार्श्वभूमीवर अंजली दमानिया यांनी या कामात सहकार्य करावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.



अनिश दमानिया, जे महाराष्ट्र शासनाच्या धोरणनिर्मिती संस्थेतील "मित्रा"चे सचिव आहेत, यांनी सांगितले की, "ग्लोबल विकास ट्रस्टमुळे हजारो शेतकऱ्यांचे जीवन बदलले आहे. अशा प्रकारचे काम करणाऱ्या संस्था अत्यंत कमी आहेत. या कार्याला अधिक बळकटी देण्यासाठी आणि शेतकऱ्यांच्या जीवनात व्यापक परिवर्तन घडवण्यासाठी आम्ही कायम त्यांच्या सोबत राहू." तसेच शासनाच्या लोककल्याणकारी योजना अधिक प्रभावीपणे शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी ट्रस्टसोबत समन्वयाने काम करण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

या दौऱ्यादरम्यान बीड जिल्ह्याचे माजी जिल्हाधिकारी तथा माजी विभागीय आयुक्त सुनील केंद्रेकर यांनीही कृषीकुलची पाहणी करून उपक्रमांची माहिती घेतली आणि ग्लोबल विकास ट्रस्टच्या कामाचे कौतुक केले. एकूणच, बीड जिल्ह्यातील बदलाची ही कहाणी केवळ प्रकल्पांची नाही, तर शाश्वत शेती, पाणी व्यवस्थापन आणि सामूहिक प्रयत्नांच्या बळावर उभ्या राहिलेल्या ग्रामीण पुनरुत्थानाची आहे—आणि त्यात कृषीकुलसारख्या उपक्रमांची भूमिका निर्णायक ठरत असल्याचे या भेटीतून अधोरेखित झाले.

**कायम ग्लोबल विकास ट्रस्टच्या सोबत राहू - अंजली दमानिया**

केवळ बिड जिल्यातील नव्हे तर राज्यातील आणि देशातील शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी ग्लोबल विकास ट्रस्ट ही संस्था काम करत आहे. जलनायक मयंक गांधी आणि संजय परमार यांच्या प्रयत्नातून संस्थेचा विस्तार झपाट्याने वाढत असल्याचा मला मनस्वी आनंद असून, आगामी काळात शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी रात्रंदिवस काम करणाऱ्या ग्लोबल विकास ट्रस्टसोबत सर्व पातळीवर काम करणार असल्याचेही सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी बोलताना सांगितले.

# मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत माझं गाव आरोग्य संपन्न अभियानाला सुरूवात



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २८ एप्रिल**

पंचायत समिती कार्यालय हिंगोली येथे द्वितीय सेवा हक्क २८ एप्रिल दिवस साजरा करण्यात आला महाराष्ट्र सेवा हक्क याविषयी सविस्तर माहिती देण्यात आली महाराष्ट्र सेवा हक्क अधिनियम २०१५ ची अंमलबजावणी व्हावी यासाठी विशेष प्रचार प्रसिद्धी सर्वांनी करावी असे निर्दे श मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांनी दिले.

ग्रामीण भागाच्या सर्वांगीण आरोग्य विकासाचा ध्यास घेत सुरू करण्यात आलेल्या माझं गाव आरोग्य संपन्न गाव या महत्त्वाकाक्षी अभियानाचा पंचायत समिती कार्यालय हिंगोली येथे २८ रोजी मंगळवारी उत्साहपूर्ण वातावरणात श्रीगणेशा झाला. पंचायत समिती न्यायालयातील सभागृहात पार पडलेल्या तालुकास्तरीय कार्यशाळा व मेळाव्याला विविध विभागातील अधिकारी, आरोग्य कर्मचारी आणि ग्रामपंचायत अधिकारी मोठ्या सख्येने उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड होते. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुधीर ठोंबरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी केशव गडापोड, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलास शेळके, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. देवेंद्र जायभाये, गट विकास अधिकारी माया वानखडे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. गणेश जोगदंड सहाय्यक गट विकास अधिकारी विष्णू भोंजे, आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

अध्यक्षीय भाषणात विवेक गायकवाड यानी अभियानाचे महत्त्व अधोरेखित करताना, प्रथम स्वतःचे आरोग्य सुदृढ ठेवणे आणित्यानतर संपूर्ण गावाच्या आरोग्याची जबाबदारी उचलणे, ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी आहे, असे स्पष्ट केले. आशा वर्कर, आरोग्य कर्मचारी आणि ग्राम पंचायत अधिकारी यांनी एकत्रितपणे कार्य करत ५९ निर्देशाकाची पूर्तता करून जिल्ह्याचे नाव राज्य स्तरावर अग्रक्रमांकावर आणण्याचे आवाहन त्यांनी केले.

एक मे रोजी महाराष्ट्र दिनी गावामध्ये ग्रामसभा आयोजित करून माझं गाव आरोग्य संपन्न गाव या अभियानाची जास्तीत जास्त जनजागृती करणे यासाठी आशा वर्कर आरोग्य कर्मचारी ग्रामपंचायत अधिकारी यांनी पुढाकार घेऊन काम करावे हिंगोली तालुक्यातील १११ ग्रामपंचायत ह्या तिथी मुक्त अभियानात आल्या पाहिजेत आपलं गाव प्रदूषण मुक्त गाव, प्लास्टिक मुक्त गाव आयुष्यमान भारत कार्ड व वय वंदना कार्ड आणि आभा कार्ड काढण्याचे काम पूर्ण झाले पाहिजे.

अभियानांतर्गत ग्रामपंचायतीसाठी राज्य-स्तरावर प्रथम ५ कोटी, द्वितीय ३ कोटी, तृतीय २ कोटी रुपये, विभागस्तरावर प्रथम १ कोटी, तर जिल्हास्तरावर प्रथम २५ लाख रुपयापर्यंतचे पुरस्कार देण्यात येणार आहेत. तसेच आरोग्य उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र आणि ग्रामीण रुग्णालयासाठीही आकर्षक पारितोषिकांची तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे सर्व यंत्रणांनी समन्वय साधून मिशन मोडमध्ये काम करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुधीर ठोंबरे यांनी असे सांगितले की माझं गाव आरोग्य संपन्न गाव या अभियानात आशा वर्कर, आरोग्य कर्मचारी, समुदाय आरोग्य अधिकारी आणि ग्रामपंचायत अधिकारी यांचे महत्त्वाची भूमिका आहे. आशा वर्कर यांनी व्यवस्थित नियोजन करून सुरळीतपणे कामे करावे, ग्रामपंचायत स्तरावर ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी सहकार्य करून अभियान यशस्वी करावे.

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलास शेळके यांनी माझं गाव आरोग्य संपन्न गाव अभियानाची सविस्तर माहिती दिली. प्रास्ताविक तालुका आरोग्य अधिकारी डॉ. गणेश जोगदंड यांनी केले. तर गटविकास अधिकारी माया वानखडे यांनी आभार व्यक्त केले. यावेळी तालुक्यातील वैद्यकीय अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी,आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, आशा वर्कर व गट प्रवर्तक मोठ्या संख्येने उपस्थित होते

# हिंगोली जिल्हा रूग्णालयातील रक्तपेढीचे एसी बंद अवस्थेत



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २८ एप्रिल**

जिल्ह्यात सध्या उन्हाचा पारा चांगलाच वाढला असून तापमान ४२ अंश सेल्सिअसवर पोहोचले आहे. अशा भीषण उष्णतेत जिल्हा सामान्य रुग्णालयातील रक्तपेढी (ब्लड बँक) विभागातील एअर कंडिशनर्स बंद अवस्थेत असल्याचे समोर आले आहे. याचा मोठा फटका रक्तदात्यांना बसत असून, उष्णतेमुळे त्यांच्या आरोग्यावर दुष्परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

जिल्हा सामान्य रुग्णालयात दररोज अनेक रक्तदाते स्वतःहून किंवा नातेवाईकांसाठी रक्तदान करण्यासाठी येतात. नियमानुसार, रक्तदान केल्यानंतर दात्याला काही वेळ थंड आणि हवेशीर वातावरणात विश्रांती घेणे आवश्यक असते. मात्र, येथील ब्लड डोनेट केबिनमधील सर्व एसी गेल्या काही दिवसांपासून बंद आहेत. बाहेर ४२ अंशांची लाट असताना आतमध्येही प्रचंड उकाडा जाणवत असल्याने रक्तदात्यांना घामाच्या धारा सुटत आहेततज्ज्ञांच्या मते, रक्तदान केल्यानंतर शरीरातील द्रव पदार्थांचे प्रमाण काही काळ कमी होते, अशा वेळी जास्त उष्णतेमुळे रक्तदात्याला चक्कर येणे, अस्वस्थ वाटणे किंवा इतर शारीरिक त्रास होऊ शकतात. ४२ डिग्री तापमानात विना एसी रक्तदान करणे हे दात्यांसाठी त्रासदायक ठरत आहे.एकीकडे सरकार आणि रुग्णालय प्रशासन जास्तीत जास्त रक्तदानासाठी आवाहन करत असते, मात्र दुसरीकडे रक्तदात्यांना किमान सोयीसुविधा पुरवण्याकडे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र आहे. कडाक्याच्या उन्हाळ्यात तातडीने हे एसी दुरुस्त करणे गरजेचे आहे, जेणेकरून रक्तदात्यांना कोणताही त्रास होणार नाही. याकडे जिल्हा प्रशासनाने लक्ष द्यावे अशी मागणी होत आहे.

बाहेर प्रचंड उष्णता आहे आणि रुग्णालयातील रक्तपेढीत एसी बंद असल्याने खूप घुसमट होत आहे. प्रशासनाने तातडीने याची दखल घेऊन एसी सुरू करावेत, जेणेकरून दात्यांचे हाल थांबतील अशी प्रतिक्रीया सामाजिक कार्यकर्ते निनाजी कांडेलकर यांनी दिली आहे.

# नवरदेवाचा बुट लपवल्यावरून दोघांना खंजीरने भोसकले

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २८ एप्रिल**

तालुक्यातील कळमकोंडा येथे विवाह सोहळ्यात नवरदेवाचा बुट लपवून ठेवण्याच्या कारणावरून झालेल्या वादानंतर दोघांना खंजीरने भोसकल्याची घटना घडली आहे. या घटनेमध्ये गंभीर जखमी झालेल्या दोघांना उपचारासाठी शासकीय रूग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याप्रकरणी चौघांवर हिंगोली ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार हिंगोली तालुक्यातील कळमकोंडा येथे दोन दिवसांपूर्वी विवाह सोहळा आयोजित करण्यात आला होता. यामध्ये वसमत तालुक्यातील गिरगाव येथील काही वऱ्हाडी मंडळी विवाह सोहळ्यात आली होती. यावेळी विवाह सोहळा सुरळीत पार पडत असतांना नवरदेवाचा बुट लपवून ठेवण्याच्या कारणावरून काही वऱ्हाडी मंडळीमध्ये वादाला तोंड फुटले होते. मात्र इतर मंडळींनी समजावून सांगितल्यानंतर वाद मिटला होता. त्यानंतर विवाह सोहळा पार पडला.

मात्र बुट लपविण्याच्या कारणावरून झालेल्या वादाचा राग मनात धरून चौघांनी पुन्हा वाद उकरून काढत गणेश डाळ यांना मारहाण करण्यास सुरूवात केली. या मारहाणीमध्ये त्यांच्या पोटात खंजीरने वार करून गंभीर जखमी केले. त्यामुळे ते खाली पडले. सदर प्रकार सोडविण्यासाठी श्रावण गाढवे हे मध्ये पडले असता चौघांनी त्यांना मारहाण करून त्यांच्याही पोटात खंजरने वार करून जीवे मारण्याचा प्रयत्न केला. यावेळी झालेल्या मारहाणीत गजानन, श्राणव यांच्यासह मारहाण करणारे विष्णू कुंभारकर, प्रभू बारसे हे जखमी झाले. गावकऱ्यांनी जखमींना तातडीने उपचारासाठी हिंगोलीच्या शासकीय रूग्णालयात दाखल केले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. याप्रकरणी श्रावण गाढवे यांनी दिलेल्या तक्रारीवरून हिंगोली ग्रामीण पोलिस ठाण्यात विष्णू कुंभारकर, प्रभू बारसे व अन्य दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

घटनेची माहीती मिळताच पोलिस निरीक्षक श्यामकुमार डोंगरे, उपनिरीक्षक राहुल घुगे, महिला पोलिस उपनिरीक्षक श्रीदेवी वग्गे, जमादार राठोड यांच्या पथकाने घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली आहे. यावेळी पोलिस निरीखक श्यामकुमार डोंगरे यांनी शासकीय रूग्णालयात जखमींची भेट घेत चौकशी केली. या प्रकरणाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक राहुल घुगे हे करीत आहेत.



**हिंगोली- सरकारी राज्य कर्मचारी मध्यवर्ती संघटनेच्यावतीने मागील चार पाच दिवसांपासून विविध मागण्यांसाठी आंदोलनामुळे कार्यालयात शुकशुकाट दिसत होता परंतु सोमवारी कर्मचाऱ्यांचा संप मागे घेतल्यामुळे कार्यालयात कर्मचारी व अभ्यागतांची गर्दी दिसत होती. छाया- सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### सतीश विडोळकर यांना भारत विभूषण सन्मान जाहीर



हिंगोली- संत नामदेव संस्थेचे माजी अध्यक्ष सतीश नरहरराव विडोळकर यांची प्रतिष्ठेचा 'भारत विभूषण सन्मान २०२६' पुरस्कारासाठी निवड झाली आहे. आयशर संस्थेतर्फे दिला जाणारा हा सन्मान विझनरी लिडर इन अॅग्रीकल्चर अँड सोशल इंपावरमेंट या श्रेणीत त्यांच्या कृषी क्षेत्रातील दूरदर्शी नेतृत्व आणि सामाजिक सबलीकरणासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल म्हणून देण्यात येणार आहे. शेतकऱ्यांसाठी आधुनिक तंत्रज्ञान, सेंद्रिय शेतीचा प्रसार आणि ग्रामीण भागातील युवकांना रोजगाराभिमुख करणाऱ्या त्यांच्या उपक्रमांची राष्ट्रीय पातळीवर नोंद घेतली गेली आहे. पुरस्कार वितरण सोहळा येत्या २८ एप्रिल २०२६ रोजी चंदीगड येथील पंजाब विधानसभेच्या प्रांगणात होणार आहे. या कार्यक्रमाला पंजाब विधानसभेचे अध्यक्ष सरदार कुलतार सिंह संधवान प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत होणाऱ्या या सोहळ्यात विडोळकर यांना सन्मानित करण्यात येईल. डॉ.सतीश विडोळकर यांनी गेल्या दोन दशकांपासून शेती आणि समाजकारणाची यशस्वी सांगड घातली आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली संत नामदेव संस्थेने हजारो शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावले आहे. त्यांच्या या यशामुळे संपूर्ण मराठवाड्यात आनंदाचे वातावरण आहे. आयशरचे अध्यक्ष डॉ. अतुल कुमार शर्मा व सचिव डॉ. रेशू गुप्ता यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. तसेच हिंगोलीकरांकडूनही त्यांचेवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### पेडगाव शिवारात मानवी सांगाडा सापडला

हिंगोली- तालुक्यातील पेडगाव शिवारात लहान्या पूलाखाली मानवी सांगाडा दि २७ एप्रिल रोजी सोमवारी सापडला. २० ते ३० वर्षे वय आणि हातामध्ये स्टीलचे कडे असून यावरून बासंबा पोलिस ओळख पटविण्याचे काम करीत असून परिसरातील गावात कोणी मिसींग असल्याची खात्री करीत आहेत. सिरसम ते पेडगाव शिवारात माळरानाचा भाग आहे. या ठिकाणी असलेल्या एका लहान्या पूलाखाली मानवी सांगाडा असल्याचे एका शेतकऱ्याला आढळून आले. या घटनेची माहीती बासंबा पोलिसांना दिली. बासंबा पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक विकास आडे, उपनिरीक्षक संदीप, उपनिरीक्षक मदन गव्हाणे, जमादार शिवप्रसाद पोले यांच्यासह पोलिस पथकाने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी घटनास्थळी पाहणी केली असता त्याठिकाणी केवळ एक सांगाडा आढळून आला. सांगाड्याच्या उजव्या हातात कडे असून शरीराचा संपूर्ण भागच वाळून गेला आहे. हा सांगाडा पुरूष जातीचा असल्याचे स्पष्ट झाले आहे. डोक्याचे केस मोठे असल्याचेही आढळून आले. सदर व्यक्ती कधी मरण पावली. खून की आत्महत्या या प्रकाराचा शोध आता पोलिसांकडून केल्या जात असून हातातील कड्यावरून त्याची ओळख पटविण्याचे प्रयत्न बासंबा पोलिस करीत आहे. हिंगोलीसह विदर्भातील पुसद, यवतमाळ तालुक्यातील बेपत्ता व्यक्तींची माहीती घेणे सुरू आहे.

# शिवशंभो प्रतिष्ठानतर्फे आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्याची जय्यत तयारी, विविध समित्या स्थापन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २८ एप्रिल**



शिवशंभो प्रतिष्ठाण, हिंगोली यांच्या वतीने आयोजित शिवशंभो पुरस्कार, गुणवंतांचा सत्कार व खा.रामराव वडकुते यांच्या नागरी सत्कार सोहळयाची जय्यत तयारी करण्यात येत आहे. सोहळयासाठी विविध समितीच्या स्थापना करुन जबाबदारीचे वितरण करण्यात आले आहे. याचबरोबर सोहळयाच्या निमत्रंण पत्रिकेचे विमोचन करण्यात आले.

हिंगोली येथील शासकीय विश्रामगृहात सोमवार दि.२७ एप्रिल रोजी शिवशंभो प्रतिष्ठाण पदाधिकारी, सदस्य व कार्यकर्त्यांची बैठक संपन्न झाली. या बैठकीत कार्यक्रम स्थळी पार्कींग व्यवस्था सुरळीत राहण्यासाठी वाहतुक शाखेची मदत घेणे, परिसर स्वच्छतेसाठी पालिकेचे सहकार्य घेणे आदीसह विविध समित्यांची स्थापना करण्यात आली. महाराष्ट्र दिनी दि.१ मे रोजी सकाळी ११ वाजता स्व.खा. शिवाजीराव देशमुख सभागृहात सोहळयाचे आयोजन करण्यात आले असुन त्या अनुषंगाने परिसर पाहणी करण्यात आली. सोहळयासाठी स्वागत समितीमध्ये ॲड.रावण धाबे, सुधाकर वाढवे, गोपाळ सरनाईक, गोपाल भोस यांची तर प्रोटोकॉल समिती सदाशिव सुर्यतळ, मनोज देशमुख, ॲड.संतोष राठोड, उमेश नागरे, इंजि.अशोक अग्रवाल यांना जबाबदारी देण्यात आली. व्यासपीठ समिती गजानन मगर, डॉ.नामदेव कोरडे तर भोजन समिती प्रकाश इंगोले, संजय भुमरे, ज्ञानेश्वर चव्हाण, प्रा.नंदकुमार सवंडकर यांनी जबाबदारी घेतली. बैठक व्यवस्था महिला खान गजाला यासमीन, ज्योतीमाला धुळे तर पुरुष बैठक व्यवस्था बाबुराव ढोकणे, राजेंद्र हलवाई, शैलेश नांदेडकर यांना जबाबदारी देण्यात आली. पुरस्कार वितरण समिती प्राचार्य पवन सोळंके, क्रीडा मानधन वितरण व गुणवंताचा सत्कार संजय भुमरे यांच्यावर जबाबदारी देण्यात आली. या बैठकीला अध्यक्ष कल्याण देशमुख, सदस्य सुनिल पाठक व विजय गुंडेकर यांच्यासह जिल्हयातील कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.

# पत्रकार सौरभ साकळे यांची गळफास घेवून आत्महत्या

**तभा वृत्तसेवा**
**कळमनुरी, २८ एप्रिल**

कळमनुरी तालुका मराठी पत्रकारसंघाचे शहराध्यक्ष सौरभ साकळे यांनी त्यांच्या कार्यालयात दि २७ एप्रिल रोजी गळफास घेवून आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. त्यांच्यावर कळमनुरी येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

कळमनुरी येथील एक दैनिकाचे तालुका प्रतिनिधी म्हणून काम करणाऱ्या सौरभ यांनी मागील सात वर्षात शहरासह तालुक्यातील प्रश्नांना वाचा फोडली. बातम्यांच्या माध्यमातून त्यांनी जनतेचे प्रश्न मांडून त्यांची सोडवणूक देखील केली. परखड लिखाण करणारे व्यक्तीमत्व म्हणून त्यांची ओळख होती.

कळमनुरी येथे त्यांनी एक छोटेखानी कार्यालय सुरू केले होते. नेहमीप्रमाणे दि २७ एप्रिल रोजी सकाळी साडेनऊ वाजण्याच्या सुमारास ते कार्यालयात आले. त्यानंतर त्यांनी कार्यालयाचा समोरील दरवाजा आतून बंद करून पंख्याला गळफास धेवून आत्महत्या केली. काही वेळाने सदर प्रकार लक्षात आल्यानंतर पत्रकारांनी गर्दी केली. पोलिस निरीक्षक प्रेमकुमार माकोडे, जमादार रवी इंगोले, माखणे, गजानन होळकर यांच्या पथकाने घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली आहे. उत्तरीय तपासणी केली आहे. आत्महत्येचे नेमके कारण समजू शकले नाही. त्यांच्या पश्चात आई, दोन भाऊ, बहिण असा परिवार आहे.

# विरोधकांच्या भूमिकेमुळे महिला सक्षमीकरणाला धक्का



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २८ एप्रिल**

महिलांच्या राजकीय सक्षमीकरणासाठी अत्यंत महत्त्वाचे मानले जाणारे नारी शक्ती वंदन विधेयक घटनादुरुस्ती स्वरूपाचे असल्यामुळे त्याला दोनतृतीयांश बहुमताची आवश्यकता होती. मात्र, काँग्रेस तसेच इतर विरोधी पक्षानी विरोध केला अशी प्रतिक्रीया भाजप नेत्या प्रिती जयस्वाल यांनी दिली. महिलांना विधानमंडळात अधिक प्रतिनिधित्व देण्याचा, त्यांच्या निर्णयक्षमतेला बळ देण्याचा हा प्रयत्न असताना त्याला अडथळे निर्माण करणे म्हणजे महिलांच्या प्रगतीला रोखण्याचा प्रयत्नच होय. केवळ राजकीय स्वार्थासाठी महिलांच्या हक्कांवर तडजोड करणे हे अत्यंत निषेधार्ह आहे. विरोधकांनी या विधेयकाबाबत घेतलेली भूमिका ही महिलांविषयीच्या त्यांच्या असंवेदनशील दृष्टिकोनाचे द्योतक आहे. महिलांच्या नावाने राजकारण करणाऱ्या या पक्षांनी प्रत्यक्षात मात्र त्यांच्या प्रगतीत अडथळे आणल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे. देशातील महिला आणि जागरूक नागरिक या भूमिकेचा निश्चितच निषेध करतील व त्यात अडथळा आणणाऱ्यांना जनता नक्कीच योग्य वेळी उत्तर देईल, आणि महिलांच्या सन्मानासाठी उभे राहणाऱ्या शक्तींना पाठिंबा देतील असेही यावेळी प्रिती जयस्वाल म्हणाल्या.

# औंढा नागनाथ येथे गो सन्मान यात्रेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २८ एप्रिल**



गो सन्मान आव्हान अभियाना अंतर्गत औंढा नागनाथ येथील नगरपंचायत येथून भव्य रॅलीचे आयोजन सोमवारी २७ एप्रिल रोजी सकाळी अकरा वाजता करण्यात आले होते. सदरील रॅली नगरपंचायत ते तहसील पर्यंत काढण्यात आली.

गो सन्मान आवाहन अभियान रॅलीमध्ये सकल समाज बांधवांनी गोहत्या बंद करा, मानवता जिवंत ठेवा. गोमाता वाचली तरच भारत वाचेल. गो हमारी माता है जन्म जन्म का नाता है. गौ माता का अपमान नही सहेगा हिंदुस्तान अशा घोषणा यावेळी देण्यात आल्या.

सकल हिंदू समाजाच्या वतीने औंढा तहसील कार्यालयाच्या मार्फत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांना निवेदन देण्यात आले आहे. सदरील निवेदन तहसीलदार प्रवीण ऋषी यांनी स्वीकारले आहे.

गोमातेला राष्ट्रमातेचा दर्जा व संपूर्ण देशात गोवंश हत्या कायमस्वरूपी बंद करण्यात यावी. संपूर्ण देशात गो सन्मान अभियान अत्यंत प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. सद्यस्थितीत गोवंश हत्या राजरोसपणे चालत असल्यामुळे प्रशासकीय कमकुवत दिसत आहे. देश पातळीवर २७ एप्रिल रोजी राज्यातील पूर्ण तहसील कार्यालयावर प्रत्येक गावातून सह्या व प्रार्थना पत्राच्या माध्यमातून हे पवित्र कार्य पार पाडण्याचा देशवासीयांचा मानस आहे. तसेच पोलीस प्रशासनास आदेशित करून गोवंश हत्या बंदी बाबत कडक पावले उचलावी. तसेच लोकसभेत कायदा पारित करून गोमातेला राष्ट्रमाता म्हणून अधिकृत दर्जा दिल्याचा शासन परिपत्रक निर्गमित करावे. गाईला राष्ट्रमाता, राष्ट्रीय देवी, राष्ट्रीय पूजा ,राष्ट्रीय वारसा किंवा राष्ट्रीय पाया असा सन्मानीय दर्जा देण्यात यावा .गो सेवेसाठी एक केंद्रीय कायदा बनवावा आणि गोसेवेसाठी एक केंद्रीय मंत्रालय स्थापन करावे. चारा सुरक्षा धोरण स्थापन करावे आणि पंचगव्य उत्पादनाचे उत्पादन आणि वितरण वाढवावे. या भव्य रॅलीमध्ये महंत पद्मनाभ गिरीजी महाराज, नाथा महाराज, तेजकुमार झांजरी उत्तमराव देशमुख, निळकंठ देव ,डॉ प्रवीण सोनी ,श्रीपाद भोपी, साहेबराव देशमुख, प्रदीप गंभीरे ,विलास काळे, भास्कर पाठक ,डॉ विलास खरात, डॉ विमलकुमार बोरा,डॉ.सत्यनारायण अग्रवाल,शंकर काळे, सचिन देव, गणेश देशमुख, विजय गोड, ॲड गणेश ठाकूर, निलेश सारडा, जयाताई देशमुख,अनिता जाधव, ज्योती देशपांडे, सपना हुडेकर, एस संघई, एम अग्रवाल,प्रमोद अग्रवाल, विकी ठाकूर यांच्यासह सकल हिंदू समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होता. यावेळी चोख पोलिस बंदोबस्त लावण्यात आला होता.